For Banking & Finance - Advertisement's Review & Noteworthy Entrepreneurship

Magazine

# अर्थ-उद्योग ®

RNI-13/01/95 MAHMAR13457

संपादक - गोरख पगार



25th YEAR ANNIVERSARY SPECIAL





# Families in Entrepreneurship





ROHAN ENTERPRISES
Promoters & Builders

# LIVE A LIFE WHERE TRAVEL IS ONLY FOR PLEASURE

## DIVINE PARK

Maharera No P51600035209

SCAN FOR LOCATION




Building 1


Building 2

### OFFICE ADDRESS

3rd Floor, Dattatraya Darshan, Opposite Big Bazar, College Road, Nashik, Maharashtra 422005
Email: info@enterprisesrohan.com | Web: www.enterprisesrohan.com
Tel: 0253-2571957 | Call: 777 4095 958

Site Address : Divine Park, Behind Swami Vivekananda School, Shraddha Vihar, Indira Nagar Annex, Nashik 422009

NAREDCO NASHIK
CREDAI NASHIK METRO

# ALPHATECH


PROCESS EQUIPMENTS PVT. LTD.

Dedicated to Vintners

JAGDISH PATIL
DIRECTOR
(+91 9822624931)








Discover the best winery equipment solutions with Alhpatech Process Equipments Pvt. Ltd. With decades of experience in the industry, we are your trusted partner for top-quality equipment for wineries, breweries, and distilleries. Our team of experts will work with you to create a customized solution that meets your unique needs and helps you achieve your goals. Whether you're starting from scratch or upgrading your existing setup, we have the expertise and equipment to help you succeed. So why wait? Contact us today and experience the difference for yourself!

CLOUDS 15 KRAFT BEER

Raise a glass to CLOUDS15, Nashik's first and finest craft beer plant! With a wide range of craft beers to choose from, you're sure to find a brew that suits your taste. Whether you prefer hoppy IPAs, rich stouts, or crisp lagers, we have something for everyone. Our brewery is dedicated to producing high-quality, small-batch beers that showcase the best of what the craft beer industry has to offer.








YouTube


# ALPHATECH


PROCESS EQUIPMENTS PVT. LTD.
W-194, MIDC Ambad, Nashik, MH., IN.
Contact : 0253 2973131 / 2384931
Email : jagdish@alphatech-equip.com
Web : www.alphatech-equip.com




We're delighted to announce that
The Source at Sula is now open!
Our lush green estate surrounded by the
rolling hills is the most amazing place to
enjoy the ethereal monsoons
in Nashik.

Drive up the green ghats for your
perfect monsoon getaway and enjoy
special reopening rates when you book.





BE REST ASSURED, WE HAVE A COVID-FREE STAY ALL READY FOR YOU!
RELAX, UNWIND, REJUVENATE.


TO KNOW MORE

+91 78755 55725 / 35 | source@sulawines.com | sula_vineyards | www.sulavineyards.com

SULA
VINEYARDS

Magazine अर्थ-उद्योग

# संपादकीय



## औद्योगिक विकास आणि उद्योजकांच्या सेवेसाठी समर्पित

द्विमासिक अर्थ-उद्योगचा रौप्यमहोत्सवी विशेषांक आपल्या हाती देतांना आनंद होत आहे. कोणतीही गोष्ट साध्य करण्यासाठी किंवा यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रमांना पर्याय नाही. उद्योजकता किंवा सामाजिक क्षेत्रात उभे राहण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतात. आणि भारतात तर ते अधिकच करावे लागतात. म्हणून आम्ही ज्यांना या अंकातून सादर केले किंवा गेले २५ वर्षे ज्यांच्या-ज्यांच्या कार्यावर प्रकाशझोत टाकला ते सर्व कठोर परिश्रमांतून आणि विविध समस्यांना सामोरे जाऊन उभे राहिले आहेत. म्हणून त्यांचे जीवन समाजासाठी मार्गदर्शक आणि आपत्तीच्या काळात आशेचा किरण दर्शविणारे ठरले आहे. ही सर्व वस्तुस्थिती असताना ही सर्व महान व्यक्तिमत्वे प्रसिद्धीपासून मात्र सातत्याने दूर राहतात अशी आहेत. अर्थ-उद्योगच्या दृष्टीने ही बाब विविध विशेषांकांचा विषय ठरली आणि त्या माध्यमातून समाजाला प्रेरित करणारे प्रेरक साहित्य निर्माण झाले. आमचे विशेषांक महाविद्यालयांमधील युवक-युवती त्यांच्या प्रकल्पांसाठी (प्रोजेक्ट) संदर्भ म्हणून संदर्भासाठी घेतात. अनेक माध्यमं त्या विशेषांकाचा आधार घेत त्यावर पुढील काम करतात. तर अनेकांच्या पुस्तकांसाठी आमच्या विशेषांकांचा उपयोग होतो हे आमच्या निदर्शनास आले आहे. आणि आमच्यासाठी ती स्वागतार्ह बाब आहे.

प्रकाशन सुरु झाल्यापासून तर आजपर्यंत साधारण १५०० / यशकथा आम्ही प्रसिद्ध केल्या. एकाचवेळी एका मोठ्या व्यक्तिमत्वावर पूर्णपणे लिहून होत नसते. त्यामुळे वेगवेगळ्या विशेषांकात आम्ही त्या एकाच व्यक्तिमत्त्वावर वेगवेगळ्या दृष्टीकोनातून प्रकाशझोत टाकला. या विशेषांकातही आम्ही अशा महान व्यक्तिमत्वांवर प्रकाशझोत टाकला. ज्यांचेवर आम्ही यापूर्वीही अनेकदा लिहिले आहे. पण यावेळेला संकल्पना यशात कुटुंबियांचाही सहभाग कसा असतो अशी आहे. ही संकल्पना रौप्य महोत्सवी विशेषांक असल्याने निवडली. आणि आमचे काम उभे राहिल्यावर लक्षात आले की, महान व्यक्तिमत्त्व आणि यशाला कुटुंबियच घडवितात त्यासाठी नेतृत्त्व लागते आणि त्याची नोंद घेणे, समाजासमोर तो दाखला ठेवणे, ही एक सामाजिक गरज आहे. त्या दृष्टीतून हा विशेषांक महत्वाचा ठरेल. आमचा उद्देश आमचा हा विशेषांक प्रेरक साहित्य ठरावे आणि आम्ही ज्यांच्या यशोकथा सादर केल्या त्यांनी उत्तरोत्तर यशस्वी व्हावे व समाजाच्या सर्व स्तरातून त्यांना पाठबळ मिळावे हा आहे.








■ वर्ष २६ वे ■ अंक १ ■ सबक्राईबर कॉपी
रजि. नं. एन.एस.एम. २४२/९५
RNI-13/01/95 MAHMAR13457

## संपादक
गोरख पगार

## मानद संपादक
अविनाश शिरुडे

## वितरण व्यवस्था
पाठक ब्रदर्स, गंजमाळ, नाशिक
अर्थ-उद्योग सर्व्हिसेस

## संपादन समन्वय
रवी अमृतकर
विजय संकलेचा
दीपक बागड
विवेक गोगटे
डॉ. नारायण विंचुरकर
नयनेश संघवी
संजय होळकर
मोनित ढवळे
उद्धव आहिरे
धुंडिराज माटे
एम. के. बिरमानी
व्योम श्रीवास्तव

## अंक सजावट
निधी पब्लिकेशन | कांचन शिंदे - 9850276780

हे द्विमासिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक गोरख रामभाऊ पगार यांनी एस.एस. १९, एम.आय.डी.सी.ए.-रोड, स्ट्रीट नं. ३, नाईस एरिया, सातपूर, नाशिक- ७ येथून प्रसिद्ध केले.

www.arthudyog.com
arthudyog@gmail.com

व्यवस्थापकीय संपादिका - **प्रतिभा गोरख पगार**
संपादक - **गोरख पगार मो. ७७६७९८२८८८**

---

*या अंकातील कोणताही भाग संपादक/ प्रकाशकांच्या पूर्व परवानगीशिवाय पुनमुद्रित करता येणार नाही. व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतातच असे नाही.

स्वागत मूल्य 100/-

# अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| अशोक कटारिया | ०६ |
| महाराज बिरमानी | ०९ |
| दीपक बागड | १० |
| उद्धव आहेर | १२ |
| दीपक चंदे | १५ |
| अशोकभाऊ जैन | १६ |
| विलास बिरारी | १८ |
| अनिल धुमाळ | २० |
| संजय होळकर | २२ |
| राजीव सामंत | २४ |
| विजय नवल पाटील | २७ |
| डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी | २८ |
| राजुभाई शहा | ३० |
| प्रकाश लड्ढा | ३२ |
| गंगाधर जाधव | ३५ |
| यू. के. शर्मा | ३६ |
| विवेक गोगटे | ३९ |
| आश्विन रॉडरीग | ४१ |
| डॉ. नारायण विंचुरकर | ४२ |
| निलिमाताई पवार | ४५ |
| नेमीचंद पोद्दार | ४७ |
| रवि अमृतकर | ५० |
| जगदिश पाटील | ५२ |
| विनायक नेर्लिकर | ५४ |
| शिवाजी आहेर | ५८ |
| जगदिश होळकर | ६० |
| सी. बी. सिंह | ६३ |
| योगेश कनानी | ६५ |
| सुरजितसिंग आनंद | ६६ |
| धनंजय बेळे | ६८ |
| निखिल पांचाल | ७० |
| निरज अग्रवाल | ७२ |
| सुरेश देशमुख | ७४ |
| डॉ. रुमि धन पटेल | ७६ |
| कैलास देवरे | ७७ |
| अविनाश शिरुडे... | ७८ |
| मनोज टिबडीवाल | ८० |
| डॉ. संजय भावसार | ८२ |
| मनोज कोतकर | ८४ |
| संदीप सोनार / स्वाती सोनार | ८६ |
| श्रीनिवास लोया | ८७ |
| सुभाष पाटील | ८८ |
| नयनेश संघवी | ९० |
| पियुष सोमानी | ९१ |
| विश्वास मंडलिक | ९३ |

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

**No.1 PSU Bank**
In Loan, Deposit Growth
Legacy of 8 decades, Estd in 1935
2070 branches and 2220 ATMs

# MAHABANK MSME SCHEMES

| NAME OF THE SCHEME | FACILITY AVAILABLE | MAXIMUM QUANTUM OF LOAN | SCHEME GUIDELINES |
|---|---|---|---|
| **MAHABANK GST SCHEME** | **Working Capital** (Fund and Non Fund based) | Upto **10 Crores** | For all MSMEs under GST Ambit<br>Simple Calculation based on GST for calculating Quantum<br>Hassle free sanctioning |
| **MAHABANK CONTRACTOR SCHEME** | CC, TL to purchase Equipment and Machinery, Non Fund Facility | Upto **10 Crores** | Exclusive scheme for contractors<br>Providing loan for purchasing Equipment/Machinery |
| **MAHABANK DOC SCHEME** | TL and CC Facility | Upto **25 Crores** | ▪ Exclusive scheme for Doctors<br>▪ Loan to purchase Medicalequipments, Renovation,expansionof existing center<br>▪ Repayment upto 7 Years for purchase of medical equipments<br>▪ Repayment upto 12 Years for renovation,expansion of existing center |
| **MAHA SWAGATAM SCHEME** | Fund and Non-fund Facility (For both Take over and New facility request for customers with CIBIL MSME Ranking (CMR1 To CMR 4) | **Upto 50 Crores** | ▪ Lower ROI( 8.80% onwards)<br>▪ NIL Processing fees for CMR1 and CMR2<br>▪ Concession in LC BG commission |

**HOME LOAN**



[redacted]

**CAR LOAN**



[redacted]

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

Griha Nirman Bhavan, Gadkari Chowk,
Old Agra Road, Nashik - 422 002
☎ (ZM) 0253-2577107 / 0253- 2570827 / 7479
Fax : 0253-2311642
zmnasik@mahabank.co.in
bankofmaharashtra.in



# महासागराएवढे काम !

गोरख पगार

अशोका ग्रुप हे नाव आता केवळ नाशिकपुरते मर्यादित राहिले नसून भारतात सर्वत्र मैलाचा दगड ठरावा अशा पध्दतीने सुस्थापित झाले आहे. श्री. कटारिया यांची झेप, उद्योजकता म्हणजे काय, ती कशी विकसित होते, हातात काही भांडवल नसतांना, उद्योगात पदार्पण करणे, आणि हाती घेतलेल्या कार्याला सर्व स्तरावर यशाची पावती मिळवित उद्योगाच्या संलग्न क्षेत्रात चौफेर भराऱ्या मारणे हे सर्वच ऐतिहासिक ठरावे असे आहे. फक्त चार हजार रुपये भांडवलात सुरु झालेल्या या उद्योगाचे आता मोठ्या समुहात रुपांतर झाले. या समुहाच्या अनेक शाखा आहेत आणि अनेक पारितोषिके त्यांनी पटकाविली. बिर्ला उद्योग समुह, टाटा उद्योग समुह, मफतलाल, कॅडबरीज, भारत पेट्रोलियम, युनिकेम लॅबोरेटरीज आदि प्रमुख उद्योगसमुहांनी आपल्या औद्योगिक बांधकाम प्रकल्पांची जबाबदारी अशोकावर सोपविली.

पुण्यातील पहिला उड्डाणपूल, बांधकामातील उच्च दर्जा राखून पूर्ण केल्याबद्दल इन्स्टीट्यूट ऑफ इंजिनिअर्सच्या पुणे विभागातर्फे सी. एम. शहा काँक्रीट टेक्नॉलॉजी हे पारितोषिक, तर शिवनानदिवरील पुलास नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ब्रिज इंजिनिअर्सतर्फे कामाच्या उच्च दर्जाबद्दलचे पारितोषिक त्यांना यापूर्वीच बहाल करण्यात आले. प्रॉक्टर ॲण्ड गॅबल या बहुराष्ट्रीय कंपनीसाठी गोव्यात एका औद्योगिक प्रकल्प उभारणीत जागतिक दर्जाच्या गुणवत्ता प्रणालीचा वापर करुन प्रकल्प ठरलेल्या वेळेत पूर्ण केल्याबद्दलही प्रॉक्टर ॲण्ड गॅम्बल या कंपनीने या समुहाला डायरेक्टर्स ड्ब्लू ओ डब्लू या पुरस्काराने सन्मानित केले आहे. अशोका समुहाचे आणखी एक ठळक वैशिष्ठ्यं म्हणजे वेळेचे नियोजन. त्यांनी मांगी येथील पूल ७५ दिवसात तर पंढरपूर जवळील मांडवी नदीवरील ९० मीटर लांबीचा पूल केवळ ३८ दिवसात पूर्ण करुन जागतिक विक्रम केला. लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने या बाबींची दखल घेतली. राज्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गांवरील पुलांचा समावेश असलेला संपूर्ण विकास कार्यक्रम, निधी अभावी राबविता येणे शक्य नसल्याने शासनाने खास बांधकाम उद्योग समुहांना या कार्यक्रमाअंतर्गत बांधा-वापरा-हस्तांतरीत करा. (B.O.T.) या तत्वावर रस्ते विकास प्रकल्पाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले. शासनाच्या या आवाहनास सकारात्मक प्रतिसाद देत अशोका उद्योग सर्वच मोठ्या प्रकल्पांत कार्यरत आहे. त्यातील ठळक प्रकल्पात बैनगंगानदीवरील पुल, धुळे-सुरत बायपास रस्ता, नगर करमाळा रस्त्यावरील



## हायलाईटस्

- इन्स्टीट्यूट ऑफ इंजिनियर्स सी.एम. शहा. काँक्रीट टेक्नॉलॉजी पारितोषिक.
- नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ ब्रिज इंजिनयर्स चे उच्च दर्जाबद्दलचे पारितोषिक.
- प्रॉक्टर ॲण्ड गॅम्बल कंपनीचा डायरेक्टर्स डब्ल्यू ओ डब्ल्यू पुरस्कार.
- लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद (मांडवी नदीवरील पूल)
- विश्वकर्मा ॲवार्ड. • इंटरनॅशनल बिझ ॲवार्ड. • श्वेता ॲग्रोफार्म.
- अशोका एज्यूकेशन फाऊंडेशन. • अशोका युनिव्हर्सल स्कूल.
- व्यवस्थापन, संगणक शास्त्र आणि शिक्षण शास्त्राचे पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रम.
- सतीश पारखांच्या नेतृत्वाखाली उर्जाक्षेत्रात पदार्पण. एकहजार कोटींची कामे
- नाशिकमध्ये आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विद्यापीठ उभारण्याचा मानस.

आणि याशिवाय अनेक...





८० कि.मी. चा लांबीचा रस्ता, मांडवी नदीवरील विक्रमी वेळेत पुर्ण केलेला पूल आदींचा समावेश आहे. जगाच्या स्पर्धेत राष्ट्राचे नाव उज्ज्वल करणारा हा उद्योगसमूह नाशिकचा आहे. उद्योग समूहास आय.एस.ओ.हे आंतराष्ट्रीय प्रमाणपत्र प्राप्त आहे. बांधकामांबरोबरच उद्योग समुहाने लॅन्ड डेव्हलपींग, बिल्डरशिप, ॲग्रो फॉरेस्ट्री व बीटूमन आयातीच्या क्षेत्रातही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. सृजनशील माणसाच्या पायाशी यश नेहमी लोळण घेते. त्याचा प्रत्यय आपल्याला येथे येतो. कारण





भारतातील इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट अंतर्गत श्री कटारिया हे आपल्या उद्योग समुहाला सर्वोच्च स्थानी आणण्यासाठी दिवसरात्र सर्व सहकाऱ्यांसह प्रयत्नशील आहेत. अशोका उद्योग समूह फक्त व्यापारी तत्वांचा अबलंब न करता शिक्षणक्षेत्रातही आपले



स्थान राखून आहे. गुणग्राहक, सर्जनशील आणि संशोधक विद्यार्थ्यांसाठी सेतू या अर्थाने ही संस्था कार्य करते. संस्थेतर्फे सध्या पर्यवेक्षक प्रशिक्षण, व्यवस्थापन विकास आणि कॉम्प्युटर ॲप्लिकेशन फॉर इंजिनीअर्स अँड मॅनेजर्स आदी कार्यक्रम राबविले जातात. अशोका उद्योग समुहाची गेल्या ३० वर्षातील यशाची ही चढती कमान आहे.

- **अशोका बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेड**
- **अशोका युनिव्हर्सल स्कूल...**
- **श्वेता ॲग्रोफार्म....**
- **अशोका हायवे रीसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट....**
- **अशोका एज्युकेशन फाउंडेशन**
- **अशोका ट्रेनिंग इन्स्टिट्यूट.....**
- **अशोका बायोग्रीन प्रायव्हेट लिमिटेड...**



ही यादी आणखी लांबवताही येईल. हे साम्राज्य अशोक कटारिया नावाच्या एकट्या माणसाने उभारले आहे..... 'शून्यातून विश्व निर्माण करणे' या वाक्प्रचाराचा अर्थ समजावून घ्यायला असेल, तर उत्तुंग आशावादाने भारलेल्या कटारिया यांना भेटणे क्रमप्राप्त आहे. अशोकजी मूळ सिन्नरचे. ते लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. घरातली परिस्थिती अत्यंत हलाखीची. वडील बाजारहाट करीत. गहू-बाजरी पोत्याने घेत आणि किलोवर विकत. दहा बाय बाराची एक खोली हेच कटारिया यांचे घर.



१९६४-६५ चे दिवस. अशोकजी नववीत असताना त्यांच्या बहिणीचे लग्न झाले आणि वडील तिच्याकडेच राहू लागले. मग अशोकजींनी नाशिक गाठले. राहण्याची व्यवस्था शरणपूर रोडवरील जैन बोर्डिंगमध्ये आणि शिक्षण पेठे हायस्कूलमध्ये. अकरावी-बारावीत चांगले गुण मिळाले. सिव्हिल इंजिनियर होण्याची इच्छा असल्याने त्यांनी पुणे इंजिनिअरिंग कॉलेजला ॲडमिशन घेतले. सुवर्णपदक पटकावत ते उत्तीर्ण झाले. शिक्षणानंतर अशोकजी पुन्हा नाशकात दाखल झाले. मधल्या काळात ते विवाहबद्धही झाले. त्यामुळे जबाबदारी आणखी वाढलेली. त्यांनी शासनाच्या आरोग्य विभागात नोकरी पत्करली; पण वेगळे काही करण्याची ऊर्मी त्यांना शासनाच्या नोकरीत रमू देईना. दोन वर्षे नोकरी केल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला अन् 'कुछ हटके' करण्याचे ठरवले. मधले काही दिवस असेच रिकामे गेल्यानंतर निफाड साखर कारखान्याच्या एका टप्प्याच्या उभारणीचे काम त्यांना मिळाले. बांधकाम क्षेत्राशी कोणताही संबंध नाही. तरी नवे काही करण्याची जिद्द उराशी बाळगून त्यांनी काम सुरू केले. या कामातून त्यांना दोन गोष्टी मिळाल्या. थोडासा पैसा आणि बराचसा आत्मविश्वास. यानंतर त्यांना एकलहरे औष्णिक विद्युत केंद्राचे मोठे काम मिळाले आणि जणू आयुष्याला कलाटणीच मिळाली.

'माझ्या आयुष्यातला टर्निंग पॉइंट म्हणाल तर तो. त्या कामामुळे जणू मी झपाटलोच. विश्वासाची माणसे जमा केली, पैसा उभा

केला. आम्ही सर्वांनी दिवस-रात्र एक केली. सुरुवातीला अठरा लाखांचे असलेले काम वाढत-वाढत पूर्ण होईपर्यंत ६२ लाखांपर्यंत गेले. तेव्हा सलग तीन-तीन दिवस मी साईटवर असे....' अशोकजींनी त्या कामात स्वत:ला किती झोकून दिले होते, याची कल्पना यावरून येते.



१९८५ मध्ये नेरूळ येथे असेच सिडकोचे ७०० घरांचे काम घेतले; मात्र तिथल्या दादागिरीमुळे ते सोडावे लागले. या कामात मोठा तोटा आला. काही दिवसांपूर्वीच खरेदी केलेले घरही विकण्याची वेळ आली, पण अशोकजी डगमगले नाहीत. दिंडोरी येथे एका प्रकल्पाचे काम मिळाले आणि ते पुन्हा उभे राहिले. त्यांनी काही विश्वासू सहकाऱ्यांना साथीला घेत 'अशोका बिल्डकॉन'ची स्थापना केली. 'अशोका'चे नाव होत गेले, लोकांचा विश्वास बसला आणि कामे मिळत गेली.

युती शासनाच्या काळात सार्वजनिक बांधकामांबाबत सरकारने 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' (बीओटी) पद्धत अवलंबली. 'अशोका'ने यात महत्त्वाची भूमिका बजावली. 'अशोका'च्या माध्यमातून राज्यात एकाहून एक भव्य प्रकल्प उभे राहिले. रस्ते विकासात 'अशोका'त अशोकाचा मोठा वाटा आहे. आज 'अशोका'चे काम देशभरात पोहोचले आहे. आकड्यात सांगायचे ठरले, तर सध्या देशभरात पंधरा हजार कोटींची कामे एकट्या 'अशोका'ची सुरू आहेत !

नाशिककरांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी अशोकजींनी 'अशोका इंटरनॅशनल स्कूल'ची उभारणी केली. अशोका समूह अनेक क्षेत्रांत जोमाने कार्यरत आहे. बायोगॅस क्षेत्रातही या समूहाचे मोठे काम सुरू आहे. एवढी झेप घेऊनही अशोकजी म्हणत असतात-

'गाठण्यासाठी आणखी खूप शिखरे आहेत... शिक्षणाच्या अत्युत्तम सोयीसाठी नाशिकमध्ये आंतरराष्ट्रीय विद्यापीठ उभारण्याचे माझे स्वप्न आहे. नाशिकचे नाव जगाच्या नकाशावर झळकवायचे आहे... - थेंबातून समुद्र निर्माण करूनही नवे काही करण्याची अशोकजींची तहान किंचितही कमी झालेली नसते.... उलट तिला वयाबरोबर वाढणाऱ्या उत्साहाची सळसळणारी साथ लाभलेली असते.....



# उद्योजकता आणि सेवाकार्याचे 'महाराज' बीरमानी

गोरख पगार

नाशिकरोड देवळाली कॅम्प रस्त्यावर 'शिवानंद इलेक्ट्रॉनिक्स' नावाची एक कंपनी आहे. याच कंपनीत मेटल डिटेक्टर तयार केले जातात. श्री. महाराज किशन बिरमानी त्यांच्या पत्नी सौ. रोमा बिरमानी हे शिवानंद इलेक्ट्रॉनिक्स चे संचालक. महाराज किशन बिरमानी यांचा जन्म ३१ मे १९४५ रोजी पाकिस्थानातील सरगोदा येथे झाला. त्यांच्या जन्मानंतर दोन वर्षांनी भारत पाकिस्थानची फाळणी झाली. फाळणीनंतर बिरमानी कुटुंब भारतात आले. त्यांचे वडिल कर्नल बिरमानी आर्मीमध्ये होते. त्यांच्या ठिकठिकाणी बदल्या होत त्यामुळे मुलांची शिक्षणं गावोगावी होत गेली. महाराज किशन बिरमानींनी शेवटची इंजिनियरींगची पदवी १९६६ साली खरगपूर येथून घेतली. इलेक्ट्रॉनिक्समध्ये ते बी.ई. झाले. त्यानंतर त्यांनी पाच वर्षे "मोटवाणी कंपनीत" मुंबई येथे आणि नाशिकरोडयेथे काम केले. जनरल मॅनेजर म्हणून ते मोटवानीतून रिटायर झालेत.





अगदी कॉलेजात असल्या पासूनच आपण स्वत: काहीतरी वेगळं करावं असे विचार त्यांच्या मनात होते. नोकरी करीत असतांनाही ते याच दृष्टिने प्रयत्नशील होते. त्यांचे वडिल कर्नल बिरमानी १९७० मध्ये आर्मीतून निवृत्त झाले. त्यांनी आर्मीसाठी काही वस्तू विकसित केल्या होत्या. आर्मीसाठी ट्रेनिंग एडस् तसेच आर्टिलरी (तोफखान्यासाठी) लागणारे इलेक्ट्रॉनिक गॅझेट त्यांनी तयार केले होते. त्यावेळी हे भारतात तयार होत नव्हते बिरमानी पिता-पुत्रांनी संशोधनातून ती तेथेच विकसित करून तयार केले. त्यांनी बनविलेल्या वस्तू उपयुक्त टिकावू आणि खात्रीशीर होत्या शिवाय परदेशातील वस्तूंपेक्षा त्यांच्या किंमतीही कमी होत्या. त्यांच्या या वस्तू आर्मीतील अधिकाऱ्यांच्या पसंतीस उतरल्या. त्यामुळे त्यांना आर्मीची ऑल इंडियाची पर्चेस ऑर्डर मिळाली. त्यांच्या ३/४ वस्तू तर आर्मीत अतिशय लोकप्रिय झाल्या. त्यांच्याकडे आर्मीची ऑर्डर वाढली त्यामुळे महाराज किशन बिरमानी यांनी १९७० मध्ये नोकरी सोडून पूर्णवेळ या वस्तूंच्या उत्पादनाला सुरूवात केली.

"आम्ही आजवर अशाप्रकारे २०० विविध प्रकारच्या वस्तू तयार केल्या आहेत." त्यातील बहुतेक उत्पादने भारतात प्रथमच तयार झाली. ही सगळी उत्पादनं केवळ आर्मीसाठी नव्हतीतर सर्वसामान्य माणसांच्या उपयोगाचीही अनेक उत्पादने आहेत.

## समाजसेवा

बिरमानी कुटुंब अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचे आहे. स्वत: महाराजा बिरमानी त्यांच्या पत्नी सौ. रोमा बिरमानी कंपनीच्या समाजसेवी विभागाकडे जातीन लक्ष देतात.

'कंपनीचं नाव शिवानंद - इलेक्ट्रॉनिक्स आहे," बिरमानी सांगतात, 'स्वामी शिवानंदजी यांच्या प्रेरणेनेच हे सगळं काही होत आहे. त्यांचे गुरू श्री सचिदानंदजी हे महाराजा किशन यांचेही गुरू. त्यांचा मुख्य आदेश आहे. सेवा होनी चाहिए! म्हणून आम्ही कंपनीचा एक 'मोटो' बनविला आहे. शक्य होईल तितकी समाजसेवा आम्ही करतो.

हुषार विद्यार्थ्यांना. शैक्षणिक प्रगतीसाठी शैक्षणिक व आर्थिक सहाय्य करण्यात बिरमानी कुटुंब आघाडीवर आहे. अशा प्रकारे मदतीमुळे स्वत:च्या पायावर उभ राहिलेल्या काहींचे विवाह झाले तर काही त्यांच्यात कंपनीत कामाला लागले आहेत. हे सगळ तर केलं जातंच परंतु राष्ट्रीय पातळीवर आश्रम चालविणे समाजोपयोगी कार्यासाठी आर्थिक सहाय्य करणे ही कामंही केली जातात.

औद्योगिक विकास करीत असतांना समाजासाठी काही करणाऱ्या कंपन्या अगदी कमी आहेत. शिवानंद इलेक्ट्रॉनिक्स ही त्यातली एक. अशा काही कंपन्या वाढल्यातर समाजातील दैन्य दु:ख दारिद्रय थोड्या फार प्रमाणात तरी दूर होऊ शकेल.

# सद्हेतू, गुणवत्तेचा ध्यास आणि स्वप्ने वास्तवात...

# दीपक बागड आणि कुटुंबियांचा व्यवसाय

श्री. बागडांनी मोठं होण्याची स्वप्न पाहिली, काहीतरी करून दाखवायचे स्वप्न पाहिले आणि आपल्या आईला तिने प्रतिकूल दिवस पाहिले म्हणून चांगले दिवस बघायला मिळावेत म्हणून कष्टाला सुरुवात केली. सर्व भावंडांना बरोबर घेतलं, एक नेतृत्व करायला घेतले आणि त्यात ते प्रचंड यशस्वी झाले हे अगदी अपवादात्मकरित्या पाहायला मिळतं. श्री दीपक बागड यांच्या बाबतीत ही बाब अतिशय महत्त्वाची. त्यांनी स्वप्न पाहिलं आणि ते वास्तवात आणलं, ते जो व्यवसाय करतात त्यातून समाधान मिळविण्याचा प्रयत्न केला. कधीही नफा मिळतो की नाही हे पाहिलं नाही पण कामातून समाधान मिळत असताना तो आपोआप मिळत गेला असं त्यांच्या बाबतीत आणि त्यांच्या व्यवसायांच्या बाबतीत झाले. ही एक मोठी फॅमिली आहे. सर्वांचा व्यवसाय एकत्रित स्वरूपाचा आहे आणि ते सर्व एकत्रित ठेवण्याचे कसब श्री. दीपक बागड यांच्याकडे आहे ही बाब येथे नमूद करण्यासारखी आहे.

दीपक बागड, त्यांचे कुटुंबिय आणि इतर सहयोगी यांचे नाशिक शहरातील रिअल इस्टेट क्षेत्रातील योगदान शहराच्या शिस्तबद्ध विकासाला, गुंतवणुकदारांच्या हिताला आणि घराचे स्वप्नं पाहणाऱ्या ग्राहकांच्या फायद्यासाठी कारणीभूत झाले आहे. शिवाय त्यांच्या सारख्या व्यावसायिकांमुळे या क्षेत्रात नाशिकमध्ये बऱ्याच अंशी पारदर्शकताही राहण्यास मदत झाली. व्यवसाय करावा पण सत्यनिष्ठेने ही आईची शिकवण आम्हाला उपयुक्त आणि मोलाची ठरली तसेच आई आमचा प्रेरणास्त्रोत आहे असे बागड बंधू सांगतात.... व्यवसाय म्हणजे निस्वार्थी वृत्तीने केलेली समाजसेवा नाही. परंतु ग्राहकाला त्यांच्या धनाच्या मोबदल्यात अप्रतिम देण्याचे आणि त्याची दुवा मिळविण्याचे उत्कृष्ट माध्यम आहे आणि हे तंत्र साध्य झाले तर त्यापेक्षा मोठे समाधान नसते. हे व्यवसायाबाबतचे श्री. दीपक बागड यांचे धोरण आहे. व्यवहारात उलाढाल नक्की होते. पण त्याचे स्थान दुय्यम स्वरूपाचे असावे, कारण कामाचे समाधानच प्रथम क्रमांकाचे असेही श्री. दीपक बागड म्हणतात. एखाद्या व्यावसायिकाच्या जीवनात असा काळ येण्यासाठी खूप थांबावे लागते. त्यासाठी भरपूर संयम आणि शॉर्टकट मार्गाने येणाऱ्या पैशाच्या त्यागाची तयारी ठेवावी लागते असेही श्री. बागड म्हणतात. श्री. बागड या

**दीपक बागड यांना साधारण 22 वर्षांपासून मी ओळखतो. श्री दीपक बागड यांना भेटणे त्यांच्याशी चर्चा करणे, त्यांना जवळून पाहणे, त्यांचं बोलणं चालणं व परिस्थिती हाताळण्याची पद्धत, तसेच ग्राहकांना सहकार्याची प्रवृत्ती अतिशय अनोखी आहे. विशेष म्हणजे ह्या माणसाने खूप मोठे यश मिळवले, ज्याला केवळ अफलातून म्हणावे असे, ज्याच्यावर विश्वास बसणार नाही असे. आणि जे एका मराठी माणसाच्या बाबतीत अनपेक्षित आहे. उद्योगात येण्यासाठी फारसं भांडवल नव्हतं, अतिशय शून्यातून सुरुवात केलेला हा उद्योजक नाशिकमध्ये बांधकाम व्यवसायात अतिशय मोठा झाला. असे असले तरी अहंकाराचा स्पर्श त्यांना झाला नाही. मोठं काम उभं राहिलं असतानाही त्यांचे पाय जमिनीवर आहेत. सर्वसामान्यांना भेटणे आणि त्यांच्याशी हितगुज करत, त्याच्या अडीअडचणी समजून घेत त्यांना विकासाची दिशा दीपक बागड यांनी दाखविली आहे. हे सर्व पाहिल्यानंतर एखादा माणूस यशस्वी का होतो याची कारणमिमांसा करता येते.**




चंद्रकांत बागड


राजेंद्र बागड


विलास बागड


अनुपकुमार बागड


सुशील बागड


विक्रांत बागड



रोहन बागड


पवन बागड


अजिंक्य बागड


धनंजय बागड


वैभव बागड


संकेत बागड

मार्गाने गेले आणि तेवढाच धिरोदात्तपणा त्यांनी आजही कायम ठेवला. मुळात बागड बंधुंना एखाद्या व्यवहारात अनुभवणे हेच खूप शिकवून जाणारे आणि मोठे समाधान देणारी बाब आहे. त्यांचा एकजिनशीपणा, भावा-भावांमधील व्यावसायिक समन्वय अपवादात्मक आणि म्हणूनच नाशिक शहरांत प्रशंसनीय उदाहरण ठरले आहे. बागड असोसिएटस् या कंपनीचे संचालक असलेले बागड बंधू मूळ सटाणा येथील. सर्वच प्रखर मातृ-पितृ भक्त आणि त्यांनाच आपले दैवत मानणारे. मात्र ही सर्व भावंड लहान असतानाच वडीलांचे अकाली निधन झाले आणि मोठे दु:ख त्यांनी अनुभवले. या प्रसंगाची आठवण होताच आजही बागड बंधू भावविभोर होतात. तेव्हाचा प्रसंग सांगताना श्री. दीपक बागड व विलास बागड (आप्पा) सांगतात. आमचा परिवार तसा मोठा. पण आईने सर्व भावांत मानसिक बळ निर्माण केले. तिने आणि मोठ्या भावाने कुटुंबाला आधार देणे सुरू केले. त्यामुळेच आमच्या सर्व भावांत कष्टाची प्रेरणा निर्माण झाली. हे सर्व घडत असतांना मी अत्यंत लहान होतो. बंधूछत्र अनुभवत होतो. त्यांनी सर्व भावांमध्ये एकजिनसीपणा निर्माण केला. बालपणीच त्यांना कुटुंबाला आधार द्यावासा वाटू लागला आणि इच्छाशक्ति प्रबळ असेल तर काही गोष्टी मनासारख्या घडतात असा अनुभव त्यांना आला. त्यांना लवकरच कमावते व्हावे लागले. पुढे काही वर्ष नोकरी केली. इतर भाऊही विविध नोकऱ्यांमध्ये होते. पण नोकरीपेक्षाही व्यावसायिक माध्यम आणि अधिक कष्टाची प्रेरणा स्वस्थ बसू देत नव्हती. अधिक कष्टासाठी व्यवसाय हेच योग्य माध्यम असल्याचे त्यांना जाणवले. आणि अत्यंत लहान प्रमाणात प्रथम बिल्डिंग मटेरियल सप्लायचा व्यवसाय त्यांनी भावांसह सुरू केला. त्यात घट्ट पाय रोवून उभे राहिले आणि विचारपूर्वक बांधकाम व्यवसायात प्रवेश केला. अत्यंत सुंदर इमारती उभ्या केल्या. आज उत्कृष्ट बांधकाम व्यावसायिक म्हणून बागड बंधूंकडे पाहिले जाते. त्यांचे यश उद्योजकतेची व्याख्या निश्चित करणारे ठरले. सर्व भावांचा एकत्रित व्यवसाय. पुढे सुशील आणि विक्रांत तसेच धनंजय आणि संकेत या भावांच्या माध्यमातून दुसरी पीढीही बांधकाम व्यवसायात आली. सुशीलने तर अल्प वयातच महत्वाकांक्षी प्रकल्पांची उभारणी केली. आज व्यवसायाच्या माध्यमातून समग्र समाजासाठी बागड बंधुंनी आदर्श उदाहरण निर्माण




केलं आहे. या व्यवसायात होणारे फसवणुकीचे प्रकार पाहिल्यानंतर बागड बंधुंसारखे व्यावसायिक समाजात आहेत ही भाग्याचीच गोष्ट ठरावी. उद्योग आणि उद्योजकता या संदर्भात बोलतांना श्री. दीपक बागड म्हणाले, उद्योगाचे व्यवस्थापन आणि उद्योजकता विकास हा संपूर्ण जगभर संशोधनाचा विषय आहे. त्या अनुषंगानेच अनेक बिझनेस स्कूल जगभर वास्तवात आल्या, उद्योजकता विकासाचेही वर्ग चालतात. परंतु उद्योजक हा खरोखर जन्मावाच लागतो. आपल्यामधील क्षमतांना तो स्वत:हूनच वाव निर्माण करतो, त्यासाठी योजना आखतो, परिश्रमाची तयारी ठेवतो, भीषण वास्तवाला सामोरा जातो. एकटा नाही तर सहृदयी लोकांना बरोबर घेऊन, आणि त्या सर्वांच्या हिताचा विकासाचा विचार करतो, तोच खरा उद्योजक. अशी व्यक्ति उद्योगात यशस्वी होण्याची शक्यता अधिक असते. उद्योगातील त्यांचे यश कायमचे असते आणि उत्तरोत्तर ते वाढत जाते. उद्योग क्षेत्रात ज्या औद्योगिक घराण्यांनी इतिहास निर्माण केला त्या सर्व घराण्यांचे मुळ पुरुष याच वृत्तीचे आढळून येतात आणि तोच उद्योजकतेचा खरा इतिहास आहे. असे उद्योजक शंभर वर्षापूर्वी अपवादात्मक होते. आणि आजही तेवढेच अपवादात्मक आहेत.

गोरख पगार

# उद्योग विश्वातील एकमेवाद्वितीय उद्धव आहेर आणि त्यांची उद्योजकता !

**प्रतिकूल परिस्थितीत सुरू झालेल्या आनंद ॲग्रो ग्रुपच्या अविरत परिश्रमाला रौप्यमहोत्सवी वर्षाचे कोंदण लाभले आहे. उत्तर महाराष्ट्रामध्ये पुनद-गिरणा खोऱ्यात रुजलेल्या या इवल्याशा रोपट्याचा वेलू गगनावरी गेला आहे. नावीन्यपूर्ण संकल्पना, प्रागतिक धोरणांची अंबलबजावणी आणि आधुनिक व्यवस्थापन सुविधांसह ग्रामीण भागातील 'पोल्ट्री फार्मिंग'च्या मॉडेलचा देशभरात नावलौलिक निर्माण झाला आहे. समूहाचे अध्यक्ष उद्धव आहिरे यांचा 'शेतकरी पुत्र ते प्रतिभाशाली उद्योजक' असा उद्योजकीय प्रवास आदर्शवत आहे. गेल्या २५ वर्षांत या शेतकरी पुत्राने पोल्ट्री उद्योगातून अनेकांच्या आयुष्यात आनंद पेरला आहे.**



उद्धव आहिरे यांची शेतकरी कुटुंबातील पार्श्वभूमी. वडील आनंदा आहेर पाटील हे सामाजिक आणि राजकीय चळवळीत परिसरात लौकिक मिळवलेले व्यक्तीमत्व. शेतीतील कष्टमय जीवनामुळे मुलाने शिकून नोकरी करावी असा त्यांचा आग्रह होता. भौतिकशास्त्र विषयात पदवी घेत असताना शासकीय पोल्ट्रीविषयक प्रशिक्षणाची जाहिरात पाहण्यात आली. प्रशिक्षण तर मोफत होतेच, सोबत प्रशिक्षण भत्ताही मिळणार होता. वसतिगृहामध्ये शिकत असताना पैसे मिळवण्याची ही मोठी संधी वाटली. मात्र, या प्रशिक्षणाने पोल्ट्री उद्योगाचे बीज मनात पेरले. विनाअनुदानित प्राध्यापकाची नोकरी करण्यापेक्षा १९९७ मध्ये कळवण औद्योगिक वसाहतीत ३,५०० पक्षीक्षमतेचा पोल्ट्री व्यवसाय सुरू करण्याचे पसंत केले. आज २० लाखांहून अधिक पक्ष्यांच्या संगोपनात काम वाढले आहे. ही झेप घेताना सोबत प्रचंड कष्ट राहिले. हे यश म्हणजे फक्त 'विकास' व 'विस्तार' नसून शेतकऱ्यांसोबत जपलेला 'विश्वास' आहे. "सारे मिळून समृद्धीकडे" या समूहाच्या ब्रीदाप्रमाणे शेतकरी व सहकाऱ्यांबरोबर प्रगतीची वाट सुरू आहे.

### करार पद्धतीने कुक्कुटपालन व्यवसायाचा विस्तार

२००२ पर्यंत व्यवसाय व्यक्तिगत स्वरूपाचा होता. त्या वेळी राष्ट्रीय स्तरावरील पोल्ट्री कंपन्या कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग पद्धतीने विस्तारित होत्या. त्यामुळे समोर काही आव्हाने दिसत होती. त्यामुळे 'फार्मर' राहावे की 'ऑपरेटर' व्हावे, अशी द्विधा मनःस्थिती होती. मात्र तांत्रिक ज्ञान, भांडवल व कुशल मनुष्यबळ नसतानाही करार पद्धतीने व्यवसायात पाय रोवला. हजारो सहयोगी शेतकऱ्यांना जोडले. मात्र काही मर्यादा येऊ लागल्या. त्यातूनच २००६ मध्ये ब्रीडर फार्म, हॅचेरीज, फिडमिल सुरू करण्याचा निर्णय घेतला. मराठी माणसाने या नवख्या व्यावसायिक संकल्पनेत आदर्श व्यवस्थापनातून गेल्या २५ वर्षात अनेक मैलाचे दगड पार केले.

### शेतकरी हिताचे मका खरेदी मॉडेल

कुक्कुट खाद्यामध्ये स्वयंपूर्णता आणण्यासाठी सन १९९८ पासून थेट शेतकऱ्यांकडून मका खरेदीच्या नावीन्यपूर्ण प्रकल्पाला सुरूवात झाली. पारदर्शक पद्धतीने खरेदी व चोख व्यवहार यातून शेतकऱ्यांचे हित साधले जाईल असा विचार कायम जपला. खुला मका खरेदी करून दररोज दर जाहीर करण्याची पद्धत त्यांच्यामुळेच बाजारात रूढ झाली. प्रतिदिन ३००

## 'आनंद ॲग्रो ग्रुप' बनलय एक कुटुंब

आई- वडिलांची प्रेरणा, कंपनीच्या संचालिका व अर्धांगिनी सौ. वैशाली यांची समर्थ साथ मिळते. याशिवाय आंतरराष्ट्रीय व्यवसाय व्यवस्थापन क्षेत्रात पदवीधर असलेली कन्या श्रुती हिची मदत व्यावसायिक विस्तारात होत आहे. याशिवाय प्रगतीच्या वाटेत असलेले सहकारी, कुशल मनुष्यबळ, तज्ञ यांची साथ मोलाची लाभल्याने आनंद ॲग्रो ग्रुप एक कुटुंब बनल्याचा प्रत्यय येतो. व्यवसाय करताना सामाजिक दायित्वाची भावना जोपासत साहित्य, शिक्षण, कला, क्रीडा, महिला सक्षमीकरण या क्षेत्रात सक्रीयपणे योगदान दिले जात आहे.



टनांपेक्षाही अधिक मका खरेदी केला जातो. मालाच्या प्रतवारीनुसार दर, अडत हमालीविना खरेदी व पुढील २४ तासांच्या आत शेतकऱ्यांना थेट खात्यावर पैसे मिळतात. मक्याचे अपेक्षित दर मिळण्यासाठी शेतकऱ्यांना उत्पादन, काढणीपश्चात प्रतवारी, वाळवण यासाठी सातत्याने प्रबोधन केले जाते. त्यामुळे उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा येथून मोठ्या प्रमाणावर मका येत असतो. कंपनीने भऊर, कोल्हापूर फाटा व कळवण या तीन केंद्रांवर खरेदी होत असते. मका साठवणीकरिता १ लाख क्विंटल क्षमतेचे स्वतःचे वेअरहाउस असून, यासाठी स्पेन येथून सायलो आयात केले. आनंद ॲग्रोचा दर हा परिसरात 'बेंचमार्क' ठरत आहे. यामुळेच २० हजार मका उत्पादक शेतकरी थेट आनंद ॲग्रोशी जोडले गेले. याबरोबरच खाद्यनिर्मितीकरिता प्रतिदिन ४०० टन पॅलेट फीड उत्पादनक्षमता असलेला स्वयंचलित कारखाना उभारला. गुणवत्तापूर्ण उत्पादन प्रक्रियेद्वारे सर्वोत्तम दर्जाची खाद्य निर्मिती हे या समूहाचे गुणवैशिष्ट्य आहे.

### व्यवसाय दृष्टिक्षेपात

■ खेडगाव, बार्डे, हिंगळवाडी, एकलहरे, दह्याने व ठेंगोडा ■ येथील १.२५ लाख पक्षी क्षमता, ब्रीडर्स फार्ममधून दररोज १.५० लाख अंडी उत्पादन. ■ ओपनहाऊन पद्धतीचे फार्म जैविक सुरक्षितता आणि गुणवत्तेमध्ये अध्य ■ कंपनीच्या नावावर 'मल्टी एज ग्रुप' गटात सर्वोच्च कामगिरीची नोंद. ■ कुशल मनुष्यबळासह संशोधन आणि नवनवीन तंत्रज्ञानाची कामकाजात जोड. ■ ब्रॉयलर पक्षी निर्मितीकरिता १.२५ लाख अंडी ■ उबवणक्षमतेची अत्याधुनिक हॅचरी ■ नाशिक, धुळे, नंदुरबार, नगर, पुणे व दक्षिण गुजरातमध्ये पिलांचा पुरवठा. ■ राज्यभरात १६ शाखांचा विस्तार. ■ पोल्ट्री इंटिग्रेशनच्या माध्यमातून ५००० लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार.

### सोयाबीन खरेदीतून प्रक्रियेकडे नवी आश्वासक वाटचाल

कुक्कुटखाद्य उत्पादनात सोयाबीन व मक्याचा वाटा ८५ टक्के असतो. त्यामुळे उद्योगाची गरज ओळखून २५० टन प्रतिदिन क्षमतेचा सोयाबीन प्रक्रिया प्रकल्प कंपनीने उभारला आहे. त्यातून उच्च दर्जाची प्रथिनयुक्त सोया पेंड, सेंद्रिय पद्धतीने हेक्झीनविरहित प्रक्रियायुक्त सोया क्रूड ऑइल उत्पादन घेतले जात आहे. कॅनडा व अमेरिकेच्या निर्यात धोरणानुसार हे कामकाज होणार आहे. महाराष्ट्रात शेतकऱ्याने उभारलेला हा पहिलाच मोठा प्रकल्प असणार आहे. त्यामुळे मक्याच्या धर्तीवर उत्तर महाराष्ट्र व मराठवाड्यातून सोयाबीन खरेदी केली जाणार आहे. सेंद्रिय सोयाबीन उत्पादनाची गरज ओळखून त्याची जनजागृती हाती घेतली आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना तांत्रिक ज्ञान देणार असून, गुणवत्तापूर्ण सोयाबीनला हमीभाव देण्याची त्यांनी योजना आखली आहे...समूहाद्वारे गेली २४ वर्षे पारदर्शक पद्धतीने थेट मका खरेदी सुरू आहे. याच धर्तीवर आता सोयाबीन खरेदी यंदापासून सुरू करण्यात आली आहे. 'आनंद ॲग्रो'ची मका खरेदी शेतकरीप्रिय ठरल्याने सोयाबीनबाबत तसा प्रतिसाद मिळत आहे. प्रक्रियेसाठी सोयाबीन खरेदी केला जाणार आहे. १०:२:२ म्हणजे दहा टक्के मॉइश्चर (मालातील आर्द्रता), ओलफॉरेन मॅटर (माती, काडी-कचरा, दगड व इतर घटक), डॅमेज (डागी, काळे पडलेले, सुरकुतलेले, पावसात भिजलेले) असे असेल. कंपनीचा प्रतिनिधी वरील निकषांची चाचणी करून भाव ठरवेल. शेतकऱ्यांना योग्य वाटल्यास ते विक्रीचा निर्णय घेऊ शकतील. शेतकरी कंपन्या तसेच लहान व्यापाऱ्यांना आवाहन करण्यात आले आहे. जीएसटी सूट अंतर्गत बिगर नोंदणीकृत ( URD) पेमेंटच्या माध्यमातून ४० लाख रुपये मूल्याचा माल विकता येणार आहे. बाजारभावानुसार माल विक्री झाल्यानंतर २४ तासांत बँक खात्यात पेमेंट दिले जाणार आहे.

### २५०० युनिट सहवीजनिर्मिती प्रकल्प

कार्बन उत्सर्जन कमी करण्यासह पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी समूह सातत्याने प्रयत्नशील आहे. ठेंगोडा येथील वातावरण नियंत्रित ब्रीडर फार्ममधून मिळणाऱ्या कुक्कुट विष्ठेपासून २५०० युनिट सहवीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. यातून निघालेली दररोज ३० हजार लिटर स्लरी शेतकऱ्यांना मोफत वितरित केली जाते.

### 'फॉरवर्ड इंटिग्रेशन'च्या माध्यमातून प्रगतीची नवी वाट

आतापर्यंत बॅकवर्ड इंटीग्रेशनमध्ये यशस्वी झाल्यानंतर फॉरवर्ड इंटीग्रेशनच्या माध्यमातून रिटेल मार्केटमध्ये नव्या संधी निर्माण करण्यात येत आहेत. चिकन विक्री व्यवसायाला अत्याधुनिकतेची जोड देत नाशिक शहरात १० सुसज्ज विक्री दालने उभारली आहेत. आंतरराष्ट्रीय मानकांचा अभ्यास करून 'प्रो चिकन' ब्रँड नावारूपास आणला आहे. स्वच्छता व गुणवत्तेची हमी देत पारंपरिक विक्रीला एक सक्षम पर्याय देण्यात आला आहे. मूल्यवर्धित उत्पादने बाजारात आणण्याचा मानस आहे. समूहाचा विस्तार करतांना 'आयओटी' तंत्रज्ञान माध्यमातून व्यावसायिक कामकाजात अचूकता आणली जात आहे. ■

# 'आनंद ॲग्रो'तर्फे 10 लाख क्विंटल मका अन सोयाबीनची थेट शेतकऱ्यांकडून होणार खरेदी



आम्ही! "आनंद ॲग्रो समूह'ला मका, सोयाबीन विकतो. कारण पैशांसोबत सन्मान मिळतो!, अशी भावना रुजवणारा आनंद ॲग्रो समूह' रौप्यमहोत्सवी वर्ष साजरा करत आहे. यंदाच्या हंगामात 'आनंद ॲग्रो समूह' तर्फे नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यांतील थेट शेतकऱ्यांकडून पाच लाख क्विंटल मका आणि खानदेशप्रमाणे नाशिक, नगर जिल्हा आणि मराठवाड्यातील थेट शेतकऱ्यांकडून पाच लाख क्विंटल सोयाबीन करण्याचा निर्णय घेतला आहे. समूहाच्या रौप्यमहोत्सवानिमित्त तरुण शेतकऱ्यांना व्यापाराची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. समूहातर्फे शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या मका, सोयाबीनचे पैसे शेतकऱ्यांच्या बँकेतील खात्यात 'आरटीजीएस'च्या माध्यमातून जमा केली जाते आणि एसएमएसद्वारे त्याची माहिती शेतकऱ्यांना कळविण्यात येते. 'आनंद ॲग्रो समूह चे अध्यक्ष उद्धव आहिरे यांच्या संकल्पनेतून १९९० च्या दशकात आर्थिक सुधारणांचे वारे वाहत असताना 'आनंद ॲंग्रो'चे बीज अंकुरले. १९९५ मध्ये कळवण (जि. नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये बेदाणा प्रक्रियेतून व्यवसायाची सुरवात झाली. १९९७ मध्ये 'पोल्ट्री'ची मुहूर्तमेढ रोवली गेली. 'आनंद ॲग्रो समूह'मध्ये स्वतंत्र सहा व्यवसाय आहेत. स्वत:ची हॅचरी, ब्रीडिंग फार्म, फीड मील असा 'सेटअप' आहे. 'आनंद ॲग्रो समूह' २००३ पासून 'कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग मध्ये कार्यरत आहे. नाशिक, धुळे, नंदुरबार, नगर, पुणे अशा पाच जिल्ह्यांत कार्यक्षेत्र विस्तारले आहे. समूहमधील एस. ॲन्ड पी. फीडस प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी भऊर (ता. देवळा) येथे पोल्ट्री आणि पशुखाद्याचे उत्पादन करते. अलीकडे ग्रुपने दिवसाला २५० टन क्षमतेचा सोयाबीन प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित केला. प्रक्रिया उद्योगात सेंद्रिय पद्धतीने उत्पादन घेतले जाते. नोव्हेंबरमध्ये मराठवाडा आणि नगर जिल्ह्यांत सोयाबीन खरेदी केंद्रे सुरू करण्यात येतील. मका - सोयाबीन खरेदीची पंचसूत्री किफायतशीर आणि निश्चित दर मका-सोयाबीन विक्रीसाठी आणण्यापूर्वी शेतकऱ्यांना काय भाव मिळणार, ही माहिती असते. शेतकऱ्यांसाठी किफायतशीर भाव जाहीर करण्यात येतो.

**पारदर्शकता** : मका- सोयाबीन खरेदीपासून ते शेतकऱ्यांना पैसे देईपर्यंतची प्रक्रिया पारदर्शक आहे. शेतकऱ्यांच्या समोर मका, सोयाबीनची गुणवत्ता चाचणी, वजन केले जाते. कटती, घट, आडत, हमाली अशी कुठल्याही प्रकारची कपात केली जात नाही. शेतकऱ्यांचे प्रशिक्षण मका, सोयाबीन आणताना त्याची प्रत, गुणवत्ता आणि आर्द्रता याविषयी समूहचे कर्मचारी शेतकऱ्यांना माहिती देतात. १२ टक्के आर्द्रतेच्या मक्याला आणि १० टक्के आर्द्रतेच्या सोयाबीनला भाव मिळत असल्याने शेतकरी जागरूक झाले आहेत. वेगवान प्रक्रिया आणि पैसे : समूहाच्या प्रवेशद्वारावर जमा शेतकऱ्यांचा माल आल्यावर एका तासात सर्व प्रक्रिया पार पाडून मालाची रक्कम 'आरटीजीएस'द्वारे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. दिवसाला ३०० टनांहून अधिक माल खरेदीची क्षमता असल्याने शेतमाल साठून राहात नाही.





शेतकरी केवळ शेतमाल पिकवत नाहीत. त्यांची ती एक सुंदर नवनिर्मिती असते, हे आम्ही जाणतो. म्हणूनच शेतमाल खरेदी करताना त्याकडे केवळ एक सौदा म्हणून पाहत नाही. आमच्यासाठी बळीराजाप्रति कृतज्ञ होण्याची ती एक संधी असते.

**- उद्धव आहिरे** (अध्यक्ष, आनंद ॲग्रो समूह)

## व्यापाराची संधी

शेतकरी कंपन्या अथवा व्यापारात पदार्पण करू इच्छिणारे तरुण शेतकरी आपल्या गावातील मका, सोयाबीनची थेट विक्री करण्यासाठी पुढे येऊ शकतात. जीएसटी सूट अंतर्गत बिगरनोंदणीकृत (यूआरडी) पेमेंटच्या माध्यमातून ४० लाख रुपयांचा माल आपण विकू शकता. बाजारपेठेतील दरानुसार माल विक्री झाल्यावर २४ तासांत बँक खात्यात पैसे जमा होतात. त्यासाठी इच्छुकांनी संपर्क करावा, असे 'आनंद ॲग्रो समूह तर्फे सांगण्यात आले.

**परस्पर सहकार्य :** पोल्ट्रीतील करार पद्धतीत सहयोगी असणारे अनेक शेतकरी ग्रुपला मका आणि सोयाबीन पुरवतात. शेतकऱ्यांना तयार पोल्ट्री खाद्याची पोच दिल्यानंतर त्याच वाहनातून मका आणि सोयाबीन घेऊन परत येतात.

**पाला-** (सोयाबीनमधील पाचोळा, माती, काड्या, निकृष्ट दाणे वेगळे केल्याने चांगला भाव मिळतो. मका विक्रीसाठी आणताना वाळवून आणायचा आहे. मका, सोयाबीन विक्रीस आणताना सोबत राष्ट्रीयीकृत बँकेच्या पासबुकची झेरॉक्स असावी.)

**सोयाबीन व मका खरेदीसाठी आणि व्यापार संधीसाठीचा संपर्क - सोयाबीन** : १) धनीराम जोशी - ९०२२१५३७६३, २) पुरुषोत्तम पगार- ९८९०७३३७६९ ३) आराई रोड ठेंगोडा (ता. बागलाण) - ९०२२१५३७३६, ४) कनाशी (ता. कळवण) - ९४२०९१८०५१ मका : १) भऊर (ता. कळवण) - ८३०८८०७४६१, २) कोल्हापूर फाटा कळवण-८८८८८२९७१०, ३) कनाशी (ता. कळवण) - ९४२०९१८०५१

# सर्वांगीण विकासाच्या शोधावर काम - दीपक चंदे

गोरख पगार

**नाशिक आणि नाशिकरोडच्या व्यावसायिक जडण-घडणीत श्री. दीपक चंदे आणि त्यांच्या दीपक बिल्डर्स व डेव्हलपर्सचा अतिशय मोठा वाटा आहे. नाशिकरोड परिसरात सुंदर व्यापारी संकुले त्यांनी उभारली.**





दीपक चंदे

नाशिक येथील आघाडीचे बांधकाम व्यावसायिक दीपक चंदे यांचा प्रवास फ्लॅश डोअर्स पासून सुरू होतो. प्रथम ते फ्लॅश डोअर्सचे उत्पादक होते आणि आज नाशिक येथील नामवंत बांधकाम व्यावसायिक आहेत. चंदे म्हणतात- बांधकाम व्यवसायात बांधकामाच्या दर्जाची सर्वात महत्त्वाची भूमिका आहे.

आपल्या बांधकामांबाबत बोलताना श्री. दीपक चंदे म्हणाले, आम्ही गुणवत्तेस महत्त्व देत आहोत, याचा दाखला म्हणजे आमचे ग्राहक. ते कोण आहेत, यालाही महत्त्व आहे. बांधकामाचा प्रत्येक घटक अत्यंत दर्जेदार, तपासूनच घेतला जातो. आपल्या व्यवसायाबाबत बोलताना श्री. चंदे म्हणाले, आमचा जन्म व्यवसायासाठीच झाला आहे. माझे आई-वडील व्यवसायात होते. नोकरीचा तर कधी विचारही आम्हाला शिवत नाही. कारण नोकरीत माणूस अल्पसंतुष्ट बनतो व्यवसायात मर्यादा नाहीत. फक्त सर्वच बाबतीत प्रामाणिक असायला हवे. बोलताना श्री. चंदे म्हणाले, वडील कै. कल्याणजी चंदे व आई सौ. लक्ष्मीबाई चंदे यांचाही व्यवसाय होता. आणि श्री. दीपक यांचे भाऊ श्री. दिनेश हेही बांधकाम व्यवसायात आहेत. नाशिकरोडचे अनेक चांगले प्रकल्प त्यांनी साकारले असून आता अनेक प्रकल्पांचे काम सुरू आहे. सध्याचा व्यवसायच मोठ्या प्रमाणावर वाढविण्याची त्यांची आकांक्षा आहे. सुरुवात झाली त्यावेळेला मंदीचा काळ होता. प्रगती तर दूरच; पण व्यवसायात टिकून राहणेदेखील आव्हानात्मक होते. सारे कौशल्य पणाला लावून त्यातून तरलो. आता प्रत्येक प्रकल्पाचे काम ते दिवस लक्षात ठेवूनच करतो....' चंदे आपल्या कठीण, संघर्षाच्या काळाविषयी सांगतात.

बांधकाम निर्धारित वेळेत पूर्ण विचारांती उचललेले पाऊल मागे घ्यायचे नाही, प्रामाणिकपणे काम करीत राहायचे, हे धोरण चंदे यांनी आखले आणि त्याची अंमलबजावणी करीत राहिले.

गृहबांधणी आणि व्यावसायिक बांधकाम क्षेत्रात नवीन उपक्रम, संकल्पना राबविण्याचा चंदे यांचा सदैव प्रयत्न सुरू असतो. नाशिक- पुणे महामार्गावर 'हॉटेल नटराज' च्या जागेवर भव्य मॉल लवकरच पूर्ण होऊन हा प्रकल्प नाशिक रोडच्या वैभवात भर घालणारा ठरला. पुढे शंभर एकरांच्या जागेवर टाऊनशिप उभारण्याचे चंदे यांचे स्वप्न आहे. त्यासाठी शेअर बाजारात 'आयपीओ'द्वारे भांडवल उभे करण्याचे नियोजन सुरू असून, पुढील पाच वर्ष ते याच प्रकल्पावर काम करणार आहेत. नाशिकरोडमधील स्थावर मालमत्ता व्यवसायाला महत्त्वपूर्ण करण्यात 'दीपक बिल्डर्स'ने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पंधरा ते वीस लाख चौरस फूट निवासी व वाणिज्य जागा विकसित करणाऱ्या दीपक चंदे यांचा प्रवास सहजसुलभ नव्हता. अडथळे अनेक आले. त्यावर मात करीत ग्राहकांचे समाधान, विश्वासार्हता आणि प्रामाणिकणाला प्राधान्य दिल्यानेच यश मिळाल्याचे चंदे सांगतात. बांधकाम व्यवसाय म्हटला, की ताणतणाव आलाच. ते देखील चंदे मोठ्या खुबीने सांभाळतात.

सर्वात महत्वाचे म्हणजे हा माणूस स्वप्नं पाहतो आणि त्या स्वप्नांना आकार देतो. कल्पकता आणि भविष्याचा वेध घेण्याची त्यांची दृष्टी अफलातून आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे नाशिक शहराची गरज ते ओळखून आहेत. भविष्यातील नाशिक कसे असेल? येथील व्यावसायिकांची गरज काय असेल? आणि निवासाचा प्रश्न कसा सोडवता येईल. तो वर्ग कोणता याचा अंदाज घेऊन ते आपल्या प्रकल्पांची उभारणी करतात. व्यवसायाबरोबरच सामाजिक बांधिलकीलाच त्यांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. त्यासाठीच लक्षावधी वृक्षांचे रोपण करण्यावर त्यांचा भर आहे. आणि प्राण्यांसाठी रुग्णवाहिका सुरू करण्यावर त्यांनी भर दिला आहे. हे दोनही उपक्रम सामाजिक बांधीलकी म्हणून त्यांनी हाती घेतले आहे.



# मोठे भाऊ प्रत्येकासाठी गोड माणूस !

## मा. अशोकभाऊ जैन, स्व. भवरलाल जैन यांच्याबद्दल त्यांच्याच शब्दात !

✍ गोरख पगार

माझे वडील आदरणीय भवरलालजी जैन तथा श्रद्धेय मोठेभाऊ जगविख्यात भूमिपुत्र. जैन उद्योग समूहाचे संस्थापक, आदर्श कार्यसंस्कृतीचे शिल्पकार, पन्नास वर्षांपूर्वी सात हजार रुपयातून सुरू केलेला कृषिविषयक उद्योग-व्यवसाय सात हजार करोडच्यावर वार्षिक उलाढालीपर्यंत नेणारे कर्तबगार उद्योजक ! खरतरं आमचेच म्हणण्याऐवजी सर्वांचेच प्रिय मोठेभाऊ! मोठ्याभाऊंच्या विस्तारित परिवारात सर्वांनाच आपुलकीचे, आदराचे स्थान होते..

मोठ्याभाऊंच्या मुलाखती अनेक नामांकित नियतकालिकात प्रकाशित झाल्या, अभ्यासपूर्ण मुलाखतीचे श्रेय त्या त्या मुलाखतकारांनासुद्धा कृतज्ञतापूर्वक द्यायलाच हवे.

'उमलले संवाद' भाग-१, भाग-२ या दोन खंडात प्रकाशित-प्रसारित मुलाखती संपादकांनी संकलित केल्या आहेत. आजची आठवण या मुलाखतींसंदर्भातील आहे.

योगायोग पहा, एका निमित्ताने 'वसा आणि वारसा' या सिरीजमध्ये मोठ्याभाऊंची मुलाखत अपेक्षित होती. आठवण नोंदवताना मन गहिवरून येणे स्वाभाविक आहे, ही मुलाखत संपादकांच्या इच्छेचा मान ठेऊन मी घेतली होती. दिनांक ११ सप्टेंबर २०१५ रोजी ही मुलाखत प्रकाशित झाली. माझ्यासाठी ही आठवण ऐतिहासिक आहे आणि अर्थातच अतिशय अनमोलही.

प्रस्तुत मुलाखतीतील निवडक भाग आत्ता आपण सूचित केल्यानुसार नोंदवणार आहे. मोठ्याभाऊंचे विचार वाचायला - किंवा ऐकायला का आवडतात, कारण त्यातील शब्द, उद्गार काल्पनिक नाहीत, अलंकारिक वा बोजड नाहीत, हे अनुभवाचे बोल आहेत, पारदर्शक मन त्या शब्दांच्या अंतरंगात आहे. अनेकदा त्यातील साधना, तपश्चर्या डोळे दिपवून टाकणारी, वाचकांना थक्क करून सोडणारी.

शेती, माती, शेतकरी यांच्याशी एकात्मिक, जीवाभावाचं नातं असल्यावर अतिरिक्त नफेखोरीसारख्या स्वार्थी विचारांना प्रवेशच नसतो..सामाजिक बांधिलकी कृतज्ञतापूर्वक जपून जे जे करता येईल त्याची सुरवात मोठ्याभाऊंनी स्वत:पासून केली. 'आधी केले, मग सांगितले!' हाच मोठ्याभाऊंचा परिपाठ..स्वत:सह समाजाची समृद्धी हे खूपच व्यापक स्वप्न मोठ्याभाऊंनी जागतेपणाने पाहिले... आजचं



जैन हिल्स हिरवाईचं नंदनवन आहे. पूर्वी मात्र इथे अगदी ओसाड परिसर होता, बरड माळरान होतं, पाषाण विखुरलेले होते.

मोठ्याभाऊंनी अथक परिश्रमातून या जागेचं स्वरूपच बदलवलं.. या उजाड माळरानावर मोठ्याभाऊंनी पाण्यासंदर्भात केलेलं काम पाहून लाखो माणसं आश्चर्य व्यक्त करतात. 'कहाणी कष्टलाटांच्या पाणलोटाची' या पुस्तकात जैन हिल्सवरील जलसंधारणाचं प्रात्यक्षिक सचित्र शब्दबद्ध झालं आहे. मोठ्याभाऊंच्या या पुस्तकाचा अनेकांना नक्कीच होकायंत्राप्रमाणे दिशादर्शक उपयोग होताना दिसतो.'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे!' हा प्रयत्नवाद महत्त्वाचा... 'सार्थक करूया जन्माचे, रूप पालटू वसुंधरेचे!' हे मोठ्याभाऊंनी सर्वांवर संस्कारित केलेलं मिशन अतिशय महत्त्वपूर्ण असून दीर्घकालीन परिणामकारक आहे.

"जे करायचे ते सर्वोत्तम आणि गुणत्तापूर्णच असले पाहिजे." असं मोठेभाऊ नेहमी म्हणायचे. हाती घेतलेलं काम अधिकाधिक उत्कृष्ठच व्हायला हवं हा मोठ्याभाऊंचा ध्यास होता,तशी दृष्टी होती आणि सततच सजग भान होतं. पन्नास वर्षाच्या उद्योजकीय कामकाजात जैन परिवारातील कौटुंबिक सदस्यासह कितीतरी सहका-यांना मोठ्याभाऊंनी एखाद्या शिल्पकाराप्रमाणे घडवलं,हा विषय खरंतर एकूणच उद्योजकीय कार्यसंस्कृतीचा विचार करता स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे.व्यवसाय करायचा पण त्यातलं सत्त्व जपायचं ही मनोवृत्ती अपवादात्मक असते.सत्य, अहिंसा, करुणा हे शब्द प्रार्थनेपुरते न



ठेवता मोठ्याभाऊंनी उद्योजक या दृष्टीने प्रत्यक्ष कार्यरत असताना आचरणात आणले.'श्यामची आई' हे त्यांचे सर्वात प्रिय पुस्तक होते, मोठ्याभाऊंनी या पुस्तकातून संस्कारित होणारा मूल्यभाव आयुष्यभर जोपासला.

प्रत्येकाची गुणसंपदा ओळखून काम हे मोठ्याभाऊंचे वैशिष्ट्य. माणसाची अचूक पारख करणे,आव्हान देणे,सूक्ष्म अवधान त्या त्या कामांकडे देत राहणे, कामातल्या त्रुटी वेळीच दूर करणे, सहकाऱ्यांचा आत्मविश्वास प्रज्वलित ठेवणे, आपल्या कामाविषयी जीवापाड ममत्त्वाची जोपासना करण्याची शिकवण देणे,आपली ओळख फक्त आणि फक्त कामामुळे-कष्टांमुळेच आहे,आपल्या कामालाच घरात, कार्यालयात, समाजात ख-या अर्थाने प्रतिष्ठा असते असे विचार मोठेभाऊ परिवारातील आमच्या सर्वांवर, सहकाऱ्यांवर संस्कारित करीत असत. श्रमप्रतिष्ठेला प्रथम प्राधान्य देणा-या मोठ्याभाऊंनी कामातच परमेश्वर स्वरूप पाहिलं आणि आपण ज्या जागेवर,ज्या परिसरात श्रम वेचतो, ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाची उपासना करतो,संशोधनाला चालना देतो, हजारो-लाखो व्यक्तींशी संपर्क-सुसंवाद राखतो. पसायदान म्हणतो आणि कृतिशीलपणे आचरणातही आणतो ती जागा,तो परिसर मंदिराप्रमाणे पवित्रच आहे असे विचार मोठ्याभाऊंचे होते. मोठ्याभाऊंची आध्यात्मिक विचारधारा, भक्तिभावना कामाशी तादात्म्य पावणारी होती. सहा-सात हार्ट ॲटॅक विश्रांती न घेता १२/१४ तास कठोर परिश्रम घेऊन सलग पन्नास वर्ष प्रचंड ऊर्जेसह अनेक प्रकल्प साकार केले.'गांधीतीर्थ, अनुभूती स्कूल, कांताई बंधारा असे खूप काही...

मोठ्याभाऊंनी माझ्या एका प्रश्नाला दिलेले उत्तर, त्यांनी लिहिलेल्या 'ती आणि मी' शीर्षक असलेल्या पुस्तकाचा सारांशच जणू... उद्योग-व्यवसायात असणाऱ्या प्रत्येकासाठी पाथेयच..

प्रश्न असा होता, कंपनी आणि कुटुंब या गोष्टी एकसंघपणे सांभाळण्यासाठी कोणत्या बाबींकडे लक्ष दिले.

मोठेभाऊ त्यावेळी म्हणाले होते," कुटुंबात धर्मपत्नीला पतीविषयी,पतीच्या व्यस्ततेविषयी दृढ विश्वास असला पाहिजे. तुम्ही करीत असलेलं काम,तुमचं ध्येय-उद्दिष्ट हे तोलामोलाचं आहे, हे तिच्या लक्षात यायला हवं.

तुम्ही व्यावसायिक क्षेत्रात करीत असलेल्या कामाचं समाधान केवळ तुम्हालाच नाही, तिलाही तेवढच बरोबरीने लाभायला हवं.. कारण समाजामध्ये 'ती ' वावरते तेव्हा 'ती' म्हणून ओळखली जाते. तेव्हा तुम्ही करीत असलेल्या कामाबद्दल तिच्या मनात आदर असतो. मुलांमध्ये आपले वडील चांगले आहेत, अशी भावना असते. परिश्रमशील वडिलांविषयी नक्कीच अभिमान असतो. जीवनमूल्येच कुटुंबाला एकसंघ ठेवतात. सिनेमा, फिरायला जाणं,तिला वेगळा वेळ मुद्दामहून देणं हे विषय अशावेळी गौण ठरतात, एक बाब मात्र सुस्पष्ट असावीच, 'हे फक्त माझेच आहेत!' ही बाब तिला आत्मिक समाधान देते. त्यावेळीसुद्धा बाकीचे विषय गौण असतात.



# इथे आकाशानेही ठेंगणे व्हावे ! अद्भुत प्रतिभेचे धनी; विलास बिरारी

**ही कथा आहे अविश्वसनीय स्वरूपाची, एखाद्या माणसात किती अफाट क्षमता असतात याचा परिचय करून देणारी, माणसं सामान्य किंवा असामान्य असा भेद नसलेली असतात परंतु माणसं सामान्य आहेत की असामान्य हे त्याच्या कल्पना नियोजन आणि कठोर परिश्रम याच्यावर ठरतं. हे सिद्ध करणारं उदाहरण ठरलं ते नाशिक मधील विलास बिरारी यांचे.**

गोरख पगार

श्री विलास बिरारी हे नाशिक येथील सुप्रसिद्ध हर्ष कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडचे चेअरमन आहेत. हर्ष कन्स्ट्रक्शन आणि विलास बिरारी हे नाव आता फक्त नाशिक पुरतच मर्यादित राहिले नसून ते भारताच्या सर्व कानाकोपऱ्यात घेतलं जाणारे नाव बनले आहे. शासकीय स्तरावरील किंवा औद्योगिक क्षेत्रातील कुठलेही मोठं बांधकाम करायचे असेल तर त्यासाठी विलास बिरारी आणि त्यांचं हर्ष कन्स्ट्रक्शन हवं हे आता समीकरण बनलं आहे, त्याची प्रचिती हर्ष कन्स्ट्रक्शन आणि श्री विलास बिरारी यांनी नाशिक, महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र बाहेरही इतर राज्यात कोण कोणती मोठी बांधकाम केली याचा अंदाज घेतला तर प्रचिती येते. विलास बिरारी यांनी हे स्वप्नवत वाटणारं आणि केवळ अविश्वसनीय स्वरूपात बसणारं काम केवळ त्यांची इच्छाशक्ती, प्रयत्न आणि कठोर परिश्रमांच्या बळावर केले. त्यासाठी त्यांना कुठल्याही मोठ्या भांडवलाची गरज भासली नाही किवा खूप मोठे शैक्षणिक बॅकग्राऊंड पाहिजे हेही त्यांनी खोटं ठरवलं. श्री बिरारी हे नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील कंधाने या छोट्याशा गावातील. त्यांचे आई-वडील हे मूळत: शेतकरीच पण शिक्षकी पेशात होते. शिवाय काका, काकू असा मोठा परिवार. त्यांचे वडील हे लहानपणीच वारले म्हणून विलास यांना शिक्षणासाठी सुद्धा कठोर मेहनत आणि प्रयत्न करावे लागले, अगदी आश्रम शाळेत शिकावे लागले, परंतु हा माणूस अत्यंत कठोर परिस्थितीत खडकातून एखाद्या बियाण्याने अंकूर घ्यावा त्या स्वरूपात उभा राहिला आणि जीवनाला आकार देत गेला. नुसता आकारच नव्हे तर केवळ स्वप्नवत ठरावे असे काम त्यांनी करून दाखवले. ते भारतासारख्या खंडप्राय प्रदेशात गरिबीत जीवन कंठत असलेल्या आणि अनेक विझू पाहणाऱ्या दिव्यांना पुन्हा प्रज्वलित करणारे उदाहरण बनले आहेत. श्री विलास बिरारी यांचा प्रवास, त्यांनी घेतलेले कष्ट आणि त्यांनी उभं केलेल्या उद्योगाचं साम्राज्य विश्वास बसणार नाही असं आहे, आणि म्हणून हा उद्योग विश्वातला खरा आणि आघाडीचा नायक बनला आहे. नाशिक मधला विमानतळ असो किंवा ठाण्याचं सिविल हॉस्पिटल किंवा इंदोरचा विमानतळ किंवा ठीक ठिकाणची हॉस्पिटले किंवा न्यायालयांच्या इमारतींसाठी बांधकामं असतात ती करावी तर हर्ष कन्स्ट्रक्शन आणि विलास बिरारी यांनीच असं आता दृढ समीकरण बनलं आहे.

अत्यंत सुंदर कार्यालय, अतिशय कार्यमग्न असलेला कर्मचारी वर्ग, त्यांच्या अंगात शिस्त भिनलेली आणि श्री विलास बिरारी यांच्या कामाचा उरक, त्यांनी केलेल्या वेळेचे व्यवस्थापन आणि ठरवून दिलेल्या वेळेत काम हे त्यांच्या कार्यशैलीचे वैशिष्ट्यं बनले आहे. श्री बिरारी यांनी मॅट्रिक झाल्यानंतर पुढे लवकर कमवते व्हावे म्हणून स्थापत्य अभियांत्रिकी पदविकेचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचं लक्ष ठरवलं आणि त्यासाठी ते धुळे येथील तंत्रनिकेतनात दाखल झाले. तीन वर्षाचा स्थापत्य अभियांत्रिकीचा डिप्लोमा त्यांनी घेतला, पुढे त्यांना पदवीचे शिक्षण घेता येणे शक्य झाले असते, परंतु तशी त्यांची परिस्थिती नव्हती, कुटुंबीयांना त्यांनी काहीतरी कमवावे अशी गरज होती, म्हणून त्यांनी नोकरी शोधायला सुरुवात केली, आणि तेही न संकोचता. त्यासाठी चक्क प्रस्थापितांकडे नोकरी मागत ते फिरू लागले. त्याच वेळी धुळे येथील एक कन्स्ट्रक्शन कंपनी गोसर यांच्याकडे ते गेले आणि त्यांच्याकडे त्यांनी काम मागितले. श्री गोसर यांची कामे नंदुरबार येथे सुरू होती. गोसर यांनी सांगितले ठीक आहे, आमच्याकडे तुम्हाला काम मिळेल परंतु नंदुरबारला जायची तयारी आहे का? कामाची गरज असलेल्या विलास बिरारी यांनी त्यास होकार दिला आणि ते नंदुरबार येथे दाखल झाले. नंदुरबार येथे मिळेल तिथे राहत, मिळेल ते खात आणि कसाबसा



उदरनिर्वाह करत त्यांनी त्यांचा प्रथम नोकरीचा प्रवास सुरू केला, पुढे ते नाशिक येथे आले. येथे संघर्ष त्यांची पाठ राखण करतच होता, परंतु काही लोकांनी त्यांना त्यांच्या होतकरूपणाची दखल घेत त्यांना साथ देण्याचे ठरवलं.या श्रेयनामावलीत म्हात्रे कन्स्ट्रक्शन, नंतर बेहेरे आदि लोकांचा समावेश आहे.नाशिकला प्रथम श्री बिरारी यांनी इंडस्ट्रियल क्षेत्रात काम सुरू केले. पहिलं काम त्यांनी क्रॉम्प्टन ग्रिव्हजचे मिळवले, अतिशय विक्रमी गतीने त्यापेक्षा ठरलेल्या वेळेत त्यांनी ते पूर्ण करून दिल्यामुळे त्यांना औद्योगिक क्षेत्रातील काम मिळायला मदत झाली, पुढे शालिमार वायरचे काम त्यांनी केलं आणि त्यानंतर त्यांनी शासकीय क्षेत्रात बांधकाम करायला सुरुवात केली. नाशिकचा विमानतळ म्हणजे अतिशय महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेले काम श्री विलास बिरारी यांनी अतिशय अल्पावधीत आणि दर्जेदार स्वरूपात पूर्ण केलं, त्यानंतर मुक्त विद्यापीठाच्या काही इमारतींचे बांधकाम श्री विलास बिरारी यांच्या हर्ष कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडने केलं. या कामांच्या नंतर ठाणे इंदोर, नागपूर अशा मोठमोठ्या शहरात हर्ष कन्स्ट्रक्शन ने आपला मोर्चा वळवला आणि तेथेही आपल्या अप्रतिम बांधकाम प्रकल्पांचा ठसा उमटवला. आज प्रत्येक शासकीय काम असो ते करावे तर हर्ष कन्स्ट्रक्शन यांनीच असा परवलीचा शब्द बनला आहे. हे सर्व कसं शक्य झालं यावर बोलताना श्री बिरारी साहेब म्हणतात, तुमच्या मनात काहीतरी करून दाखविण्याची प्रेरणा आणि जिद्द असायला हवी आणि त्यासाठी कठोर परिश्रमांची तयारी असायला हवी. कोणतेही माणसं कधीच वाईट नसतात, ही माणसं तुम्ही समजून घेतली तर ती तुम्हाला मदत करणारीच असतात. मला माझ्या आयुष्यात या सत्याचा वारंवार प्रत्यय आला. मला माझ्या जीवनात यशस्वी करण्यात अशा लोकांचा मोठा हातभार लागलाय. फक्त तुम्ही प्रामाणिक असायला हवे. कठोर परिश्रमांची तयारी असावी. जिद्द असायला हवी आणि तुम्ही नेकीने काम करायला हवे





म्हणजे यश हे तुमचं नक्की ठरलेले असतं. त्याच्यामुळे मला कोणतेही काम अवघड आणि अशक्य स्वरूपाचं कधीच वाटलं नाही. स्वप्न मोठी पहा आणि त्यासाठी कठोर परिश्रमांची तयारी ठेवा पैसा जीवनात सर्व काही नसतो पैशांशिवाय काही होत नाही हे खरं आहे पण तो आपल्या प्रयत्न आणि चिकाटीच्या बळावर तसेच कठोर परिश्रमांच्या बळावर नक्की उभा राहतो हा माझा समज नव्हे तर सिद्धीस गेलेला सिद्धांत आहे.

# उद्योग आणि उद्योजकांची निर्मिती

**आपल्या विविध प्रकारच्या पोल्ट्री उपकरणांमुळे श्री. अनिल धुमाळ हे नाव केवळ भारतातच नाही तर देश विदेशात लोकप्रीय झाले. त्यांच्यामुळे पोल्ट्रीचा व्यवसाय व्यावसायिक तत्त्वावर उभा राहिला.**

गोरख पगार




श्री. अनिल धुमाळ

धुमाळ इंडस्ट्रीजने पोल्ट्री फार्मर्ससाठी ड्रींकर्स, चिक ड्रींकर्स, निपल वॉटरिंग सिस्टिम फीडर, फॉगर पॅरेंट फीडर इ. उपकरणे विकसित केली त्याचबरोबर स्लॅट, एग ट्रेज इ. देखील सातपूर एम.आय.डी.सी येथील कारखान्यात तयार होतात. धुमाळ इंडस्ट्रीजचे सेल्स ऑफीस पुणे येथे संभाजी पार्कसमोर जंगली महाराज रोडवर तसेच हैद्राबाद येथेही आहे. शिवाय संपूर्ण भारतात धुमाळांचे डीलर्सही कार्यरत आहेत. ह्या सर्व प्रवासात भारतातील अनेक मोठ्या हॅचरीजचे तसेच ज्ञात अज्ञात अशा अनेकांचे सहकार्य धुमाळांना मिळाले आहे. म्हणूनच धुमाळांचे सेल्स ऑफीस हैद्राबाद व पुणे येथेही आहेच. वेळ, मनुष्यबळ आणि पैसा वाचवून उत्पादनात अधिक भर घालणारी आणि तितकीच सुरळीत चालणारी बसवायला सोपी अशी ही उपकरणे आज पोल्ट्री जगतात क्रमांक एक वर आहेत. त्याचप्रमाणे परदेशातही त्यांची लोकप्रियता वाढत असून भारतास त्यामधून परकीय चलनही मिळवून देण्यात धुमाळ इंडस्ट्रिजचा मोठा सहभाग आहे.

मेकॅनिकल इंजिनियर असलेले श्री. अनिल धुमाळ उद्योगाला देव मानणारे आहेत. म्हणून उद्योजकता त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव झाला आहे. जीवनाचे उद्दिष्ट म्हणजे उद्योग, राष्ट्रसेवा म्हणजे उद्योग, समाजसेवा म्हणजे उद्योग, कुटुंबाच्या विकासासाठी उद्योग, सामाजिक विकासांसाठी उद्योग, जीवनात



**उद्योजकांची नवी पिढी (न्यु जनरेशन) कल्पक आणि बुद्धिमान आहे. त्यांना संधी दिल्यास स्थापित उद्योगाला नव्या दिशा मिळतात आणि उद्योगांचा विस्तार आणखी जोमाने होतो. माझा हा विश्वास चिरंजीव अक्षय यांनी सार्थ ठरविला. नव्या पिढिला प्रोत्साहन आणि संधी द्यायला हवी असेही श्री. धुमाळ यांनी यावेळी बोलतांना स्पष्ट केले.**

आनंद मिळवण्यासाठी उद्योग अशा प्रकारचे उद्योगव्रत्त अनिल धुमाळ यांनी अंगिकारले. भले मग कोणत्याही अडचणी आपल्या मार्गात येवोत.

आपल्या देशात उद्योग उभारणी हे आता सोपे काम राहिले नाही. जागा महाग, पाणी महाग, वीज महाग, लायसन्स राज आणि अनुषंगिक बाबींचा श्री. धुमाळ यांनी अतिशय नेटाने मुकाबला केला. महाराष्ट्रात प्रारंभी खरोखरच उद्योगाला आणि उद्योजकांना प्रोत्साहन देणारी यंत्रणा कार्यान्वीत होती. नोकरशाही त्यासाठी प्रवृत्त करत होती. प्रेरणा देत होती. परंतु पुढे परिस्थिती बदलली आणि उद्योग उभारणे अतिशय कठीण होऊन बसले. अनेकांना तर या वाट्यास जाऊच नये असे वाटू लागले. अनेक जण अर्ध्यावरच उद्योगाचा मार्ग सोडून देऊ लागले पण केवळ उद्योगासाठीच जन्म घेतलेल्या श्री. अनिल धुमाळांनी अनेक अडचणींतून मार्ग काढत केवळ अविश्वसनीय वाटावे असे उद्योगाचे साम्राज्य उभे केले.

प्रथम पोल्ट्रीसाठी उपकरणे, त्यात




स्वत:ची मक्तेदारी, मुळ व्यवसायाचा एकूण दोन ठिकाणी विस्तार आणि त्यानंतर श्री. धुमाळ यांचे चिरंजीव अक्षय धुमाळ यांनी धुमाळ उद्योगाला नवी दिशा देऊन विस्तार करावयाचे ठरविले. यंत्र अभियंता आणि व्यवस्थापन शास्त्रातील पदव्युत्तर पदवी असलेल्या अक्षय धुमाळ यांनी प्री फॅब मध्ये जाण्याचे ठरविले आणि धुमाळ मेटल्स या महत्वाकांक्षी प्रकल्पाची उभारणी झाली. सिन्नर येथे पाच एकर जागेवर प्रिफॅबचा कारखाना त्यांनी उभारला आणि विकासाचे नवे दालन त्यांनी सर्वांसाठी खुले केले आहे. धुमाळ मेटल्स नावाने त्यांचा हा प्रकल्प ओळखला जातो. नट, बोल्ट, पत्रे, अँगल्स, चॅनल्स या सर्वच घटकांचे या कारखान्यात उत्पादन होते. ज्यामुळे बांधकाम क्षेत्रात आणि औद्योगिक शेड निर्मितीच्या व्यवसायात क्रांती घडून येणार आहे. श्री. धुमाळ यांच्या या कारखान्यात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे २५० ते ३०० लोकांना रोजगार मिळाला असून बांधकामांमध्ये खर्चात मोठ्या प्रमाणावर बचत तर शासनास करांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपये मिळू लागले आहेत. धुमाळ मेटल्स या कारखान्याच्या माध्यमातून प्री-फॅबच्या तंत्राचा वापर करुन अनेक औद्योगिक शेड्सची निर्मिती होऊ लागली आहे. कारखान्यांची नव्याने उभारणी करु इच्छिणाऱ्या उद्योजकांसाठी धुमाळ मेटल्सची प्री फॅब उत्पादने वरदान ठरू लागली आहेत. त्यामुळे अल्पावधीतच धुमाळ यांचा धुमाळ मेटल्स हा कारखाना नाशिकच्या औद्योगिक क्षेत्राचे भूषण ठरला आहे. नव्याने कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु इच्छिणाऱ्यांनी धुमाळ मेटल्सचे तंत्र नक्कीच समजून घ्यायला हवे हे येथे नमूद करावेसे वाटते.



श्री. अक्षय यांच्या कल्पक नेतृत्वाचा धुमाळ मेटल्सला फायदा झाला असून, धुमाळ मेटल्स हा मोठी गुंतवणूक असलेला कारखाना त्यांच्या स्थापनेनंतर अल्पावधीतच ब्रेक इव्हन पॉइंटला पोहचला आहे. श्री. धुमाळ यांनी त्यांच्या उद्योगात, उद्योगाचे साम्राज्य निर्माण केले, उद्योगाचे क्षेत्र त्यांनी अप्रतिम आणि गरजेचे तसेच सर्वांगीण विकासाचे निवडले आणि त्यांत स्वत:ची मक्तेदारी निर्माण केली. आपला उद्योजकीय प्रवास सांगताना श्री. धुमाळ यांनी त्यांना विविध पातळ्यांवर आलेले चांगले तसेच वाईट अनुभव सांगीतले. चांगल्या अनुभवांचे आपण स्वागत करतो पण वाईट अनुभव ऐकल्यानंतर कशासाठी ही उद्योजकता आणि उद्योग असा प्रश्न निर्माण व्हावा पण पूर्वीचे सर्व उत्तम असतानाही मोठ्या नेटाने व जिद्दीने त्यांनी प्रारंभीच्या



धुमाळ इंडस्ट्रीजचे विस्तारीकरण दुर्गम भागात पेठरोडला केले. आणि तेथील प्रचंड अडचणी अनुभवल्यानंतरही सिन्नरला चिरंजीव अक्षय धुमाळ यांची मदत घेत धुमाळ मेटल्स ह्या महत्वाकांक्षी प्रकल्पाची उभारणी केली. सर्व कथा ऐकल्यानंतर श्री. अनिल धुमाळ हे केवळ उद्योगासाठी, त्यात यशस्वी होण्यासाठी आणि इतर उद्योजकांचे भले करण्यासाठी जन्माला आले आहेत याची खात्री पटते. त्यामुळेच आम्ही अनिल धुमाळ यांच्या नाशिकमधील उद्योजकीय कर्तृत्वाला अकल्पित आणि अविश्वसनीय मानतो.

### आता तुम्हीही टायनी फॉर्म करू शकता

उद्योजक श्री. अनिल धुमाळांनी त्यांच्या धुमाळ इंडस्ट्रीजमार्फत पोल्ट्री उद्योगास विकसित केले. त्यासाठी संशोधन आणि विकासावर भर दिला. धुमाळ मेटल्स हा प्रकल्पही उद्योगाच्या विविध क्षेत्रांबरोबरच पोल्ट्री फॉर्म उद्योग विकासासाठी मोठ्या प्रमाणावर सहाय्यभूत होणार आहे. त्यासाठी धुमाळ इंडस्ट्रीज आणि धुमाळ मेटल्स हे दोन्ही उद्योग सहयोगी पद्धतीने सहाय्यभूत होणार आहेत. छोटा पोल्ट्री फार्म कसा असावा यावर श्री. धुमाळांनी खास विचार करुन अल्प गुंतवणुकीत उत्पन्नाची हमी असलेला "टायनी पोल्ट्री फार्म"चे मॉडेल विकसीत केले आहे. धुमाळ मेटल्स मार्फत फक्त १९२ चौ. फूट जागेत लेयर पद्धतीच्या पोल्ट्री फार्मची उभारणी केली जाते. या प्रकारात पक्षी (सर्व प्रकारचे मुक्तपणे विहार करत (पिंजरा पद्धत नाही) अंडी उत्पादन केले जाते. आणि शेतकऱ्याला त्याच्या शेतातच अंडी उत्पादनाचा रोजगार उपलब्ध होतो. यासाठी अत्यल्प गुंतवणूक आहे. धुमाळ मेटल्समार्फत हा पोल्ट्री फार्म उभारला जातो. ही नवी उद्योगसंधी शेतकऱ्यांना उपलब्ध झाली आहे.

# शेतीनिष्ठ उद्योगातील सोनेरी पाने



गोरख पगार

लासलगावचे 'होळकर' कुटुंबिय कर्तबगार म्हणून ओळखले जाते. संपूर्ण नाशिक जिल्ह्यात 'होळकर' नावाचा दबदबा आहे. होळकरांचे मुळ घराणे राजस्थानातील उदयपूर येथील. तेथे ते त्या काळात शिसोदिया म्हणूनच ओळखले जात. उदयपूर येथून त्यांचा प्रवास महाराष्ट्रातील होळ येथपर्यंत झाला. बहुधा छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशजांबरोबरच ते महाराष्ट्रात आले आणि महाराष्ट्रात हे कुटुंबिय होळकर म्हणून ओळखले जाऊ लागले.

महाराष्ट्रात हे कुटूंबिय सातारा जिल्ह्यातील वाईजवळ होळ नावाच्या गावात स्थिर झाले, आणि तेव्हापासून ते भोसलेऐवजी होळकर या नावाने ओळखले जाऊ लागले. पुढे हे होळकर घराणे नाशिक जवळील लासलगाव येथे स्थायिक झाले. आणि त्यांनी 'भोसले' नावाला साजेशी आपल्या कार्य कर्तृत्वाची पताका झळकावली! होळकर उद्योजक बनले.

उद्योजकता आणि उद्योगात यशस्वी होण्याची कारणं "मॅनेजमेंट गुरु" वेग-वेगळी सांगत असतात. त्यात तथ्य नक्कीच असते. परंतु ज्या ठिकाणी उद्योजकतेचा वारसा नाही. उद्योग उभारणीसाठी आणि त्यात यशस्वी होण्यासाठी कोणतीही अनुकूल परिस्थिती नाही. जिथे जन्म घेणे, बालपण जाणे आणि शिक्षण घेणे अवघड आहे. तिथे आणि जेथे औद्योगिक वसाहत नाही. पूर्णत: ग्रामीण भाग त्या ठिकाणाहून जे उपलब्ध आहे ते काम करत, आणि काही जवळपास बंद पडलेल्या व्यवसायात झोकून देत. एखाद्या औद्योगिक साम्राज्याला आणि प्रस्थापित बहुराष्ट्रीय कंपन्यांना आव्हानात्मक ठरेल अशा उद्योगांची उभारणी करणे केवळ स्वप्नवत ठरु शकते पण संजय चांगदेवराव होळकर यांनी हे सर्व



वास्तवात आणले. जवळपास ५०० लोकांना रोजगार आणि हजारो शेतकऱ्यांचे ते आज आशास्थान आणि श्रद्धास्थान बनले. आणि विकासाच्या चाकाला ते आणखी गती देत आहेत. लासलगावातून आणि मध्यमवर्गीय मराठी कुटूंबातून हा चमत्कार घडला.

श्री. संजय होळकर यांचे वडील श्री. चांगदेवराव होळकर उर्फ आदरणीय "दादा" हे केवळ लासलगावचे नाहीतर संपूर्ण भारत देशातील शेतकऱ्यांचे दादा आहेत. ते त्यांच्या शेतीविषयक दृष्टीकोणामुळे आणि शेतकऱ्यांसाठी केलेल्या अविरत कामामुळे! नाफेड, वेफको, एनएचआरडीएफ, के. के. वाघ शिक्षणसंस्था, लासलगाव येथील कला व वाणिज्य महाविद्यालय नूतन विद्याप्रसारक संस्था यांच्याशी जोडले गेलेले नाव ! त्यांनी विविध संस्था काढल्या, जोपासल्या, विकसित केल्या असल्या तरी ते हाडाचे शेतकरी आहेत. कांदा, ऊस, द्राक्ष आणि लासलगाव भागात होणारी सर्व प्रकारची शेती त्यांनी केली आणि साहजिकच त्यांचे चिरंजीव संजय होळकर आणि त्यांच्या इतर भावांनाही शेती करावी लागली. पण हे सर्व भावंड शेती करत असतानाच शेती पुरक व्यवसायांचा, प्रक्रिया उद्योगांचा, शेती माल निर्यातीचा आणि अनुषंगानेच अत्याधुनिक उद्योग उभारण्याचे स्वप्नं पाहत होते हे येथे खास करून नमूद करण्यासारखे आहे. प्रत्येक क्षेत्रात होळकर कुटुंबियांनी आपल्या कर्तृत्वाचा झेंडा रोवला. पण त्यांतही संजय होळकर यांचे उद्योजकीय कर्तृत्व विशेष, अपवादात्मक, विलक्षण आणि केवळ अविश्वनीय स्वरुपाचे आहे. श्री. चांगदेवराव होळकर व सौ. यशोदा होळकर यांच्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला.

तसेच २००६ पासून ते एनएचआरडीएफचे संचालक आहेत. उद्योग, सहकार, निर्यात, शिक्षण क्षेत्रात त्यांचा लिलया संचार सुरू आहे. परंतु संजय होळकरांच्या इतिहासातील सोनेरी पान ठरला तो ग्रेनाच इंडस्ट्रीज हा प्रकल्प! औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूरजवळ १५० एकर जमीनीवर २००९ मध्ये ग्रेनाच इंडस्ट्रीजची स्थापना संजय होळकरांनी केली. प्रारंभी त्यांची येथे बियरचा कारखाना काढण्याची योजना होती. पण त्याऐवजी त्यांनी धान्यापासून अल्कोहोल निर्मितीचा प्रकल्प सुरू केला कारण शेतकरी हिताचा विचार त्यांच्या डोळ्यासमोर होता आणि हा कारखाना खरोखरच शेतकरी हिताचा ठरला. मका उत्पादक त्यामुळे खुश झाले. दररोज २०० टन मका या कारखान्यास लागतो आणि दररोज एक लाख लिटर अल्कोहोलचे उत्पादन या कारखान्यात होते. महाराष्ट्रातील सर्वात मोठी ही डिस्टीलरी आहे आणि एकूण



डावीकडून श्री. चांगदेवरावदादा होळकर, सौ. यशोदा होळकर, सुन सौ. सोनिया होळकर आणि श्री. संजय होळकर, नातू अवतेंद्र होळकर.



३०० लोकांना या कारखान्यात रोजगार उपलब्ध झाला आहे. या कारखान्यामुळे एकूण १५००० एकर क्षेत्रावर मका लागवड झाली. दरवर्षी ८० ते १ लाख टन मका खरेदी या कारखान्यामार्फत केली जाते. २००९ पासून हा कारखाना वेगवेगळे विक्रम प्रस्थापित करीत आहे. कंट्री लिकर आणि फॉरीन लिकरमध्ये येथील उत्पादन वापरले जाते. त्यांतही परनार्ड रिकॉर्ड, डिआयजीओ, युएससी ह्या बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी ग्रेनाच इंडस्ट्रीज मुख्य पुरवठादार आहे. ग्रेनाॅच इंडस्ट्रीज ह्या शंभर एकरावरील कारखान्यापर्यंतच श्री. संजय होळकर हे थांबले नाहीत. त्यांची झेप पुढेही कायम राहिली आणि ग्रेनाच इंडस्ट्रीजच्या यशात मानाचा आणखी एक तुरा खोवला गेला तो २०१८मध्ये! यावर्षी सातारा येथे त्यांनी यशराज इथेनॉल प्रोसेसिंग प्रा. लि. या प्रकल्पाची खरेदी केली. या कारखान्यात दररोज ५००० लिटर अल्कोहोलचे उत्पादन होते. सांगली कर्नाटक भागातील मका उत्पादक येथे मकाचा पुरवठा करतात. आणि एकूण २०० लोकांना रोजगार येथे उपलब्ध झाला आहे. तसेच वेफकोमध्येही १०० लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. एकूण ६०० लोकांना रोजगार आणि पंधरा ते वीस हजार मका उत्पादकांना सुरक्षितता श्री. संजय होळकर यांनी आपल्या उद्योजकतेच्या माध्यमातून उपलब्ध केली. त्यापूर्वी वेफकोचीही स्थापना श्री. संजय होळकरांनी केली आणि हजारो द्राक्ष उत्पादक तसेच कांदा उत्पादकांना विकासाची संधी उपलब्ध झाली. चांगदेव दादा होळकर यांनी १९७७ पासून २०१८ पर्यंत नाफेड ह्या जगविख्यात संस्थेचे काम पाहिले, १९६६ पासून ते जिल्हा संघात काम पाहत आहेत. या संस्थांमध्ये कधी ते संचालक तर दीर्घकाळ चेअरमन राहिले. सहकार क्षेत्रातील अग्रणी कर्मवीर भाऊसाहेब हिरे आणि काकासाहेब वाघ यांचेशी त्यांचे घनिष्ट संबंध होते. नॅशनल को. ऑप. टुरिझम या संस्थेचीही स्थापना चांगदेवराव दादांनी नवल किशोर शर्मा यांना बरोबर घेऊन केली. तसेच त्यांनी एनएचआरडीएफ, लासलगाव महाविद्यालय व वेफकोचे चेअरमन म्हणून भरीव कामगीरी केली व आजही ते या संस्थांचे मार्गदर्शक आहेत. रानवड कारखान्याचे संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले तसेच के. के. वाघ शिक्षण संस्थेचे ते विश्वस्त आहेत. चांगदेवराव दादा होळकरांची ही नेतृत्त्वाची परंपरा संजय होळकरांनी पुढे कायम ठेवली आहे. आणी हो, संजय होळकरांच्या बाबतीत आणखी एक महत्वाची गोष्ट अशी की नाशिक जिल्ह्यातील वाईन उद्योगासही त्यांचा महत्वपूर्ण हातभार लागला. विंचूर वाईन पार्कमधील "विन्सुरा" या वाईन प्रकल्पाचे ते २००७ पासून संचालक आहेत. पुढे भविष्यात साखर कारखानदारीतही योगदान देण्याची त्यांची तीव्र इच्छा आहे. आणि त्या दृष्टीतून त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. मुळचे भोसले असलेले होळकर घराणे, भोसल्यांसारखेच कर्तबगार! कर्तबगार पिढ्या घडविणारे! चांगदेवराव दादा होळकरांची दुसरी पिढीही त्याला अपवाद नाही. श्री. संजय होळकर यांना दोन मुले आहेत पहिले सत्यजीत होळकर व दुसरे आदित्य होळकर. दोन्हीही मुले कर्तृत्वाच्या बाबतीत अत्यंत सरस आहेत. उच्च विद्याविभुषित सत्यजीत होळकर वडिलांच्या व्यवसायांमध्ये पूर्णतः सहभागी होऊन उद्योगांच्या कक्षा विस्तारत आहेत तर आदित्य युएसमध्ये इंडस्ट्रीयल इंजिनियरिंगच्या क्षेत्रात आपले योगदान देत आहेत. होळकरांमधील कर्तृत्वाचे गुण महाराष्ट्रातील सहकार महर्षिंनी नेमके हेरले होते. त्यामुळेच माजी खासदार बापूसाहेब थिटे यांनी आपल्या कन्येचा विवाह संजय होळकरांबरोबर केला. तर सत्यजीत होळकर माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटलांचे नातू मदन पाटलांचे जावई आहेत. सहचरिणी असलेल्या या कर्तबगार महिलांचा होळकरांच्या यशात महत्वाचा वाटा आहे. महत्वाचे म्हणजे उद्योगात गरुड झेप घेतली असतानाही होळकर कुटुंबियांचे पाय जमीनीवर आहेत. शेती आणि शेतकरी निष्ठा त्यांना सोडायची नाही. त्यांच्या या कार्याची दखल शासन तसेच विविध सेवाभावी संस्थांनी घेतली आणि विविध पुरस्कारांनी श्री. चांगदेवराव दादा होळकरांना पुरस्कृत केले. त्यात माजी कृषीमंत्री बलराम जाखड यांच्या हस्ते देण्यात आलेला, पंजाबराव देशमुख कांदा निर्यात पुरस्कार आणि कृषीमंत्री शरद पवार यांच्या हस्ते देण्यात आलेला वसंतराव नाईक कृषीभूषण निर्यात पुरस्कार यांचा समावेश आहे. तसेच बेस्ट सिनियर सिटिझन हे अॅवॉर्डही चांगदेवराव दादा होळकर यांनी मिळविले. कृषि विषयक अभ्यासासाठी ते सर्व जग फिरले. संजय होळकर यांनाही सहकाराच्या अभ्यासासाठी शासनाने ऑस्ट्रेलिया येथे भारताचे प्रतिनिधी म्हणून पाठविले होते. संजय होळकर यांनीही त्यांच्या उद्योगाची क्षेत्रे शेतकऱ्यांना हातभार लागेल अशी निवडलीत आणि ग्रामीण अर्थव्यवस्था विकासाला मोठा हातभार लावत आहे. शिवाय मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली. संजय होळकरांची ही उद्योजकता मराठी माणसाची गौरवगाथा ठरली आहे.

## नाशिक शहर परिसरातील एकमेव सुरेख !

# 'सुला विनयार्ड' निसर्ग पर्यटनाचा अद्‌भूत अनुभव !




**वाईन उद्योगातील सध्यातरी सर्वात यशस्वी उद्योग म्हणून 'सुला' वाईन्स या प्रकल्पाकडे पाहिले जाते. केवळ भारतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही 'सुला' वाईन्सने आपली ओळख निर्माण केली. कोणताही विदेशी पाहुणा भारतात आला तर त्यास सुला वाईन प्रकल्पास भेट देण्याची इच्छा होते. हा प्रकल्प आता केवळ वाईन प्रकल्प नाही तर नाशिकचा निसर्ग आणि हवामानाचा आनंद लुटण्याचे नाशिक शहर परिसरातील एकमेव सुरेख पर्यटन स्थळ बनला.**

वाईनरी प्रकल्प हा एक उद्योग आहे; पण त्याला जोडूनच इतर उद्योग जसे वाईनबार, रिसोर्ट, आणि वाईन म्युझियम उभे राहू शकतात आणि ते वाईनरीपेक्षाही महत्वाचे आहेत हे 'सुला' वाईनप्रकल्पाने सिद्ध केले. त्याचे श्रेय या वाईन प्रकल्पाचे सर्वेसर्वा राजीव सामंत आणि त्यांचे सहकारी यांना दिले जाते.

दर्जेदार वाईनची निर्मिती करुन नाशिकचे नाव सुला वाईन्सने आंतरराष्ट्रीय स्तरावर नेले. वाईनरीवरच पर्यटकांच्या दृष्टीने विविध सोयी सुविधा निर्माण करुन भारतीय वाईनच्या इतिहासात मानाचा तुरा खोवला. या आंतरराष्ट्रीय वाईन उद्योगामुळे संपूर्ण देशी-विदेशी वाईनप्रेमींचे लक्ष नाशिककडे वेधले गेले असून नाशिक महानगर वाईन कॅपीटल बरोबरच वाईन पर्यटन स्थळ म्हणूनही विकसित होण्यास हातभार लागला. सुला वाईन्सने सुरु केलेले वाईन टुरिझम पूर्णपणे कॅलिफोर्निया, इटली आणि फ्रॉन्स आदि वाईन कल्चर असलेल्या राष्ट्रांत असते तसे असून त्यात नाशिकचे नैसर्गिक सौंदर्य, सुखद हवामानाची भर पडल्यामुळे भारतीय पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. या संदर्भात अर्थ-उद्योगशी बोलताना सुला वाईनरीचे सीईओ श्री. राजीव सामंत म्हणाले, २००१ नंतर नाशिक परिसर आणि जिल्ह्यांत वाईन उद्योगांची नव्याने भर पडू लागली, वाईन आणि वाईनरीजची सर्वत्र चर्चा होऊ लागली. त्यामुळे साहजिकच सर्व स्तरातील नागरिकांची वाईनबाबतची उत्कंठा शिगेला पोहचली होती. सुलाच्या वाईनबारमुळे आणि सुला फेस्टमुळे जिज्ञासुंना वाईनची ओळख झाली असून दर्जेदार वाईन अगदि मध्यमवर्गापर्यंत पोहचण्यासही मदत झाली आहे. या वाईनबारमध्ये सुला ब्रॅण्डच्या सर्व वाईन तसेच काही विदेशी वाईन टेस्टींगसाठी उपलब्ध असून त्यासाठी होणारा खर्च मध्यमवर्गीयांनाही सहज परवडणारा आहे. याशिवाय पसंतीस उतरलेली कोणत्याही प्रकारातील बॉटल येथे थोड्या सुटीसह (डिस्काउंट) खरेदी करता येऊ शकते. जोडीलाच पर्यटनाचा आनंद उपभोगता येतो. गंगापूर धरणापासून थोड्याच अंतरावर सुला वाईन्स हा देखणा प्रकल्प असून सभोवताली ३५ एकरावर सुंदर विनयार्ड आहे. आता विस्तारित स्वरुपाच्या या प्रकल्पांत वाईनरीलाच लागून हवेत छताची उभारणी करुन वाईनबारची स्थापना करण्यात आली. विविध व्हरायटींच्या वाईनचे विलोभनीय काउंटर हे या वाईनबारचे वैशिष्ट्य ठरावे. वाईनबारमध्ये वाईन टेस्ट करत असताना तेथून थोड्या अंतरावरील गंगापूर धरणाचे विहंगम दृष्य, तसेच विनियार्ड व डोंगररांगांनी डोळ्यांचे पारणे फिटते. वाईनबारमधील बैठक व्यवस्थाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. संपूर्ण शांतता अनुभवत कोणतीही महनीय व्यक्ती या ठिकाणी हमखास ताण-तणावापासून मुक्त होऊ शकते. त्यामुळे काही महत्वाच्या बैठकांसाठीही सुला विनयार्ड परिसर अत्यंत महत्वाचा आहे. अर्थात त्यासाठी व्यवस्थापनाला पूर्व कल्पना द्यायला हवी. वाईनरी सुरु झाल्यापासून तर आजपर्यंत या वाईनरीला तसेच विनियार्डला देश व विदेशातील अनेक महत्वपूर्ण व्यक्तींनी भेट दिली असून त्यांनी वाईनरी, वाईन वाईनबार




व पर्यटकांसाठी केलेल्या सुविधांची प्रशंसा केली आहे. विदेशातील नागरिकही भारतात आल्यानंतर सुला वाईन्स प्रकल्पाला आणि या विनियार्डला हमखास भेट देतात. अमेरिकेच्या कॅलिफोर्निया या राज्यातील नापाव्हॅलीचे विहंगम दृष्य सुला विनयार्ड परिसरात अनुभवता येते. मी नुकतीच कॅलिफोर्नियाला भेट दिली होती. आणि त्यानिमित्ताने नापासिटी व नापाव्हॅली येथे आवर्जून जाऊन आलो. नापासिटी परिसर आणि नापाव्हॅली येथे नाशिक शहर आणि जिल्हा यात अनेक बाबतीत साम्य आढळले.

कारण विदेशातही सुला वाईन्सने विशेष पसंती मिळवली असून अनेक देशांत नाशिकची वाईन निर्यात होऊ लागली आहे. लंडन शहरात या वाईनने विशेष लोकप्रियता मिळविली असून लंडनच्या महापौरांनी श्री. राजीव सामंत यांची विशेष प्रशंसा केली. या महापौरांनी लंडन शहरात राजीव सामंत यांची भेट घेऊन आपल्या सुला वाईन बद्दलच्या भावना कळविल्या होत्या.

वाईनरीवरील विकासकामे सातत्याने सुरू आहेत. "सुला फेस्ट"ने जागतिक स्तरावर मान्यता व प्रसिद्धी मिळविली आहे. देश विदेशातील वाईनप्रेमी दरवर्षी "सुला फेस्ट"ची प्रतिक्षा करत असतात. दरम्यान, नाशिकला चांगली वाईन निर्माण होते हे या प्रकल्पाने सर्व जगाला दाखवून दिले आहे. नाशिकला "वाईन कॅपीटल" म्हटले जाते ते सुला वाईन्सने राबविलेल्या विविध उपक्रमांमुळे आणि इतर वाईनरीजनाही बरोबर घेतल्यामुळे.




गोरख पगार




**GRAINOTCH INDUSTRIES LTD.**

Gat no.238/239, Bhendale Village,
Taluka Gangapur, Dist. AurangabadMAHARASHTRA 431109

# विविध माध्यमांतून अखंडित सामाजिक काम

# विजय नवल पाटील

**माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील मूळचे धुळे जिल्ह्यातील. ते एरंडोल (लोकसभा मतदारसंघ) येथून 7व्या, 8व्या आणि 10व्या लोकसभेसाठी निवडून आले. पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात ते विज्ञान आणि तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक स्पेस आदि खात्यांचे मंत्री होते. आणि नंतर दळणवळण विभागाचेही ते मंत्री होते .**



केंद्रीय मंत्री असताना आदरणीय विजय नवल पाटील उर्फ नानासाहेब यांनी उत्तर महाराष्ट्राच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले. आदरणीय नानासाहेब केंद्रीय मंत्री असताना टेलिफोन कनेक्शन मिळविणे एक दुरापास्त बाब होती, परंतु उत्तर महाराष्ट्रातील लोकांची ही निकड लक्षात घेऊन आदरणीय नानासाहेबांनी शक्य तितक्या लवकर दूरध्वनी कनेक्शन मिळेल यासाठी विशेष प्रयत्न केले आणि त्यासाठी सुविधा उभारण्यासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.

आज उत्तर महाराष्ट्रात सगळीकडे दूरसंचारचे नेटवर्क पसरले आहे. अतिदुर्गम भागात देखील सुविधा पोहोचली आहे. त्यामागे विजय नवल पाटील यांचे योगदान मोठे आहे हे येथे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. याशिवाय आदरणीय नानासाहेबांनी कृषी, सहकार, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. खानदेशात धुळे येथे नामांकित शिक्षण संस्था तसेच औरंगाबाद मराठवाडा भागातही नानांनी अतिशय उत्तम शैक्षणिक कार्य पार पाडले आहे. नाशिक येथे त्यांनी सर्व क्षेत्रातल्या गरजूंना शिक्षण घेता यावे म्हणून अनेक शिक्षण संस्था उभारल्या तसेच शिक्षणाचे जाळे निर्माण केले आहे. आदरणीय नानासाहेबांनी शिक्षण संस्थांसाठी विशेष कामगिरी केली. शिक्षण संस्थांची एकजूट करण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला तसेच शैक्षणिक संस्थांचे अनेक प्रश्न धसास लावले. आदरणीय नानासाहेबांनी अपारंपारिक उर्जा क्षेत्रात अतिशय मोलाची कामगिरी बजावली. अपारंपारिक उर्जा क्षेत्र तुलनेने भारतात दुर्लक्षित होते. आदरणीय नानासाहेबांनी त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली या क्षेत्राला मोलाचं स्थान मिळून दिलं आणि अपारंपारिक ऊर्जा क्षेत्राचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून मौलिक कामगिरी बजावली. आदरणीय नानांच्या या नेतृत्व कुशलतेमुळे सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आदि क्षेत्रात अतिशय चांगले नामांकित असे प्रकल्प महाराष्ट्रात सर्वत्र उभे राहत आहेत. आदरणीय नाना साहेबांबरोबरच त्यांचे चिरंजीव श्री अनिकेत पाटील हेही राजकारण समाजकारणाच्या विविध क्षेत्रात कार्यरत झाले असून नानासाहेबांप्रमाणेच ते आपल्याही कुशल नेतृत्वाची झलक दाखवीत आहेत.

**गोरख पगार**

# ... आणि माणसाचे हृदय बिनधास्तपणे चालू राहते...!

# डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी दिलासादायक नाव !



**नाशिक शहराला वैद्यकीय सेवेच्या बाबतीत वरदहस्त लाभला. डॉ. वसंत गुप्ते, डॉ. वसंत पवार, डॉ. अमृतराव पवार ही या परंपरेतील नामावली; या नामावलीतील आणखी एक श्रेष्ठ नाव म्हणजे डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी यांचे. डॉ. अनिरुद्ध विलास धर्माधिकारी, वय वर्ष ४५, शिक्षण एम. डी. इन्टरनल मेडिसीन, डी. एम. (कार्डिओलॉजी) फेलो इन इन्टरव्हेशनल कार्डिओलॉजी, सर जे. जे. ग्रुप हॉस्पिटलच्या कार्डिओलॉजी विभागात तीन वर्ष रजिस्ट्रार आणि ग्रॅण्ट मेडिकल कॉलेजात एक वर्ष रजिस्ट्रार. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर १०० वर पेपर प्रसिद्ध. प्रथम नाशिकचे राजेबहाद्दूर हॉस्पिटल आणि हार्ट फाऊन्डेशनमध्ये कार्डिओलॉजिस्ट म्हणून अत्यंत प्रभावी कामगिरी आणि जोडीलाच कॉलेजरोडच्या सुमन हॉस्पिटलमध्येही त्यांचे योगदान लाभले. ज्ञानाची प्रचंड भूक असलेले हे डॉक्टर नाशिकमधीलच नव्हे तर समग्र उत्तर महाराष्ट्रातील हृदयरोगींना दिलासा देणारे ठरले.**

**ना** डॉ. धर्माधिकारी यांच्या कर्तृत्वाची केवळ प्राथमिक स्वरुपाची ओळख करून देण्यासाठी कोणताही लेखांक तसा मर्यादित ठरेल पण ते लेखांक हृदयविकाराच्या बाबतीत दक्ष असणाऱ्या नागरिकांसाठी दिलासा ठरलेत ही वस्तुस्थिती आहे. डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी यांच्या कौशल्यामुळे हजारो रुग्ण भयमुक्त जीवन जगू शकले आहेत. नाशिक येथील त्यांच्या साई हार्ट इंस्टिट्यूटमधील त्यांचे व सहकाऱ्यांचे कार्य तसेच शिर्डी येथील साई संस्थानच्या रुग्णालयातील त्यांची हृदयरुग्ण सेवा यामागे अध्यात्मिक शक्तीच कार्यरत असावी असे लाखो साईभक्तांना वाटते. सतत रुग्णांच्या सेवेत असणे त्यांचा स्थायीभाव बनला आहे. साई हार्ट इन्स्टिट्युटमध्ये प्रचंड गुंतवणूक झाली असतानाही सर्वसामान्यांना मदतीचा हात त्यांच्या संस्थेने पुढे केला. आणि केवळ हृदयाच्या रुग्णांसाठी कार्यरत राहणे त्यांचे जगणे बनले आहे. नाशिकला त्यांच्यासारखे डॉक्टर लाभणे ही एक दैवी देणगीच ठरावी. डॉ. धर्माधिकारी यांच्या यशात आणि रुग्णसेवेत डॉ. सौ. पल्लवी धर्माधिकारी (रेडिओलॉजिस्ट) यांचा अतिशय महत्वाचा वाटा आहे. वैद्यकीय सेवेबरोबरच साई हार्ट इन्स्टिट्यूटच्या व्यवस्थापनातही त्यांची प्रभावी भूमिका आहे.



डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी यांनी गेल्या अकरा वर्षांत १५ ते २० हजार अँजिओग्राफी आणि पाच हजारांहून अधिक अँजिओप्लास्टी त्यांनी केल्या आहेत.

डॉक्टर मूळ ओझरचे. त्यांचे वडील डॉ. विलास धर्माधिकारी हे तेथील नावाजलेले फॅमिली फिजिशियन. वडिलांची सेवा पाहून डॉक्टर होण्याचा निर्धार लहानपणीच पक्का झाला. पुण्याच्या बी. जे. मेडिकल कॉलेजमधून त्यांनी एम. डी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. सन १९९७ मध्ये मुंबईच्या सर ग्रॅण्ट मेडिकल कॉलेजमधून हृदयरोगातील डी. एम. कार्डिओलॉजी ही पदवी त्यांनी मिळवली. त्यानंतर इटलीतील मिलान येथील सॅन रॅफेले विद्यापीठात इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजीमध्ये उच्च शिक्षण घेऊन ते सन २००० मध्ये भारतात परतले. मुंबई-पुण्यात अधिक संधी असताना, नाशिक जिल्ह्यातील रुग्णसेवेची गरज लक्षात घेऊन त्यांनी नाशकात काही हॉस्पिटल्समध्ये हृदय सेवा सुरू केली.

हृदयरोग व त्याविषयी समाजात असलेली अनास्था,, गैरसमज पाहून यासंदर्भात खूप मुळापासून काम करावे लागेल, हे डॉक्टरांच्या तेव्हाच लक्षात आले. मग त्यांनी प्रबोधन सुरू केले. ठिकठिकाणी व्याख्याने दिली, वर्तमानपत्रांत लेख लिहिले. त्यांच्या प्रयत्नांमुळे हळूहळू लोकांमध्ये जागृती वाढू लागली.

डॉ. धर्माधिकारी यांची साईबाबांवर अपार श्रद्धा. सन २००६ मध्ये शिर्डी येथे श्री साई संस्थानचे हॉस्पिटल तयार झाले होते. रुग्णांवर माफक दरात उपचार करण्याची सोय तेथे करण्यात आली, मात्र कोणी तज्ज्ञ उपलब्ध होत नसल्याने हॉस्पिटल बंदच होते. डॉ. धर्माधिकारी यांच्या रूपाने तेथे सर्वप्रथम हृदयरोगतज्ज्ञ उपलब्ध झाला. रुग्णांवर सवलतीच्या दरात उपचार होऊ लागले. गरीब रुग्णांना अनेकदा डॉ. धर्माधिकारी यांनी स्वत:च्या ॲम्ब्युलन्समधून शिर्डीला नेले! पुढे याच हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांनी चोवीस तासांत झपाटल्यागत ४७ अँजिओग्राफी-प्लास्टी करून रुग्णसेवेचा नवा आदर्श समोर ठेवला.

सन २००९. डॉ. धर्माधिकारी यांनी शालिमार येथे महाकवी

कालिदास कलामंदिराच्या शेजारी श्री साईबाबा हार्ट इन्स्टिट्यूट ॲण्ड रीसर्च सेंटर हे अद्ययावत हॉस्पिटल उभारले. रुग्णांना अत्याधुनिक सुविधा मिळाव्यात, यासाठी अनेक महागडी यंत्रे उपलब्ध करून दिली. फार कमी हृदयरोगतज्ज्ञांकडे उपलब्ध असणारे हाडांचा ठिसूळपणा तपासण्याचे यंत्रही 'साईबाबा'मध्ये आहे.

'रुग्णाला बरे केल्याचा आनंद और असतो. मालेगाव येथील एका नऊ वर्षांच्या बालिकेच्या हृदयाला छिद्र होते. अशी छिद्रे छाती उघडूनच बंद करावी लागतात. मी मात्र नवा प्रयोग करीत तिच्या मांडीतील रक्तवाहिनीतून एक छत्री टाकून ती हृदयापर्यंत पोहोचवली आणि छिद्र बंद केले. तेव्हा तिच्या नातेवाईकांच्या चेहऱ्यावरील आनंदाची किंमत पैशांत मोजता येणार नाही अशी होती.' डॉ. धर्माधिकारी सांगतात. 'साईबाबा' मध्ये रुग्णांचा ओघ सतत वाढता आहे. हॉस्पिटलच्या ओपीडी विभागात रोज दोनशे जणांची तपासणी केली जाते. २९ तज्ज्ञ डॉक्टर्स, दोनशे कर्मचाऱ्यांचा स्टाफ रुग्णांच्या दिमतीला हजर असतो. लोक मोठ्या विश्वासाने डॉ. धर्माधिकारी यांच्याकडे येतात. सहा महिन्यांपूर्वी स्वित्झर्लंडमध्ये झालेल्या वैज्ञानिक परिषदेत भारतातील चार रुग्णालयांतील हृदय शस्त्रक्रियांचे थेट प्रक्षेपण करण्यात आले, त्यांत साईबाबा हार्ट इन्स्टिट्यूटचा समावेश होता. ॲन्जिओप्लास्टीबाबत जगात जे होऊ शकते, ते सगळे 'साईबाबा'मध्ये होऊ शकते, असे डॉक्टर अभिमानाने सांगतात. युरोपातील अनेक नामांकित तज्ज्ञांनी नाशिकमध्ये येऊन 'साईबाबा'मध्ये शस्त्रक्रिया केल्या आहेत.

डॉक्टरांनी आतापर्यंत शंभराहून अधिक जागतिक परिषदांत शोधनिबंधांचे वाचन केले आहे. त्यांच्या सेवेला सामाजिक जाणिवेचेही भान आहे. म्हणूनच हॉस्पिटलच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्यावरही डॉ. धर्माधिकारी यांनी उपचार केले आहेत. अण्णांशी स्नेह जुळल्यानंतर तर डॉ. धर्माधिकारी राळेगणसिद्धीला अण्णांच्या तपासणीसाठी नियमितपणे जात असतात. अण्णांच्या दिल्ली व मुंबई येथील उपोषणाच्या वेळीही त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवण्यासाठी डॉ. धर्माधिकारी तेथे जातीने हजर होते.

'जे मला पटले, तेच रुग्णाला सांगण्याचा माझा प्रयत्न असतो. मी जे काही सांगेल, त्यात रुग्णाचा फायदाच असायला हवा, त्यापुढे पैसे आणि इतर सर्व गोष्टी गौण असाव्यात, या तत्त्वाने आजपर्यंत सेवा देतोय.... देत राहणार आहे... - डॉ. धर्माधिकारी यांच्या बोलण्यातून सच्चेपणा झळाळून निघत असतो.... डॉक्टरांचे काम अत्यंत जोखमीचे. गुंतागुंतीच्या 'प्रोसिजर्स' चा कायम तणाव. जराशी 'चूक होणेही रुग्णाच्या जिवावर बेतणारे. पण हा सगळा तणाव निवळल्यानंतर... रुग्णावर झडप घालू पाहणाऱ्या मृत्यूशी दोन हात करून.... त्याला परतवून डॉक्टर जेव्हा आपल्या कॅबिनमध्ये येतात, आरशात स्वत:ची प्रतिमा निरखत शांतपणे वॉशबेसिनमध्ये हात धुवू लागतात.... तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर जे समाधान पसरलेले असते, ते ईश्वराच्या अस्तित्वाची प्रचिती आलेल्या एखाद्या ध्यानस्थ तपस्व्यासारखे असते...

गोरख पगार




*With Best Compliments!*

**Dr. Sanjay V. Bhawsar**

M.D.S. (Bom.)

Prosthodontist, TMJ-Consultant, Implantologist

**Diploma** - International College of Neuromuscular Orthodontics & Graphology (Italy)

**Diplomate** - Laser Denstry (Austria)

**Fellow** - International congress of Oral Implantologist (USA)

**Principal** - M.G.v. K.B.H. Dental College & Hospital, Nashik

**Secretary** - CDH - IDA Head office

**Dr. Shailaja S. Bhawsar**

B.D.S. (Bom.)

**Dr. Rutuja Bhawsar Borkar**

M.D.S. (M.U.H.S.) Endodontist

**Dr. Aditya S. Bhawsar**

B.D.S. (M.U.H.S.)

**RUTU - DENT**

**Bhawsar Dental Care & Research Centre Pvt. Ltd.**

38, Pradhan Park, M.G. Road, Nashik- 422 001 Ph.: 0253-2577389, 6697827 / Mobile : 9422246871

Email : sanjayvasantbhawsar@yahoo.com

16, Asawari Chembers, College Road, Nashik - 422 002.

# “चांगली माणसं बरोबर घेऊन कठोर परिश्रम म्हणजे यशस्वी व्यवसाय !”: राजुभाई शहा

**नाशिकमधील लॅण्ड डेव्हलपमेंटचा व्यवसाय म्हटला की नजरेसमोर येणारे प्रमख नाव म्हणजे विराज इस्टेट. नाशिकमधील एम.जी.रोडवर विराज इस्टेटचे कार्यालय आहे. अर्थ-उद्योगच्या या अंकाच्या निमित्ताने प्रथम करण राजेंद्र शहा आणी त्यानंतर विराज इस्टेटचे सर्वेसर्वा श्री. राजेंद्र रसिकलाल शहा यांच्या भेटीचा योग आला. श्री. राजेंद्र शहा म्हणजे आकांक्षांचा वेध घेणारे शांतीप्रिय आणि संयमी व्यक्तिमत्त्व.**

गोरख पगार

श्री. राजुभाई सांगतात, आमचे वडील रसिकलाल चंदुलाल शहा यांचा मूळ व्यवसाय कापडाचा, वडीलांचे आमच्या लहानपणीच निधन झाले म्हणून आम्ही काकांसोबत त्यांनीही कापडाच्या व्यवसायास सुरुवात केली. परंतु या व्यवसायाचे क्षेत्र मर्यादित आहे याची जाणीव झाल्यानंतर आणि काही क्रिएटिव्ह करता येत नाही हे पाहिल्यानंतर अत्यंत लहान प्रमाणात बिल्डरशिपचा व्यवसाय सुरु केला. १९८० मध्ये आमच्या या व्यवसायाची सुरुवात अत्यंत लहान प्रमाणात झाली. बिल्डिंगचे २/३ प्रोजेक्ट केल्यानंतर त्या व्यवसायातीलही काही मर्यादा लक्षात आल्या. आणि आम्ही लॅण्ड डेव्हलपमेंटच्या व्यवसायाकडे वळलो. या व्यवसायात विकासाच्या दृष्टितून बरेचसे क्रिएशन करण्यासारखे आहे. उदा. विकासायोग्य जागा, तेथील भूखंडाचे योग्य प्लॅनिंग, शहर विकासाच्या समतोलाचा विचार, पर्यावरणाचा विचार करुन त्याची योग्य सांगड घालता येऊ शकते. जे शहराचे सौंदर्य आणि नागरी हिताच्या दृष्टिने महत्वाचे आहे. महत्वाचे म्हणजे या व्यवसायात प्रामाणिकपणा महत्वाचा आहे. आम्ही तो कसोशीने पाळला. सर्व व्यवहार चोख ठेवले. त्यामळेच आम्हाला या व्यवसायात आम्ही यश मिळवू शकले.

महत्वाचे म्हणजे नवे बांधकाम व्यावसायिक आम्ही घडवू शकलो आहोत. अनेक नवीन व्यावसायिकांनी



राजेंद्र शहा



विल्होळी येथे जगप्रसिद्ध जैन मंदिराची उभारणी

आमच्याकडील भूखंड घेऊन विकसित केले व पुढे कोट्यावधींचा व्यवसाय केला ही वस्तुस्थिती आहे.

लॅण्ड डेव्हलपमेंट व बांधकाम व्यवसायात, व्यावसायिकांनी ग्राहकांचा विश्वास संपादन करणे आवश्यक आहे. त्यासाठी बांधकाम व्यावसायिक आणि लॅण्ड डेव्हलपर्सनी प्रयत्न करणे जसे गरजेचे आहे तसेच शासनानेही हा व्यवसाय कमी दगदगीचा, त्रासाचा आणि सुलभ होईल यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. बांधकाम व्यवसायाला उद्योगाचा दर्जा तर शासनाने द्यावाच, परंतु त्याच बरोबर काही बाधक कायदेही त्वरीत उठवावे. म्हणजे हा व्यवसाय बराचसा सुलभ होऊ शकेल. या क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील व प्रत्येकाचे घराचे स्वप्न साकार होईल. व्यावसायिक म्हणून आम्हाला कोणत्याही अडचणी आल्या नाहीत. शासन दरबारी तसेच मनपातही आम्हाला अडचण आली नाही. सर्वांचे सहकार्य मिळते, असेही राजेंद्र शहा यांनी सांगितले. त्याचे कारण आम्ही सरळ मार्गाने, प्रामाणिकपणे आणि सचोटीने व्यवसाय करतो. या व्यवसायात नव्याने येऊ इच्छिणाऱ्यांनी यशस्वी व्हायचे असेल तर ही गोष्ट विसरु नये असा सल्लाही राजेंद्र शहांनी यावेळी दिला. अत्यंत धकाधकीच्या आणि तीव्र स्पर्धा असलेल्या या व्यवसायात राजेंद्र व विलासभाईंनी चांगले यश मिळविले. अर्थात ते कष्ट आणि सचोटीच्या बळावर. पैशापेक्षाही मानसिक स्वास्थ्य महत्वाचे आहे. आणि ते व्यावसायिक प्रामाणिकपणा असला तरच शक्य होते असे शहा बंधूंचे मत आहे.

व्यवसायाबरोबरच अनेक समाजोपयोगी उपक्रम शहा बंधुंनी राबविले. ते धार्मिक वृत्तीचे आहेत. विल्होळीजवळील धर्मचक्र प्रभाव ट्रस्टचे ते आजीव सदस्य असून तेथे जैन तीर्थ उभारण्याचा महत्वाकांक्षी



**विलास शहा**




**विराज शहा**



**करण शहा**


प्रकल्प त्यांनी पूर्णत्वास नेला. विल्होळीजवळ अतिशय सुंदर जैन मंदिर उभे राहिले आहे. मंदिराचे बांधकाम आणि परिसर भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडतो. भारतातील सुप्रसिद्ध जैन मंदिरांमध्ये नाशिकच्या विल्होळी येथील जैन मंदिराचा समावेश आहे आणि या मंदिराच्या उभारणीसाठी राजेंद्र शहा आणि कुटुंबियांचे योगदान लाभले. हे जैन मंदिर आणि ट्रस्टच्या माध्यमातून, पावित्र्याचे भान राखत अनेक सेवाभावी उपक्रम राबविले जातात. त्यात भक्तांच्या निवासाची सोय आणि भोजनाचा समावेश आहे. मंदिरातील मूर्ती आणि चित्रदृष्ये समाजासाठी अनेक आदर्शांचा संदेश देणारी आणि आदर्श स्थापित करणारी ठरली आहेत. राजेंद्र शहा यांनी गोपालन संवर्धनावर विशेष भर दिला असून अद्ययावत गोशाळा काढली आहे. हे सर्व उपक्रम राजेंद्र शहा आणि शहा कुटुंबियांनी सेवाभावी पद्धतीने राबविले आणि समाजाकडून पाठीवर थाप मिळविली. असे व्यावसायिक केवळ अपवादात्मक असतात.

आता राजेंद्र शहा व विलास शहा यांचे सुपुत्र करण शहा व विराज शहा यांनीही विराज इस्टेटच्या कामात सहभाग घेतला आहे. उच्चविद्यविभुषित आणि व्यवस्थापन शास्त्रातील तज्ज्ञ असलेल्या करणभाऊंनी आणि विराज यांनी आपल्या कल्पक नेतृत्वाखाली पूर्ण कंपनीच्या व्यवस्थापनावर आपली छाप उमटवली. राजेंद्र शहा आणि विलास शहा यांना या नव्या उमद्या व्यावसायिकांची दमदार जोड मिळाली आहे. श्री. करणभाऊ शहा हे राजेंद्र शहा यांचे चिरंजीव. श्री. करणभाऊ व्यावसायिक व्यवस्थापन शास्त्रातील पदवीधर आहेत. व्यवस्थापन शास्त्राची पदवी त्यांनी विदेशात घेतली. ते अर्थ-उद्योग शी बोलतांना म्हणाले विराज इस्टेटने अनेक धडाडीचे व्यावसायिक उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. बांधकाम क्षेत्रात आदर्स ठरावे अशा निवासी प्रकल्पांची उभारणी विराज इस्टेट मार्फत होत असून शहरात मोक्याच्या ठिकाणी व्यवसाय उभारणीचे आणि अनेकांच्या घरकुलाचे स्वप्नं त्यामुळे साकार होणार आहे. शहरात फक्त मोक्याच्याच ठिकाणी निवासी व व्यावसायिक संकुले विराज इस्टेटच्या माध्यमातून उभी राहिली आणी हे प्रकल्प संबंधितांसाठी नवी संजीवनी ठरले. शहरातील अनेक मोक्याच्या ठिकाणी 'विराज'चा निवासी तसेच व्यावसायिक प्रकल्प आहे. नुसतेच बांधकाम प्रकल्प नाही तर मोक्याच्या ठिकाणचे मोकळे भूखंडही 'विराज' इस्टेटने वितरित केले आणि या जागांवर बांधकामे होऊन अनेक ख्यातनाम बांधकाम व्यावसायिकांची निर्मिती 'विराज'ने केली ही बाब येथे नमूद करावीसी वाटते. याशिवाय श्रीमती कांताबाई रसिकलाल आयंबिल ट्रस्टही शहा बंधूंनी उभारला असून, समाजातील अनेक गरजू त्याचा लाभ घेत आहेत.



# शिखर गाठण्यासाठी ध्येय निश्चिती महत्त्वाची !

## प्रकाश लड्ढा



गोरख पगार

**नाशिक शहरातील त्र्यंबक नाक्यावर खासगीकरणातून प्रतिष्ठित पिनॅकल मॉल बांधण्यात मोलाचा वाटा उचलणाऱ्या प्रकाश लड्ढा यांच्या प्रकाश कन्स्ट्रुवेल या प्रसिद्ध बांधकाम कंपनीचे संपूर्ण महाराष्ट्रात भरीव काम आहे. त्यांची कंपनी आज संपूर्ण महाराष्ट्रात विविध सरकारी वसाहती आणि इमारती बांधत आहे. त्यांच्या कंपनीने संपूर्ण महाराष्ट्रात मोठे गुडवील निर्माण केले आहे. एवढेकी रु.60 कोटींचा आयपीओ ओव्हर-सबस्क्राइब झाला आणि तब्बल रु. 110 कोटी उभे राहिले ! हे गुडवील एका दिवसात निर्माण झालेले नाही.**

१९७० मध्ये जेव्हा प्रकाश लड्ढा आपल्या स्वप्नांसह नाशिकला पोहोचले तेव्हा त्यांच्याजवळ हजार रुपयेही नव्हते.

प्रकाश लड्ढा यांचे मूळ गाव चंद्रपूर जिल्ह्यातील जामनी. बाबा आमटे यांच्यासाठी प्रसिद्ध असलेले वरोरा गाव या ठिकाणापासून अवघ्या ३ ते ४ किमी अंतरावर आहे. वडीलांचे छोटे किराणा दुकान होते.

तिथे त्यांनी शेतीही केली. प्रकाश यांचे दहावीपर्यंतचे शालेय शिक्षण वरोरा आणि नंतर वाशिम येथे झाले. परिस्थिती अर्थातच बेताची असल्याने नोकरीचा शोध सुरू झाला. या प्रयत्नात प्रथम त्यांनी मलकापूर येथील कापड दुकानात सेल्समनची नोकरी मिळवली, नंतर ते स्टेशनरीच्या दुकानात काम करू लागले. स्टेशनरीच्या दुकानात असतानाच ते नाशिकला एक ऑर्डर पूर्ण करण्यासाठी आले आणि व्यावहारिकदृष्ट्या सर्वोत्तम अशा नाशिक शहराच्या प्रेमात पडले.

पुढे ओळखीच्या माध्यमातून त्यांनी रामूभाई या बांधकाम व्यावसायिकाच्या फर्ममध्ये शिपायापासून ते व्यवस्थापकापर्यंत काम केले. रामूभाई सिंचन प्रकल्पांच्या कामात गुंतले होते. लड्ढा यांनी त्यांच्या मदतीतून दारणा धरणाच्या एका प्रकल्पावर काम सुरू केले. खिसे रिकामे असताना उत्साहाने आणि जोमाने सुरू झालेले 19 लाख रुपयांचे हे काम त्यांच्या आयुष्याला नवे वळण देणारे ठरले. खिसा रिकामा असला तरी हरकत नाही, पण काम करण्याची जिद्द हवी. हे लड्ढा यांचे मत होते. आणि हाच दृष्टिकोन समोर ठेवून काम पूर्ण करण्यात आले. अशी किरकोळ कामे करत असतानाच लड्ढा यांनी टायपिस्ट म्हणूनही काम सुरू केले होते. पण नवीन नवीन क्षेत्र शोधणे आणि ते गाठणे हा हव्यास आणि आकांक्षा त्यांनी कधीच सोडली नाही. त्यातूनच स्टोन क्रशरचा व्यवसाय सुरू करण्याचे त्यांच्या मनात थाटले होते आणि त्या दृष्टीने तयारी सुरू झाली होती. पण त्यासाठी पुरेसे भांडवल नव्हते. सुदैवाने, बँक ऑफ इंडियाने सुशिक्षित बेरोजगारांसाठी आर्थिक सहाय्य योजना सुरू केली. या योजनेचा फायदा घेत यांनी ५० लाखांचे कर्ज घेतले. स्वत:चे भांडवल होते 75,000 रूपये, तेवढेच भांडवल आणि बँकेच्या कागदपत्रांवर रामूभाईंनी हमीदार म्हणून सही केली. ही उल्लेखनीय बाब ठरली. तेव्हा रामूभाईंनी स्वाक्षरी केली नसती, तर ? असे' रामूभाईंबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना लड्ढा म्हणतात.

2 फेब्रुवारी 1978 रोजी लड्ढा यांनी स्टोन क्रशिंगचा व्यवसाय सुरू केला आणि पुढच्याच वर्षी बांधकाम व्यवसायात प्रवेश केला. नाशिक शहरातील काठेगल्ली येथील वनराज सोसायटीत ३० बंगले बांधायचे होते. हा करार यशस्वीपणे पूर्ण केल्यावर त्याचा

आत्मविश्वास दुप्पट झाला. सुरुवातीला त्यांच्याकडे कंपनीचे लेटरहेडही नव्हते. तुळई, स्तंभ यांसारख्या शब्दांत ते पारंगत नव्हते. मजूर कंत्राटदार इक्बाल खान दर सांगतील आणि लड्ढा नंतर काम पूर्ण करतील असे बरेच दिवस चालले. त्यानंतर कामाला गती मिळाली. त्यांच्या प्रकल्पांमध्ये नाशिक, औरंगाबाद येथे 288 निवासी क्वार्टर: जिल्हाधिकारी कार्यालयाचा समावेश आहे. लातूर येथे मुलींच्या वसतिगृहाची इमारत; उस्मानाबाद येथील जिल्हा परिषद कार्यालय, औरंगाबाद येथे आयुर्वेद महाविद्यालय. धुळे येथील पोलिस क्वार्टर्ससह इतर आणखी बरीच कामे.




1996 मध्ये प्रकाश कन्स्ट्रुवेलची स्थापना झाली. हिंगोली येथे एसआरपीएफ कॅम्पचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर त्यांनी या प्रकारच्या बांधकामांचे काम बंद केले. त्यानंतर 528 फ्लॅट्सची पार्कसाइड योजना बांधण्याचे महत्त्वाचे आव्हान त्यांनी पेलले. सुसज्ज आधुनिक रुग्णालयाची इमारत बांधण्याचेही लड्ढा यांचे उद्दिष्ट आहे. प्रकाशजींच्या आयुष्याला नवे वळण देणाऱ्या रामूभाईंना त्यांच्या कंपनीत पुढे व्यवस्थापकीय संचालक बनवण्यात आले.

लड्ढा यांचा स्वभाव काहीसा हट्टी आहे. पण 1997-98 मध्ये विपश्यनेच्या अनुभवानंतर त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बराच बदलला. प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे आणि ते शांतपणे ऐकले पाहिजे हे तत्व त्यांनी मान्य केले. परदेशी दौऱ्यांमुळेही त्याच्या स्वभावात लक्षणीय बदल घडून आला, अशी माहिती लड्ढा यांनी दिली. विविध देशांना भेटी देऊन मिळालेल्या अनुभवांनी माझे जीवन समृद्ध केले. विविध गुणांची माणसे भेटली. न्यूझीलंडमधील ८२ वर्षांच्या वृद्ध महिलेला तिच्या उदरनिर्वाहासाठी काम करताना पाहिल्यावर वृद्धापकाळाकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन बदलला. असे लड्ढा सांगतात.




रुचिता लड्ढा

नाशिकची प्रगती व्हावी, विकास व्हावा. पण पुण्यासारखे नाही, असे ते सांगतात. नाशिकमध्ये जुने आणि नवे कल्पकतेने एकत्र विणले गेले पाहिजे. कोणाचीही फसवणूक करू नका. ज्याने तुम्हाला पैसे दिले आहेत त्या व्यक्तीला पूर्ण समाधान द्या. लड्ढा यांनी जोपासलेली ही काही व्यावसायिक मूल्ये आहेत आणि म्हणूनच त्यांच्या जीवनकथेत सत्यतेची सोनेरी छटा आहे जी येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील.

लड्ढा यांच्या व्यवसायाच्या यशात त्यांच्या कुटुंबियांचा मोठा वाटा आहे. पत्नी आणि दोन्ही मुलींनी त्यांना त्यांच्या व्यवसायात मोलाची साथ दिली. मोठी कन्या रुचिता लड्ढा त्यांच्या व्यवसायाचे व्यवस्थापन बघत असते, आता त्यात त्यांचा पुतण्या मनोज लड्ढा यांनीही महत्त्वाचा सहभाग नोंदवला आहे. ते प्रकाश कन्स्ट्रुवेल या कंपनीचे संचालक आहेत.

व्यवसायात यशस्वी होण्यासाठी कष्टांना पर्याय नाही, पण त्याचबरोबर आपण जे करतो त्यात सर्वांचा सहभाग असतो आपण समाजाचे देणे लागतो हे कधीही विसरून चालत नाही. माझा स्वभाव हा नेहमीच मदतीचा हात पुढे करण्याचा राहिला. मी समाजातील ज्यांना - ज्यांना माझ्या मदतीची गरज आहे त्यांच्यासाठी मदतीचा हात पुढे केला पण अर्थातच त्यातून काहीतरी निष्पन्न व्हावे यासाठी माझं सहाय्य राहत आले आहे ही बाब येथे नमूद करावीशी वाटते. व्यवसायात यशस्वी होण्यासाठी तुमच्या अध्यात्मिक असण्याला महत्त्व आहे, कुणीतरी आपल्या सर्व कार्याकडे पाहत असतो ही भावना मी कायमच माझ्या मनात ठेवली आणि कदाचित त्यामुळेच मी शिस्तबद्ध जीवन जगत व्यवसाय करत राहिलो. माझ्या जीवनात विपश्यनेचा वाटा अतिशय मोठा आहे. विपशनेमुळेच माझ्या जीवनाला एक विशिष्ट प्रकारची साथ आणि लय लाभली मी हे कधीही विसरत नाही म्हणूनच मी सदैव आशावादी राहत आलोय किंवा कधीही मी आशा सोडून देत नाही. प्रयत्न सोडू नयेत यश नक्की मिळते एवढेच या निमित्ताने.

DHUMAL
DHUMAL METALS




Dhumal Metals, your "Strong and Dependable partner", is a modern manufacturing setup equipped with the latest state of the art machinery that provides you with quality Metal Building Systems meeting your timelines.

Dhumal Metals Pvt. Ltd.

CORPORATE OFFICE
E-36, D Road, MIDC, Satpur,
Nashik - 422007, Maharashtra, India.

CONTACT
Amey - +91 96570 03084
Vinit - +91 78880 16084

+91 253 2350384 / +91 253 2350684
salesdm@dhumal.com

https://dhumalmetals.com

# “ईश्वरनिष्ठा आणि स्वकर्तृत्वाला वाव मिळवून देणे म्हणजे उद्योजकता !”







अर्थ उद्योग मासिकाच्या गेल्या पंचवीस वर्षाच्या कार्यकाळात मला सातत्याने ज्यांच्यावर लिहावसं वाटलं आणि ज्यांचे उद्योगातील यश हे कायम प्रेरणादायी ठरले, आणि ज्यांच्या यशाची कथा समाजासमोर ठेवावीशी वाटली त्यातीलच एक व्यक्तिमत्त्व म्हणजे विक्रांत हॅप्पी होमचे संचालक उद्योजक गंगाधर जाधव हे होत. गंगाधर जाधव यांनी उद्योग व्यवसायात जे निर्माण केलं ते अनेकांना आशेचे किरण दर्शविणारे आहे. आयुष्यात उभं करणारं आहे आणि काय करावे हे ठरवण्यासाठी एक मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. तसेच भांडवल नाही म्हणून कोणतीही गोष्ट आडून राहत नाही हे दर्शविणारा मार्गदर्शक पाठ आहे. अनेक अडचणींना सामोरं जात त्यातून मार्ग काढणारे श्री. गंगाधर जाधवांचे उदाहरण आहे.

मराठी माणूस नोकरीच्या मागे धावत असताना अधिकारीपदाच्या नोकरीला दूर सारून व्यवसायात उतरण्याचं धाडस त्यांच्यात आहे आणि काहीही भांडवल नसताना कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणारा हा उद्योजक आहे. ही बाब येथे उल्लेख करण्यासारखी आणि त्यांच्यावर नेहमीच लिहावंसं का वाटतं याचं कारण स्पष्ट करणारी आहे. निफाड तालुक्यातील एका खेडेगावातून ते आले. त्यांचे वडील कारभारी जाधव शेती करत. अतिशय नेकीने शेती करणारा माणूस पण मुलांनी काहीतरी व्हावं असे स्वप्नं पाहणारा आणि त्यांना शिकवण्यासाठी धडपड करणारा, त्यासाठी मुलांना शहरात आणणारा आणि शहरात चांगल्या शाळेत मुलांनी शिकावं यासाठी धडपड करणारा माणूस. गंगाधर जाधव त्यांच्या वडिलांची कथा जेव्हा सांगतात तेव्हा पुढच्या पिढीच्या यशाचे रोपण आई-वडील कसे करतात याचे उदाहरण मिळते. पुढे गंगाधर जाधव यांनी अतिशय चांगल्या वेतनाची, अधिकारपद आणि मानसन्मानाची शासकीय नोकरी सोडून हातात काहीही भांडवल नसताना रियल इस्टेटचा व्यवसाय करायचा ठरवलं आणि त्यात नाशिक शहर आणि महाराष्ट्र पातळीवर अतिशय भरीव काम केलं.पुढे त्यांच्या दुसरी पिढीने चि. प्रशांत जाधव आणि विक्रांत जाधव यांनी वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत रिअल इस्टेटच्या व्यवसायात नेत्र दीपक यश मिळवले. मुलांनाही आपल्या वडिलांनी जे वेगळे प्रयोग केले तसंच काहीतरी करावे असं वाटतं. त्यासाठी ते व्यावसायिक क्षेत्रे निवडून त्यात स्वत:ला झोकून देतात आणि यश मिळवतात मराठी माणसांसाठी ही निश्चितच मार्गदर्शक आणि प्रेरक स्वरूपाची यशोगाथा आहे.

**गोरख पगार**



# मदर "अर्थ"चा बचाव आणी मानवी कल्याणाचा उपक्रम

# मंत्राज ग्रीन रिसोर्सेस

डॉ. यू. के. शर्मा, मंत्राज ग्रीन रिसोर्सेस लिमिटेडचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक आहेत - कास्ट आयर्न फाउंड्रीच्या कौटुंबिक व्यवसायाला चालना देण्याऐवजी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाद्वारे औद्योगिक प्रदूषण कमी करण्यासाठी एक नवा मार्ग शोधणारा उद्योजक म्हणून भारतीय देश पातळीवर उदयास आला. मंत्राज ग्रीन रिसोर्सेस लिमिटेडने आपल्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाद्वारे औद्योगिक प्रदूषण नियंत्रित करण्याच्या व्यवसायात स्वत:चे वेगळे असे खास स्थान निर्माण केले आहे.

श्री. शर्मा यांच्या वडीलांचा कोलकाता येथे कास्ट आयर्न फाउंड्रीचा व्यवसाय होता., तो व्यवसाय तरूण तडफदार यु के शर्मा यांना आकर्षित करू शकला नाही. परिणामी डॉ शर्मा नव्या क्षेत्राचा शोध घेत मुंबईत पोहचले. प्रारंभी एका कंपनीत पर्यवेक्षक म्हणून नोकरी केली. 22 वर्षांच्या कारकिर्दीत शर्मा त्याच फर्मचे उपाध्यक्ष बनले! त्यात त्यांना मानसिक स्वास्थ्य नव्हेत आणि म्हणून शर्मा उद्योजक बनले, कारण ते "व्यावसायिक" म्हणून ओळखले जाण्यास उत्सूक होते आणि त्यांच्या कुटुंबासाठी आर्थिक सुरक्षा सुनिश्चित करू इच्छित होते.

## ग्रीन हेडस्टार्ट

"वातावरणातील हरितगृह वायू सांद्रता कमी करून ग्लोबल वार्मिंग कमी करण्यासाठी क्योटो प्रोटोकॉल कराराची अंमलबजावणी करण्यात आली. संयुक्त राष्ट्रांच्या फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंज (युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंज) द्वारे क्योटो प्रोटोकॉल करार लागू झाला, तेव्हाच्या सुमारास 'मिथेन एक्स्ट्रॅक्शन आणि पॉवर जनरेशन' प्रकल्प मिळवला. UNFCCC). त्या सेवे दरम्यान त्यांची 'स्वच्छ विकास यंत्रणा' अंतर्गत संयुक्त राष्ट्रांतर्गत नोंदणी झाली.

## यूएसपी पॉवर!

"लंडनमधील हाऊस ऑफ लॉड्र्सला भेट देताना त्यांनी वॉटर एटीएम पाहिले होते आणि स्वच्छ पाण्याची खात्री करण्यासाठी राजस्थानमधील त्यांच्या मूळ गावात वॉटर



एटीएम प्रकल्प सुरू केला. प्रकल्प सल्लागार म्हणून, त्यांनी 'वेस्ट वॉटर ट्रीटमेंट टेक्नॉलॉजी'वर भर दिला. जे पर्यावरणाचे संरक्षण करते. पुढे अनोख्या तंत्रज्ञानाच्या वापराने मंत्राज ग्रीनने स्वयंपाकघरातील कचऱ्यापासून ऊर्जा निर्माण करणारे आणि स्वयंपाकासाठी वापरता येणारे मिथेन वायू सोडणारे उपकरण देखील तयार केले."

## दोन चांगले ऑनलाइन?

"दरम्यान त्यांनी नाशिक टोल नाक्यावर कॅप्टिव्ह पॉवरचा ग्रिड वापर कमी करणारे एक युनिट तयार केले. त्यामुळे कार्बन उत्सर्जन मोजता येते आणि ग्रीनहाऊस गॅसचे उत्सर्जन कमी असल्याने एकूण परिणाम कमी होतो. आमच्या दोन्ही नवकल्पना ऑनलाइन आहेत आणि आम्ही प्रयत्न करत आहोत. त्या दोन्ही कल्पना बाजारात आणण्यासाठी असेही डॉ. शर्मा म्हणाले.

## विजेता फॉर्म्युला

"तुमचा आत्मविश्वास कधीही कमी होऊ देऊ नका, काहीही झाले. तरी काम पुढे ढकलू नका आणि तुमच्या नशिबाला शिव्याशाप देऊ नका. वेळ आणि तंत्रज्ञानासोबत पुढे जा आणि तुमचा कर्मचारी देखील त्याच्याशी परिचित आहे हे पहा. जोखीम घ्या, कारण जर तुम्ही कोणतीही जोखीम घेतली नाही तर... ही एक मोठी जोखीम आहे."

मंत्राज ग्रीन रिसोर्सेस लिमिटेड ही ०९/०५/२०१३ रोजी स्थापन झालेली भारतीय सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी आहे. एमजीआरएल सोलर स्ट्रीट



लाईट, सोलर एसी/डीसी पंप, पर्यावरण प्रदूषण नियंत्रण यासारख्या उच्च दर्जाची उत्पादने/सेवांची आघाडीची उत्पादक ऑफर केलेली उत्पादने/सेवा उच्च गुणवत्ता, स्पर्धात्मक किमती, आवश्यक कार्यक्षमता आणि कमी देखभाल यासारख्या वैशिष्ट्यांसाठी प्रसिद्ध आहे. त्यांच्या अनुभवी कर्मचाऱ्यांच्या मदतीने, कडक गुणवत्ता नियंत्रण उपाय आणि ग्राहक सेवेवर लक्ष केंद्रित केल्यामुळे, कंपनी MGRL सोलर स्ट्रीट लाइट, सोलर एसी/डीसी पंप, पर्यावरण प्रदूषण नियंत्रण आदि अनेक श्रेणींमध्ये आणि मॉडेल्समध्ये सेवा देऊ शकली आहे. त्यांची उत्पादने/सेवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत टिकून आहेत.

तसेच त्यांनी त्यांच्या ग्राहकांना आणि खरेदीदारांना बाजारातील स्पर्धात्मक किंमतीवर उत्पादने/सेवा पुरवण्याचा ट्रॅक रेकॉर्ड सिद्ध केला आहे. कंपनीची स्थापना 2005 मध्ये मंत्र संसाधनांच्या नावाने झाली. कंपनी एक ISO 9001:2008 प्रमाणित कंपनी आहे जी पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) अभ्यास आणि पर्यावरणाशी संबंधित प्रकल्पांसाठी सल्लागार सेवांची संपूर्ण श्रेणी प्रदान करण्यात गुंतलेली आहे. कंपनीने संस्थापक डॉ. यू.के. शर्मा यांच्या नेतृत्वाखाली व्यावसायिकरित्या व्यवस्थापित संस्था म्हणून वेगाने प्रगती केली आहे. आमची तीक्ष्ण व्यावसायिक बुद्धिमत्ता आणि दूरदर्शी दृष्टीकोन यामुळे कंपनीला बाजारपेठेतील सर्वोच्च संस्थांमध्ये स्थान मिळाले आहे. साखर उद्योग, डिस्टिलरीज, सरकार यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये आमच्या बहुमुखी सेवांचा वापर केला जातो यावरून बाजारपेठेतील त्यांचा आमचा प्रभाव दिसून येतो.

**गोरख पगार**







फ्रेश, टेंडर
आणि
हायजिनिक
प्रो™
चिकन
नाशिकमध्ये
8+
स्टोअर्स
चिल्ड चिकन आणि कट्स
आमचे स्वत:चे फार्म्स आणि कंपनी आउटलेट्स !
करी कट
चिकन विंग्स
चिकन ड्रमस्टिक
बोनलेस चिकन
अंडी
मॅरिनेटेड चिकन
जंबो अंडी
कडकनाथ अंडी
टिक्का
लॉलीपॉप
हरियाली टिक्का
रॉनक आर्किड,
मनीष सुपर मार्केट शेजारी,
रामेश्वर नगर
लिलावती अपार्टमेंट,
न्यू रचना हायस्कुल समोर,
सावरकर नगर
काशिगंगा अपार्टमेंट
कृष्णा विजय मिसळ शेजारी
गंगापूर रोड
अव्हाड हॉस्पिटल शेजारी
आर. डी. सर्कल
गोविंद नगर
वक्रतुंड निलायम अपार्टमेंट,
त्रिकोणी गार्डन जवळ,
काठे गल्ली
नारायण अपार्टमेंट,
वेलनेस मेडिकल जवळ
अशोक मार्ग
श्री कृष्णा
चौक,
इंदिरा नगर
श्रद्धा कॉम्प्लेक्स,
अतुल स्वीट्स जवळ,
उत्तम नगर
A venture by
ANAND AGRO GROUP
Together we prosper
रेडी टू कूक फ्रोझन प्रॉडक्ट्स
Venky's
GADRE
फ्रोझन फिश : बासा । सॅल्मन । सुरमई | कोळंबी
7770006858 | www.prochickennashik.com | /prochicken.nashik

# नाशिकची सुसंस्कृत आणि आदर्शव्रत उद्योजकता

# विवेक गोगटे

गोगटे इलेक्ट्रोसिस्टिम्स (नाशिक) प्रा. लि. एकेकाळी फाईव्ह आर इलेट्रॉनिक्स या नावाने हा उद्योग सुरू झालेला होता. पुढे विस्तारात त्याचे नाव बदलले. सन १९७९मध्ये विवेक गोगटे यांनी भागीदारीत सुरू केलेला हा व्यवसाय पुढे त्यांनी एकट्यानेच चालविला आणि एका वळणावर मुलाच्या हाती सोपविला. बॅटरी चार्जर्स, सोलर एमपीपीटी चार्ज कंट्रोलर, पॉवरपॅक्स, एमव्ही स्वीचगिअरसाठी बॅटरी चार्जर, कंट्रोल व प्रोटेक्शन युनिट्स, एलव्ही स्वीचगिअर आदी उत्पादने बाजारात आणणाऱ्या या कंपनीची सूत्रे २००४ मध्ये आदित्य यांनी हाती घेतली. इलेक्ट्रॉनिक्सचे विश्व वेगाने बदलते आहे. काळानुरूप आपल्या उत्पादनांतही बदल करत, गरजेप्रमाणे नव्या उत्पादनांची मालिका बाजारात आणत, 'ओईएम'च्या गरजा लक्षात घेत आदित्य यांनी विशेषत्त्वाने प्रयत्न केले आणि २००८ मध्ये साधारण ३ कोटींची उलाढाल असलेली ही संस्था २०१६ पर्यंत साधारण २० कोटींपर्यंत पोहोचली. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने तर असंख्य असतात पण कार्यसंस्कृतीत सुयोग्य बदल करीत, दोन पिढ्यांच्या विचारांत समन्वय साधत आणि सचोटीचा पाया भक्कम ठेवत चि. आदित्य यांनी घेतलेली आघाडी महत्त्वाची ठरली...!

तसा गोगटे परिवार पराकोटीचा देशभक्त. आदित्य यांचे आजोबा म्हणजे विवेक गोगटे यांचे वडील विष्णू गोगटे हे आयुर्वेदिक डॉक्टर. यमुताई आणि विष्णू गोगटे गुणेशास्त्रींच्या संस्थेत योगदान देण्यासाठी नाशिकला आले. हा परिवार मूळचा जव्हार-मोखाडा परिसरातला. विष्णू गोगटे यांचे वडील जव्हार संस्थानचे राजवैद्य. विष्णू गोगटे शिक्षणासाठी नगरला आले. स्वातंत्र्य चळवळीत विष्णू गोगटे यांनी १९२९ मध्ये तुरुंगवास भोगला होता. पुढे त्यांनी आणि यमूताईंनी सुद्धा १९४२ मध्ये स्वातंत्र्यलढ्यात तुरुंगवास पत्करला आणि तुरुंगवासातून सुटका झाल्यानंतर समाजसेवी वैद्यकीसाठी ते नाशिकमध्ये दाखल झाले. अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचा संबंध होता. आयुर्वेद सेवा संघ, वसंत व्याख्यानमाला, रोटरी, सावाना (सार्वजनिक वाचनालय नाशिक) आदी विविध संस्थांचे ते पदाधिकारीही राहिले.



पराकोटीची देशभक्ती त्यांच्या नसानसांतून भिनलेली होती. सन १९८६ मध्ये केंद्र सरकारचा 'प्रियदर्शिनी वृक्षमित्र पुरस्कारा'ने त्यांना गौरविण्यात आले होते.

अशा परिवारात १९५३ मध्ये विवेक गोगटे यांचा जन्म झाला. समाज आपल्याकडे वेगळ्या नजरेतून पाहतो त्यामुळे आपल्या हातून काही वावगे घडू नये, याची जाणीव विवेक यांना कळत्या वयापासूनच झाली. पण असे असले तरी आपला मार्ग वडलांच्या पावलावर पाऊल टाकूनच शोधायला हवा, हे त्यांना मान्य नव्हते. त्यामुळे वडील आयुर्वेदतज्ज्ञ असताना या मुलाने इंजिनिअरिंगचा पर्याय शोधला आणि पुण्याच्या 'सीओईपी'मधून त्याने इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंगचे शिक्षण १९७६ मध्ये पूर्ण केले. त्या वेळी राज्यात मोजकीच इंजिनिअरिंग कॉलेजेस होती, ती सगळी शासकीय. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे गुणानुक्रमे त्यांना कराडचे कॉलेज मिळाले आणि पाच टॉपर्सना हवा तिथे प्रवेश हवी ती शाखा मिळत होती. त्यानुसार त्यांनी 'सीओईपी'ला पसंती दिली. सीओईपीत त्यांचा अभ्यासातही पुढाकार होता आणि अवांतर गोष्टींतही. पुरुषोत्तम करंडक नाट्यस्पर्धा त्यांनी गाजविली. दिग्दर्शन केले. मायनर गेम्स विभागाच ते सेक्रेटरीही बनले. चार भावंडांत धाकट्या असलेल्या विवेक यांना (आणि सगळ्याच भावंडांना) हवे ते करण्याची मुभा होती. घरची जबाबदारी अशी काही नव्हती. त्यामुळे इंजिनिअर झाल्याबरोबर नोकरी सुरू झालीच पाहिजे असे बंधन त्यांच्यावर नव्हते. त्यामुळे इंजिनिअर होऊन आल्यावर त्यांनी एमबीएला प्रवेश घेतला. पहिल्या वर्षात असतानाच लग्न ठरले. एमबीए नंतर मुंबईत सहा महिने नोकरी केली आणि त्यानंतर स्तःचा काही तरी उद्योग केला पाहिजे या प्रेरणेतून त्यांनी नाशिक गाठले. ते सांगतात, "माझ्या 'बुक्स ऑफ अकाउंट'मध्ये पहिली एन्ट्री १०० रुपयांची आहे. ते पैसे मी अकाउंटला जमा दाखविले आणि त्यातील ७५ रुपयांची टपाल तिकिटे आणली. आपल्या भविष्यातील कंपनीसाठीचा पत्रव्यवहार करण्याची ही तयारी होती." व्यवसायासाठी घरची साथ कशी असावी? त्यांच्या वडिलांनी त्यांना सांगितले, 'दोन वर्षे घरात काही दिले नाही तरी चालेल.' या पार्श्वभूमीवर आणखी एक महत्त्वाची गोष्ट त्यांच्या वडिलांनी केली. शेवटचा ९०० रुपये पगार घेऊन त्यांनी नोकरी सोडलेली होती. आपले वडील पाठीशी आहेत, ते आपल्याला मदत करतील असा विवेक गोगटे यांचा समज होता. त्यांनी वडिलांकडे पैसे मागितले. वडील म्हणाले, 'ठीक आहे. देईन. पण परत कधी देणार?' हा विवेक यांना मोठा धक्का होता! त्यांनी वडिलांची मदत गृहीत धरलेली होती. वडिलांनी एका प्रसंगात स्पष्ट करून टाकले - व्यवसायात

कुणालाही गृहीत धरायचे नाही! जे करायचे ते स्वबळावर... पण त्याच वेळी घरातील सगळ्यांनी म्हणजे आई, मोठे भाऊ डॉ. विकास, वहिनी डॉ. विनिता, पत्नी सौ. मृणाल यांनी सदैव त्यांना पाठिंबा दिला. कुठल्याही उद्योजकाला हा पाठिंबा खूप महत्त्वाचा असतो.

जानेवारी १९७९ मध्ये फाईव्ह आर इलेक्ट्रॉनिक्स या नावाने त्यांनी पार्टनरशिपमध्ये व्यवसाय सुरू केला. पण सहाच महिन्यांत पार्टनरला नोकरीची चांगली संधी चालून आली, तेथून पुढे विवेक गोगटे यांनी एकट्यानेच काम सांभाळले. प्रारंभीच्या काळात व्होल्टेज स्टॅबेलायझर, इमर्जन्सी लँप अशी त्यांची उत्पादने होती. साधारण १० वर्षांच्या प्रवासानंतर त्यांच्यासमोर 'क्रॉम्प्टन'ची एक ऑफर आली. लेबर चार्जवर त्यांचे मोठे काम करायचे होते. त्यानंतर तेच काम त्यांनी प्रॉडक्ट म्हणून सुरू केले - अर्थ लिकेज सर्किट ब्रेकर. या कामांना वेग येऊ लागला. 'क्रॉम्प्टन'ला 'डेडिकेटेड ॲन्सिलरी' हवी होती. १९९६ मध्ये त्यांनी निर्णय घेतला आणि कंपनीचे नाव झाले 'गोगटे इलेक्ट्रो सिस्टिम्स प्रा. लि.' साधारण याच टप्प्यावर त्यांनी काही सामाजिक कार्यांत सहभाग घेण्यास प्रारंभ केला. जायंट इंटरनॅशनलचे नॅशनल व्हाईस प्रेसिडेंट झाले, 'निमा'चे अध्यक्ष राहिले आणि लघुउद्योग भारतीचे स्थानिक अध्यक्षपदही त्यांनी भूषविले.

आदित्य यांचा जन्म नाशिकचाच. नाशिकमधून बारावीपर्यंतचे शिक्षण घेऊन आदित्य पुण्याच्या व्हीआयटी (विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी)मधून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअर झाले. वास्तविक त्यांना 'सीओईपी'मध्ये 'इनस्ट्रुमेंटेशन' मिळालेले होते. पण त्यांना 'इलेक्ट्रॉनक्स'च हवे होते. मुंबईच्या 'एस पी जैन'मधून 'फॅमिली मॅनेजमेंट 'बिझनेस' या विषयात त्यांनी 'पीजी डीबीएम' पूर्ण केले. परदेशात जायचे नाही, हे पक्के ठरवून ते नाशिकमध्ये परतले आणि आपल्या वडिलांनी स्थापन केलेल्या उद्योगात काम करण्यास त्यांनी प्रारंभ केला. ते सांगतात, "माझ्या वडिलांना त्यांचे करियर निवडण्याचा जो मोकळेपणा मिळाला होता तोच त्यांनी मलाही दिला. इंजिनिअरिंगमधील माझ्या बहुतेक मित्रांनी जीआरई-टॉफेलच्या परीक्षा देत परदेशची वाट पकडली. मात्र मला माझ्या वडिलांनी सुरू केलेल्या व्यवसायातच यायचे होते. लघुउद्योग सांभाळणाऱ्या उद्योजकाला त्या उद्योगाची व्यवस्थित माहिती हवीच. त्यातील तांत्रिक बारकावे माहिती हवेत. माझ्या शिक्षणाचा उपयोग तिथे झाला.

कंपनी सुरू होऊन सुमारे २० वर्षे झाली होती, तरी आदित्य यांनी कामकाजात प्रवेश केला तेव्हा कामकाज एका मोठ्या गाळ्यात सुरू होते. उलाढाल साधारण १ कोटीपर्यंत होती. ही सन २००३ ची परिस्थिती. उद्योगाची मोठी स्वप्ने असलेल्या आपल्या मुलाला या टप्प्यावर विवेक गोगटे यांनी काही महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या. खूप वेगाने प्रगती करण्याच्या प्रकाराला 'स्पायरल ग्रोथ' म्हणतात. ते म्हणाले, "स्पायरल ग्रोथ म्हणजे ५० लाखावरून थेट ५ कोटी आणि तेथून थेट २५ कोटी अशी ग्रोथ हवी असेल तर ती शक्य आहे. पण त्यासाठी एक तर तुमचे उत्पादन 'युनिक' हवे, त्याची मागणी प्रचंड हवी. किंवा मग तुम्हाला एक खूप मोठा गॉडफादर हवा...!" गोगटे यांच्याकडे या दोन्ही गोष्टी नव्हत्या. या शिवाय त्यांनी व्यवसायाची एक चतुःसूत्री... जणू आचारसंहिताच आपल्या मुलाला सांगितली.

सन २००३ मध्ये आदित्य यांनी कंपनीत येण्यास प्रारंभ केला आणि त्याच वर्षी विवेक गोगटे यांनी सध्या कार्यरत असलेला 'बी ७८' हा प्रशस्त प्लॉट खरेदी केला. तोवर त्यांचे काम गाळ्यातच चालू होते. आपण छोट्या गाळ्यात काम करतो आहोत, याचे मुलाला वाईट वाटू नये आणि त्याला पुढच्या विस्तारासाठी चांगला पाया उपलब्ध व्हावा या हेतूने वडिलांनी हे पाऊल उचललेले. आदित्य यांनीही त्यांना चांगली साथ दिली. ते सांगतात, "मालकाचा मुलगा म्हणून मी थेट खुर्चीत बसलो नाही. आधी मी प्रत्येक विभागात प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेत गेलो. कामगारांसोबत काम केले. वास्तविक सुट्यांच्या काळातही मी ती कामे करीत असे. पीसीबी डिझाईनपासून ॲसेंब्लीपर्यंत सगळी कामे मी केलेली होती. प्रत्यक्ष कंपनीचे कामकाज सांभाळण्यासाठी आल्यानंतरही मी पुन्हा तो अनुभव घेतला. कामातील बारकावे शिकून घेतले. दोन तीन वर्षे ही कामे केल्यानंतर मी सेल्स कॉल घेण्यासाठी बाहेर पडलो. सेल्स सर्व्हिसच्या निमित्ताने क्लायंटशी समोरासमोर ओळखी झाल्या. त्यांच्या नेमक्या अपेक्षा कळायला लागल्या. याच दरम्यान मुंबईतील एस पी जैन मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटमधून मी 'फॅमिली बिझनेस'मध्ये 'पीजी' केले. सर्वसामान्य व्यवस्थापन आणि उद्योगाची पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील सदस्याचे आपल्या संस्थेतील व्यवस्थापन यात फरक असतो. त्याचा अभ्यास माझ्यासाठी महत्त्वाचा ठरला. 'जनरेशन गॅप' प्रत्येक ठिकाणी असतेच. ती कशी सांधायची हे महत्त्वाचे असते. परिवारातील उद्योगात प्रत्येकाच्या भूमिका सुस्पष्ट असायला हव्यात. परस्परांची विचारपद्धती जुळायला हवी. नात्यात मोकळेपणा असेल आणि व्यवसायावर निष्ठा असेल तर ते सहज शक्य होते. दरम्यान २००७ मध्येच ते स्वाती यांच्याशी विवाहबद्ध झाले होते.

स्वाती मूळच्या खामगावच्या. त्या सुद्धा इलेक्ट्रॉनिक्सच्या विद्यार्थिनी. त्यांनी कंट्रोल सिस्टिम्समध्ये 'एमई' केलेले आहे. पदवीनंतर सहाच महिन्यांत त्यांचे लग्न झाले आणि त्या विदर्भातून उत्तर महाराष्ट्रात आल्या. त्या सांगतात, "मला उद्योगात काम करण्याची आवड होतीच. इथे मला पूर्णपणे मुक्तहस्त मिळाला. कंपनीच्या आयएसओसाठीचे डॉक्युमेंटेशन करण्याचा अनुभव मी घेतला. या निमित्ताने कामगारांशी चर्चेचा, त्यांचा दृष्टिकोन समजून घेण्याचा फायदा झाला. आम्ही अशी पद्धती स्वीकारलेली आहे की 'एचआर' ही कुणी वेगळी व्यक्ती नाही. ते धोरण आहे. कंपनीतील कार्यसंस्कृती राखण्याची पद्धती आहे. त्यामुळे आमच्याकडे प्रत्येक जण एचआर मॅनेजर आहे. त्यामुळेच आम्ही अपरायजलचीही वेगळी कार्यपद्धती निर्माण केली आहे. आयएसओ मिळवतानाही आम्ही कन्सल्टंट नेमला नाही. आम्हीच आमची पद्धती सुधारत गेलो.

'गोगटे'मध्ये पाच मूलभूत तत्त्वांचे पालन केले जाते. क्वालिटी, कमिटमेंट, ट्रस्ट, एथिकल प्रॅक्टिस आणि एम्पॉवरमेंट... उच्च गुणवत्ता राखायची, दिलेला शब्द पाळायचा, सचोटी सोडायची नाही... आदित्य सांगतात, "आमच्याकडे नवे लोक रुजू होतात, त्यांना पहिल्याच दिवशी आम्ही कंपनीत जपल्या जाणाऱ्या मूल्यांची माहिती देतो आणि त्यांच्याकडून त्याच्या पालनाची अपेक्षा करतो.

# वाईनच्या विश्वातील नभीचे चांदणे !

# गुड अर्थच्या वाईन्स



गोरख पगार

गुड अर्थ वाईनरी ची स्थापना 2009 मध्ये वर्चुअल स्वरूपात झाली. या प्रकल्पाचे सर्वेसर्वा श्री आश्विन रॉडरीग हे काही काळ ऑस्ट्रेलियात वास्तव्यास होते, तेथील बारोसा व्हॅलीमध्ये त्यांनी वाईन मेकिंगचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. त्यानंतर भारतात येऊन महाराष्ट्रातील काही नामांकित वाईन प्रकल्पांचा त्यांनी जवळून अभ्यास केला आणि त्यातील उनिवा तसेच सामर्थ्य लक्षात घेऊन स्वत:ही वाईन उद्योगात येण्याचे धाडस केले आणि अल्पावधीतच त्यांनी या क्षेत्रात ते आले, त्यांनी पहिले, आणि त्यांनी जिंकले अशी स्थिती झाली. त्यांचा विंचूर येथील वाईनपार्क मधील गुड अर्थ हा वाईनरी प्रकल्प अतिशय भव्य दिव्य आणि स्टेट्स ऑफ द आर्ट प्रकारातील आहे या प्रकल्पात भारतातील अतिशय नामवंत समजले जाणाऱ्या ब्रँडच्या वाईंचे उत्पादन होते वाईन उद्योग महाराष्ट्रात तुलनेने नवा आहे. परंतू गुड अर्थ च्या वाईन प्रकल्पाकडे पाहिल्यानंतर, आणि तेथे निर्माण होणाऱ्या होणाऱ्या वाईन्स, त्यांचं पॅकेजिंग हे सर्व पाहिल्यानंतर भारतात हा व्यवसाय एक अतिशय रुळलेला आणि श्रेष्ठ दर्जाचा आहे याची प्रचिती येते. गुड अर्थ या वाईन प्रकल्पात सर्वच प्रकारच्या वाईनचे उत्पादन होते त्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वाईन्सच्या तुलनेत कोठेही तसूभरही कमी नाही. यापूर्वी झालेल्या अनेक वाईन्स टेस्टिंग स्पर्धांमध्ये त्यांनी सहभाग नोंदवून गुड अर्थाच्या वाईन्सने पारितोषिके पटकावले आहे अतिशय प्रोफेशनल टच श्री. अश्विन रॉड्रीग यांनी आपल्या वाईन प्रकल्पाला आणि वाईन्सला दिला आहे.

## वाईन्सचे स्वतःचे 'म्यूजिक'

आपल्या वाईन्सच्या गुणवत्तेबाबत बोलताना श्री अश्विन राडरीग म्हणतात वाईन मेकिंग ही एक कला आहे वाईनचे एक स्वत:चे संगीत असते आमच्या वाईनचेही स्वत:चे असे एक संगीत आहे आणि त्यासाठी आम्ही आमच्या या वाईन मेकिंगला झोकून दिले आहे आमचा विश्वास आहे की आमच्या वाईन्स ह्या सर्वच बाबतीत परिपूर्ण आहेत आणि त्या कोठेही त्यांच्या दर्जाच्या बाबतीत तसूभरे कमी पडणार नाहीत त्या सर्वच दर्जेदार अशा आंतरराष्ट्रीय पातळीवरील दर्जा बाईंशी स्पर्धा करू शकता हे आम्ही अगदी खात्रीने सांगू शकतो.

आमच्या वाईनच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत इतर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वाईनच्या सोबत अगदी भक्कमपणे उभ्या राहू शकतात.

नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करून, निवडक स्थानिक द्राक्षे निवडून आम्ही आमच्या वाईन्स निर्माण केले आहे त्यात महाराष्ट्रातील सह्याद्री व्हॅलीतील अतिशय दर्जेदार अशा द्राक्षांची गुणवत्ता लाभली आहे वाईन मेकिंग ही एक कला आहे त्यासाठी द्राक्षांची निवड करणे अतिशय महत्त्वाचे ठरते.

आमची वाईन नाशिक खोऱ्यातील सर्वोत्तम अशा द्राक्षांपासून तयार केली जाते. त्यासाठी केवळ अशाच द्राक्षबागांची निवड केली जाते ज्यात चांगला निचरा होणारी लाल माती आणि स्लोपी लँड आहे. आमच्या बाग विंटेजने समृद्ध आहे, म्हणून प्रत्येक घोटाचा आस्वाद घ्या जसा तुम्ही शास्त्रीय संगीत ऐकता.



## अत्याधुनिक वाईनरी

बरगंडी आणि बोर्डोच्या "नेगोसियंट्स" च्या परंपरेनुसार, आम्ही आभासी (व्हर्चुअल) वाईनरी सुरु केली. परंतु आज नाशिकच्या वाईनपार्क मध्ये आमची अत्याधुनिक वाईनरी आहे. जिथे आम्ही सर्वोत्तम पद्धतीने आणि सर्वोत्तम अशा वाईनचे उत्पादन करतो आणि त्या सिद्धान्तास गुड अर्थ वाईनरी सत्यास उतरली आहे.

# डॉ. नारायण विंचुरकर !

## पराक्रम आणि समाजसेवेचा वारसा

गोरख पगार




डॉ. नारायण विंचुरकर हे एक अत्यंत बुध्दिमान व्यक्तिमत्व, सरदार विंचुरकरांच्या अतिशय यशस्वी आणि दैदीप्यमान इतिहासाचा वारसा त्यांना लाभलेला आहे. सरदार विंचुरकर पानिपतच्या युद्धात रणभूमीवर भक्कमपणे पाय रोवून उभे राहिले होते. तो संपूर्ण ऐतिहासिक घटनाक्रम अतिशय मोठा आहे आणि त्यावर संशोधन होणे गरजेचे आहे. कारण संपूर्ण भारताला तो इतिहास ज्ञात असायला हवा. डॉ. नारायण विंचुरकरांनी वैद्यकीय व्यवसायात, करोडो रुपये गुंतविले परंतु मानवतेचा ओलावा ठेवूनच ते हा व्यवसाय करीत राहिले. त्यामुळे डॉ. विंचुरकर हे नाव नाशिकच्या सर्व स्तरात आदराने घेतले जाते. लहानपणीच डॉक्टर होण्याचं स्वप्न त्यांनी जोपासलं, पुढे पूर्ण केलं आणि नावलौकिक केलं. डॉ. विंचुरकर यांनी लाईफलाईनच्या सेवेतून निवृत्ती घेऊन स्वत:चे सीटी स्कॅन युनिट विंचुरकर डायग्नोस्टिक म्हणून जून १९९५ मध्ये नाशिकला सुरु केले. संपूर्ण मानवी शरीराचे स्कॅनिग ह्या यंत्राद्वारे होते. डॉ. विंचुरकरांचे हे युनिट खासगी क्षेत्रात नाशिकमधील पहिलेच युनिट होते. किंबहुना नाशिकच्या वैद्यकीय क्षेत्रात पुढे होणाऱ्या क्रांतीचे ते बीजच ठरले. १९९५ मध्ये डॉ. विंचूरकर स्वत: सी.टी. स्कॅन, ब्रिस्ट कॅन्सरच्या निदानासाठी वरदान ठरलेली



डॉ. नारायण विंचुरकर

मॅमोग्रॅफी, सोनोग्राफी आणि एक्सरे क्लिनिक आदि सुविधा नंबर वन स्वरुपात देऊ लागले. त्यापूर्वी फक्त मुंबई, येथेच उपलब्ध असलेली उत्कृष्ट दर्जाची सेवा नाशिकला मिळू लागली. आपल्या या सेवांमळे डॉ. विंचुरकरांचे नाव नाशिकच्या व उत्तर महाराष्ट्राच्या सर्व स्तरात 'पोहचले. अर्थात हा सर्व भाग उत्तुंग शिखराचा फक्त पाया होता. त्यावर कळस चढविण्याचे काम झाले, ते जानेवारी १९९९ मध्ये. या महिन्यात स्कॅनिंगच्या बाबतीत अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेले एम.आर.आय. मशीन डॉ. विंचुरकरांच्या डायग्नोस्टिकमध्ये दाखल

झाले. नाशिकच्याच नव्हे तर संपूर्ण उत्तर महाराष्ट्रातील वैद्यकीय व्यवसायातील ती ऐतिहासिक घटना ठरली. फेब्रुवारी १९९९ मध्ये त्यावेळचे आरोग्यमंत्री डॉ. डी. एस. आहेर यांच्या हस्ते या सेंटरचे उद्घाटन झाले. डॉ. विंचुरकरांच्या ह्या एम.आर.आय. सेंटरमुळे अत्युच्च दर्जाची वैद्यकीय सुविधा नाशिकला उपलब्ध झाली.



एम.आर.आय. मशीनबद्दल बोलतांना डॉ. विंचुरकर म्हणाले हे तंत्रज्ञान मानवी जीवनाला खरेतर वरदान आहे. सोनोग्राफी, मॅमोग्राफी, सीटीस्कॅन आणि आता एम.आर.आय. या तंत्रज्ञानात तुलनात्मक फरक काय आहे? असे विचारले असता डॉ. विंचुरकर म्हणाले सोनोग्राफी आणि सी.टी. स्कॅन ही किरणोत्सारी माध्यमं आहेत. शरीराची अंतर्गत रचना आणि रोगनिदान त्याद्वारे होते. परंतु त्यात काही मर्यादा येतात. त्या सर्व उणिवा एम.आर.आय. तंत्राने दूर केल्या आहेत.

एम.आर.आय. हे चुंबकीय कंपन परावर्तीत प्रतिमा तंत्र आहे. या तंत्रात शरीरातील चुंबकीय लहरी आणि यंत्रात उत्पन्न होणाऱ्या लहरींच्या परावर्तन तंत्रातून प्रतिमा घेतानाच एका विशिष्ठ भागाची थ्री डायमेंशन प्रतिमा घेतली जाते. ही प्रतिमा सविस्तर व अचूक असते. त्यामुळे अचुक निदान होते व योग्य उपचार करता येतात. थोडक्यात एक्सरे, सोनोग्राफी, सी.टी. स्कॅन या मालिकेतील उच्च अत्याधुनिक तंत्रज्ञान म्हणजे एम.आर.आय. एक्स-रे, सोनोग्राफीमध्ये आण्विक कणांचा वापर केला जातो. एका एक्स-रे ने अचुक निदान करता येत नाही त्यामुळे वेळोवेळी एक्स-रे घ्यावे लागतात. साहजिकच आण्विक किरणे वारंवार वापरली जातात. त्याचा शरीरांतर्गत दुष्परिणाम होण्याची शक्यता असते. एम.आर.आय. मध्ये



कोणताही दुष्परिणाम अपेक्षित नाही. पाठीचे मणके, आतड्यांची रचना, मेंदू व डोक्यातील गाठी, अवयवांचे हाडांचे सांधे यावर एम.आर.आय.द्वारे अचूक व जलद निदान तसेच त्वरीत उपचार शक्य आहे. एक्स-रे व सी.टी. स्कॅनमध्ये पूर्ण प्रतिमा मिळत नाही त्यामुळे कधी-कधी तर्कशास्त्राचा आधार घेतला जातो. उदाहरणार्थ सी.टी.स्कॅनद्वारा मेंदूजवळ एखादी गाठ आढळली तर ती ट्युबरक्लॉसिक (क्षय) आहे की कॅन्सरची (कर्करोग) गाठ आहे तिचा नेमका आकार किती हे स्पष्ट होत नाही, त्यामुळे ती गाठ क्षयाची आहे असे समजून उपचार सुरु केले जातात. गाठ क्षयाचीच असेल तर उत्तम, नाही तर पुन्हा दुसरे उपचार सरु करावे लागतात. आता मॅमोग्राफीच्या बाबतीत हे तंत्र स्त्रीयांसाठी वरदान आहे. स्त्रीयांच्या छातीतील किंवा स्तनातील गाठ नेमकी कशाची आहे याचे निदान मॅमोग्राफीद्वारा करता येते. स्त्रीयांमध्ये स्तनांचा व गर्भाशयाच्या कॅन्सरचे प्रमाण अधिक आहे. बऱ्याचदा त्याकडे दुर्लक्ष होते व गंभीर परिणामांना सामोरे जावे लागते. तसे न करता चाळीशीनंतर खरेतर प्रत्येक महिलेने मॅमोग्राफीद्वारा तपासणी करुन घ्यावी, हे यंत्रही उत्तर महाराष्ट्रात प्रथमच डॉ. विंचुरकरांकडे उपलब्ध झाले आहे.

वैद्यकीय व्यवसायात सध्या चालू असलेल्या तीव्र स्पर्धेबाबत बोलतांना डॉ. विंचुरकर म्हणाले, स्पर्धा असावी परंतु ती जीवघेणी, रुग्णांसाठी खर्चिक नसावी मानवतेचा गहिवर नक्कीच असावा, अर्थातच तो सर्वसामान्यांच्या बाबतीत जेथे आर्थिक क्षमता आहे तेथे हा मुद्दा लागू होत नाही कारण यंत्रसामुग्रीचे कर्ज फेडायचे असते. बाकी पैशाला विशेष महत्व माझ्या दृष्टीतून नाही. सामाजिक सेवाभाव ही विंचुरकर घराण्याची परंपरा राहिली. यापूर्वी दिवंगत सरदार विंचुरकरांनी अनेक सामाजिक आणि धार्मिक संस्थांना आर्थिक मदत दिली, मंदिरांची उभारणी केली. सप्तश्रृंगी गडावरचा सभामंडप, दागिने विंचुरकरांनी केले. त्र्यंबकेश्वराच्या रथाची उभारणी तसेच निरा नरसिंह येथील भव्य हेमाडपंथी मंदिर विंचुरकरांनीच उभारले आहे. भविष्यात वडिलांच्या नावे चॅरिटेबल ट्रस्ट करुन गरजुंना मदतीचा संकल्प डॉ. विंचुरकरांनी सोडला आहे. सर्वसाधारणपणे दररोज दहा तास डॉ. विंचुरकर आपल्या कामात व्यस्त असतात.












# VIKRANT HAPPY HOMES PVT. LTD.

Regd. Off.: Vikrant Happy Homes Pvt. Ltd., 301-305 Prasanna Arcade, Old Agra Road,
Trimbak Naka, Near Hotel Mazda, Nashik- 422002.
Site Office : At. Post - Wakas, Tal. Karjat, Dist Raigad
Mob.: 9822703335

www.vikrantestate.com

# महिलांच्या कर्तृत्वावरील शिक्कामोर्तब
# निलिमाताई पवार

गोरख पगार

दिवंगत डॉ. वसंत पवार हे नाशिक जिल्ह्याच्या थोर सुपुत्रांपैकी एक. कमर्वीर भाऊसाहेब हिरे, कर्मयोगी बो. वा. गुरुजी, काकासाहेब वाघ, रावसाहेब थोरात या शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गजांच्या माळेतील नाव. डॉक्टरांचा इतर क्षेत्रातीलही नावलौकिक मोठा. प्रत्यक्षात खूप मोठे काम उभे करूनही अनेक महत्वाकांक्षा त्यांनी जोपासल्या होत्या पण काळाने त्यांना अकाली नेले. अनेक जण त्या आघातातून अद्याप सावरले नाहीत. निलिमाताईंच्या बाबतीत तर ती अशक्यप्राय गोष्ट. पण ताईंनी परिस्थितीची गरज म्हणून थोडं सावरण्याचा प्रयत्न केला आणि डॉ. वसंत पवारांच्या निधनानंतरही मोठ्या धैर्याने मराठा विद्या प्रसारक समाजाला त्यांच्या माध्यमातून भक्कम नेतृत्व उभे केले.

डॉक्टरांच्या हयातीतही त्यांनी हॉस्पिटलचे संपूर्ण व्यवस्थापन, गोदावरी बँकेचे काम आणि शेतीच्या व्यवस्थापनात प्रभावी कामगिरी बजावली. पण प्रसिद्धीपासून दूर राहण्याचा स्वभाव असल्याने अनेकांना त्यांच्या कार्याची ओळख नव्हती. डॉक्टर त्यांच्या हयातीत वेळेचा क्षणन्क्षण कारणी लावीत तसेच निलीमाताई यांनाही उसंत हा प्रकार माहित नव्हता. एक गृहिणी म्हणून घरी आलेल्यांची सरबताई तर त्या करीतच पण त्याचबरोबर शेती, दुधाचा व्यवसाय, हॉस्पिटल आणि बँकेचे कामकाज त्यांनी चोख बजावले. शेतीतील त्यांचे प्रयोग प्रगत म्हणविल्या जाणाऱ्या कोणत्याही शेतकऱ्यापेक्षा सरस आहेत. कृषिक्षेत्रात अनेक नवनवीन प्रयोग त्यांनी केले आणि ते यशस्वी केले. मग ती नर्सरी असो वा वेगवेगळ्या फळबागा. एका महिलेचे कृषिक्षेत्रातील काम राष्ट्रीय पातळीवर विशेष दखल घेण्याजोगे ठरले. डॉ. पवार खासगीत बोलताना निलिमाताईंच्या कामाची, कार्याची प्रशंसा करीत. शेती हाच ज्यांचा परंपरागत व्यवसाय आहे ती मंडळी आणि दुर्दैवाने महिलावर्ग या क्षेत्राची उपेक्षा करीत असताना ताईंनी मात्र शेतीत रस घेतला. नवे प्रयोग केले, आणि त्यात यश मिळविले. विशेष म्हणजे अनेक नव्या गोष्टी त्या सतत शिकत असतात. डॉक्टरांच्या अकाली निधनानंतर त्यांच्याकडे ना. जि. म.वि.प्र. समाजाचे नेतृत्व आले. आणि त्यातही त्या सरस ठरल्या आहेत व प्रभावी कामगिरी बजावली आहे. त्यांचे चिरंजीव प्रणव पवार तसेच कन्या प्राची पवार व अमृता पवार यांनी आपल्या आवडीची क्षेत्रे निवडली असून तेही त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात चांगली कामगिरी बजावीत आहेत.






Dr. U.K. SHARMA
CMD & CEO

# MANTRAS GREEN RESOURCES LTD.

MANTRAS RESSOURCES ™

## *"Dedicated For Better Tomorrow"*

**Our Recent Awards:** **Credentials:**



Recipient Of Top 100 SME Award-2013 · Best Consultant · Pride of Marathwada

QCI · NABET · SE2B · India Small Giants · एन.एस.आई.सी. NSIC

## ENGINEERS & ENVIRONMENTAL CONSULTANT

### ISO-9001-2008 CERTIFIED COMPANY
### QCI ACCREDITED EIA CONSULTANT FOR THE FOLLOWING SECTORS

- Thermal Power Plant
- Metallurgical Industries
- Township & Area Development Project
- Building & Large Construction Project
- Common Municipal Solid Waste Management
- Distillery Unit
- Synthetic Organic Chemical Industries
- Mineral Beneficiation including Pelletization
- Coal Washieries

### ❖ ENVIRONMENTAL SERVICES

- EIA Study, Environment & Forest Clearance from Central & State Govt.
- Green Building Certification & Rain Water Harvesting
- Consent Management
- Solid Waste Management


### ❖ ENGINEERING SERVICES


- CETP, WTP, ETP & STP Design, Erection & Commissioning
- Air Pollution Control Equipment Design, Erection & Commissioning
- Bio-Digester Design, Erection & Commissioning & Compost Yard Planning Design
- Up Gradation of Existing ETP
- Solar power plant Design, Erection & Commissioning




Pride of India Award



Effluent Treatment Plant (ETP)



Sewage Treatment Plant (STP)


BIO - Digester


Wet Organic Solid Waste Digester


Venturi Wet Scrubber


Water Purification Plant & Water ATM


Rain Water Harvesting


Distillery : Modernizations & Up-Gradation

**OUR BRANCHES : KALYAN, PUNE, HYDERABAD, JAIPUR, AURANGABAD, KOLKATA, DELHI**

**Dr. U. K. Sharma (CMD & CEO)**

**Regd and Corp. Office :** Hall No. 1, First Floor, NICE Sankul, Plot No. A-9, Opposite Nashik, Merchant Bank Ltd., ITI Signal, MIDC Satpur, Nashik - 422 007, Phone : +91-253-2355665-2355086, 8888824935
Email : ukshrma@mantrasresources.com, info@mantrasresources.com
Website : www.mantrasresources.com



# सर्वच पद्धतशीर !

# निर्माण ग्रुप



नाशिकमधील बांधकाम क्षेत्रातील नामवंत श्री. नेमीचंद पोद्दार हे निर्माण ग्रुपचे चेअरमन व कार्यकारी संचालक आहेत. रियल इस्टेट व बांधकाम क्षेत्रात तीन दशकाहून अधिक काळ कार्य करून शहरातील कॉलेजरोड, शरणपूररोड व परिसरात सुंदर व देखण्या इमारती निर्माण करुन नेमिचंदजींच्या निर्माण ग्रुपने बांधकाम क्षेत्रात वेगळा ठसा उमटविला. तसेच बांधकामासोबतच लागणाऱ्या कच्च्या मालाचा तुटवडा लक्षात घेऊन स्वत:च खडी व कृत्रिम वाळुचे प्रकल्पही सुरू केले. त्यांनी निर्माण केलेल्या वाळूसाठी ग्राहकांना प्रतिक्षा करावी लागते. याशिवाय शासनाच्या बीओटी तत्वावरील करमाळा बायपास व धुळे-अमळनेर ह्या दोन हायवेंची उत्कृष्ट कामे नेमिचंदजींच्या निर्माण ग्रुपने यापूर्वी पूर्ण केली.

नेमिचंद पोद्दार यांनी १९८० साली बांधकाम व्यवसायात लावलेल्या रोपट्याचं आज विशाल वृक्षात रुपांतर झालं. व्यवसायासोबतच सामाजिक बांधिलकी म्हणून वनबंधू परिषदेच्या माध्यमातून ते आदिवासी भागात गोरगरीब विद्यार्थ्यांना शिकता यावे म्हणून एकलव्य विद्यालयाद्वारे साक्षरतेचे काम करतात. वनबंधू परिषद नाशिक चॅप्टरचे ते संरक्षक असून त्र्यंबकेश्वर, हरसूल, पेठ व सुरगाणा या भागात तब्बल २७० आदिवासी पाड्यांमधून हे कार्य चालते. त्यासोबतच गोसेवेचे व्रत त्यांनी स्वीकारले असून पेठरोडवरील उमराळे गावाजवळ स्वत:ची गोशाळा आहे. त्यामध्ये जवळपास २७० गाईंचे पालनपोषण ते करतात.

समाज कार्यामध्येही ते अग्रेसर असतात. नाशिकमधील अग्रवाल समाजाचे ते पुर्वाध्यक्ष आहेत. नाशिकमधील गोरगरीब रुग्णांना मदत व्हावी या उदात्त हेतूने नाशिक सेवा समितीच्या माध्यमातून नेमिचंदजींचे कार्य चालू असून शहरातील काही दानशूर सहकाऱ्यांच्या मदतीने गरिबांसाठी अल्पदराने कॅनडा कॉर्नरवर एका दवाखान्याच्या माध्यमातून तसेच फिरत्या दवाखान्याच्या माध्यमातून त्यांचे आरोग्य सेवेचे कार्य चालू आहे. नुकतीच नाशिक सेवा समिती ट्रस्टवर नेमिचंदजी पोद्दार यांची अध्यक्षपदी निवड झाली आहे. तसेच त्यांच्यामार्फत पंडित किरीटभाईंच्या रामकथा, प. पू. सुधांशुजी यांचे श्रीमद भागवतगीतेवर प्रवचन, पंडित वृंदावनवासी विजय कौशल महाराज, प. पू. रामकिंकरजी, प. पू. माता कनकेश्वरी देवी, श्रीकृष्णचंद्र ठाकूर आदि नामांकितांचे श्रीमद भागवतावर अध्यात्मिक प्रवचनांचे आयोजन केले जाते. या व इतर अनेक माध्यमांद्वारे नेमीचंदजी पोद्दार यांनी व्यवसायाच्या माध्यमातून सामाजिक कार्य पार पाडले. रियल इस्टेट क्षेत्रातही विविध प्रकल्प राबविताना त्यांनी सामाजिक भान ठेवले आहे. मुले विपूल, हितेश पोद्दार व महेंद्र पोद्दार यांनी वडीलांच्या व्यवसायात यशस्वी सहभाग नोंदवला आहे.

गोरख पगार


आमच्यासारखे आम्हीच!
DREAM SHELTER
READY POSSESSION
RERA REGISTRATION NO. P51600014758
Digital Yug: +91 7020 27 2546
1 & 2 बी एच के फ्लॅट्स
AMENITIES
Children Play Area
Green Gymnasium
Jogging Track
Naturally Built Landscape
7721991444
चुंचाळे शिवार, सातपुर, नाशिक.
T & C apply*
SINCE 1978
A Project By
PRAKASH LADDHA GROUP
Follow us on:
Email : info@prakashladdhagroup.com
www.prakashladdhagroup.com
CHANNEL PARTNER
rambhumi
Brain Media Pvt. Ltd.
Members of:
CREDAI
NAREDCO

# आमच्यासारखे आम्हीच!

कॅनडा कॉर्नर, नाशिक

बिझनेस स्क्वेअर

READY POSSESSION

दररोज 5000 हुन अधिक लोकांची रेलचेल

## व्यवसायाच्या विकासासाठी उत्तम कनेक्टिविटी

SHOPS | SHOWROOMS | OFFICES



RERA Registration No. PHASE I-P51600000211

OUTSTANDING CONCRETE STRUCTURE AWARD
NASHIK DISTRICT 2023

## IDEAL FOR

Salon
Doctors
Restaurant
Office Space
Medical
Banks
Consultants
Retailers

7721991444

SINCE 1978
A Project By
PRAKASH LADDHA GROUP

Email : info@prakashladdhagroup.com
www.prakashladdhagroup.com

Follow us on:

Members of:
CREDAI


Design by Digital Yug: +91 7020 27 2546

T & C apply*

# वास्तुनिर्मिती म्हणजे बहुव्यापक आनंदाची उधळण!

# रवि अमृतकर

गोरख पगार



**परिस्थिती कशीही असो, स्वप्ने मोठी पाहा, आभाळाला भिडण्याची स्वप्ने पाहिली तरी ती पूर्ण होतात, असा सल्ला देणारे हल्ली हजारो भेटतात, पण अशा कुणाच्या सल्ल्यावर अवलंबून न राहता, आपल्या स्वप्नांसाठी जिवाचे रान करणारा माणूस पाहिला तर ? प्रत्येकात जगण्याची, यशस्वी होण्याची उमेद निर्माण होते. नाशिकमधील प्रख्यात वास्तुविशारद रवि अमृतकर यांच्याविषयी हेच सांगता येईल.**

श्री. रवी अमृतकर यांनी नाशिकचे रिअल इस्टेट क्षेत्र ‘अमृतमय’ केले. त्यांनी नाशिक शहर घडवले; देखण्या इमारतींनी नयनमनोहर केले आणि अक्षरश: अनेक बांधकाम व्यावसायिक घडवले. बांधकामांमध्ये त्यांच्या विशेष कल्पनांची छाप उमटली. आणि विशिष्ट प्रकारची शिस्तही बांधकामांच्या दर्जासह नाशिकच्या बांधकाम व्यवसायात दिसली. आज नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणावर मुंबई-पुण्यातील उच्चभ्रू वर्ग घरकुलामध्ये आपली गुंतवणूक करताना दिसतो. तो येथील रिअल इस्टेटला विशेष “चेहरा” प्राप्त झालेला असल्यामुळे, आणि त्याचे श्रेय मोठ्या प्रमाणावर जाते ते रवी अमृतकर यांना. श्री. रवी अमृतकर यांची कौटुंबिक पार्श्वभूमी ग्रामीण भागातील, ते वडगाव लांबे, ता. चाळीसगाव येथील. कळायच्या आतच वडीलांचा मृत्यू झाला.

नंतर आईनेच सांभाळले. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेतले. अभियांत्रिकीमधील पदवीनंतर प्रारंभी काही काळ त्यांनी नोकरी केली. आणि १९९० पासून त्यांनी नाशिकच्या रिअल इस्टेट क्षेत्राला (बहुतांश) आकार देण्याचे काम सुरू कले. आज नाशिक शहरातील गंगापूर रोड, कॉलेजरोड, महात्मानगर, विकास कॉलनी, उंटवाडी शिवार, गोविंदनगर आणि महामार्गाला जोडणारा परिसर तसेच पूर्ण महापालिका हद्दीतील भव्य आणि देखणे प्रकल्प श्री. रवि अमृतकर यांच्याच संकल्पनांचे आणि संबंधित परिसर पूर्णपणे विकसित आणि रिअल इस्टेट क्षेत्राचे महत्त्व वाढविणारे ठरले आहेत. बांधकाम क्षेत्रात भरपूर काम केलेले असतानाही श्री. रवी अमृतकर यांचे पाय जमीनीवर आहेत. अहंकाराचा यात्किंचितही स्पर्श त्यांना झाला नाही. चुकांची पुनरावृत्ती करायची नाही यावर त्यांचा भर असतो. व्यवसायाबरोबरच श्री. रवी अमृतकर नाशिक शहरातील विविध सामाजिक उपक्रमात सहभागी आहेत. निरामय कृषीनाद जॉगींग ट्रॅकचे ते सदस्य आहेत. तसेच लायन्स क्लब आणि जनलक्ष्मी बँकेच्या माध्यमातूनही ते विविध उपक्रम राबवित असतात. व्यक्तिगत जीवनात तसेच व्यावसायिक यशात आईबरोबरच पत्नी सौ. जयश्री यांचाही मोठा वाटा आहे असे ते सांगतात. व्यवसायाचा बराचसा व्याप सौ. जयश्री अमृतकर यांनी सांभाळला. मुलगा सौरभ तसेच मुलगी ऐश्वर्या दोघेही आर्किटेक्ट आहेत. त्यात उच्चविद्या विभुषित सुसंस्कृत स्नुषा सौ. प्रणिता अमृतकर यांचीही त्यांना साथ लाभली आहे. श्री. अमृतकर यांचे नाशिक शहरावर विशेष प्रेम आहे.

निवासासाठी नाशिक शहर उत्तम शहर आहे, असे ते म्हणतात. जोडीलाच कृषी औद्योगिकरण, चांगल्या शैक्षणिक संस्था आणि भरपूर पाणी उपलब्धता यामुळे भविष्यात ते मोठ्या प्रमाणावर विकसित होईल. ‘ ’स्मार्ट सिटी” असल्यामुळे बंगलोर, पुणे प्रमाणे ते विकसित होईल, असेही श्री. रवी अमृतकर म्हणाले.

दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या परिस्थितीशी दोन हात करून या जिगरबाज माणसाने नंतर अशी बाजी मारली, की नाशिक शहरातील चाळीस टक्क्याहून अधिक इमारती त्यांच्या हातून साकारल्या. गाव वडगाव लांबे, तालुका चाळीसगाव, जिल्हा जळगाव, अमृतकर यांचे मूळ गाव. आई-वडील, चार भाऊ, दोन बहिणी असे कुटुंब. रवि एक महिन्याचे असताना

वडील वारले. शेती आणि मोलमजुरी करीत त्या मातेने या भावंडांना वाढवले. पैसे नाहीत. काम नाही आणि मुलांच्या शिक्षणाच्या सुविधा नाहीत,

"संघर्षाशी पहिली गाठ न कळत्या वयातच पडली. जसजसा मोठा होत गेलो, तसे चटके आणखीच जाणवू लागले. शाळा सात किलोमीटर दूर. एवढे अंतर रोज पायी जायचे आणि यायचे... तेव्हाच ठरवले. आयुष्यात पायपीट होऊ द्यायची नाही. व्हायचे तर मोठेच । -रवि अमृतकर यांच्या स्वप्नाची बीजे कधी रुजली, त्याची गोष्ट ते सांगतात.

मोठे बंधू नाशिकच्या सातपूरमधील एका कंपनीत नोकरीला लागले आणि रविही गावाहून नाशकात दाखल झाले. भावाच्या नोकरीच्या बळावर शिक्षण सुरू झाले. त्यावेळी कंपनीत पगार तो किती असणार? गावाकडच्या व्यथा इथेही कायम राहिल्या. दोन वेळच्या जेवणाव्यतिरिक्त साऱ्याचीच अनिश्चितता, अंगात घालायला कधी सदराही नसायचा.

अशा परिस्थितीही जिद्दीने अभ्यास करून अमृतकर यांनी दहावीत ८० टक्के गुण मिळवले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यावेळी हमखास नोकरी मिळवून देणारा अभ्यासक्रम म्हणजे इंजिनिअरिंग. अमृतकर यांनी धुळ्याच्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात प्रवेश घेतला. तीन वर्षे कशीबशी निघून गेली. महाविद्यालय शासकीय असल्याने अडचणी आल्या नाहीत, पण पुढच्या शिक्षणाचा डोलारा सांभाळणे अवघड होते. शासनाची शिष्यवृत्ती मिळाली आणि प्रश्न सुटला. बरीच परवड सोसत अमृतकर यांनी बी. ई. (सिव्हिल) पदवी घेतली आणि नाशिकला एका संस्थेत तातडीने नोकरी धरली. पगार होता दरमहा साडेसातशे रुपये आणि ते वर्ष होते १९८६. वास्तूचा आराखडा, डिझायनिंग, बांधकाम यातल्या बारीकसारीक गोष्टींचा अमृतकर यानी सखोल अभ्यास केला, चार वर्षे अगदी तावून-सुलाखून निघाले. आता स्वत:च्या व्यवसायाची ऊर्मी दाटून आली होती.

सन १९९०. अमृतकर यांनी नोकरी सोडली



आणि स्वतंत्ररीत्या व्यवसायाला प्रारंभ केला. तोपर्यंत ना कोणाशी ओळख ना परिचय काम तरी कशी मिळणार? पण प्रयत्नवादी वृत्ती स्वभावात रुजलेली. अमृतकर हरले नाहीत, प्रयत्न सुरू ठेवले आणि त्र्यंबक रस्त्यावरील वेद मंदिराजवळच्या गुरु गंगेश्वर अपार्टमेंटचे पहिले काम मिळाले.

सुरुवात चांगली झाली होती. अमृतकर यांनी पुढे सिडकोचे काम घेतले. शंभर घरांचे आराखडे तयार करून दिले. कामांची कक्षा नंतर रुंदावत गेली. कळवण, देवळा, सटाणा, घोटी, इगतपुरी अशा विविध ठिकाणी कामे सुरू झाली. असंख्य इमारती अमृतकर यांच्या आराखड्यानुसार आकार घेऊ लागल्या. शासनाच्या योजनेतून सरकारी कर्मचाऱ्यांना घरे उभारून देण्याचेही काम त्यांनी केले. तब्बल सहा हजार घराचे आराखडे तयार करण्यापासून ते त्यांना पूर्णत्वाचा दाखला मिळवून देण्यापर्यंतची सारी जबाबदारी लीलया पेलली. नाशिक महापालिकेकडून सर्वाधिक घरांना परवानग्या मिळवून दिल्याचे अमृतकर अभिमानाने सांगतात.

'इमारत कोणतीही असो. लोकांच्या पायाभूत गरजा तिने पूर्ण करायला हव्या. अधिकाधिक जागा वापरायला मिळायला हवी. मुख्य म्हणजे, इमारत भक्कम आणि सुरक्षित हवी. प्रत्येक इमारतीचा आराखडा तयार करताना याच बाबी डोक्यात ठेवल्या... त्यासाठी नवे प्रयोगही केले. "दिवसागणिक बांधकाम व्यवसाय बदलत गेला. पूर्वी नाशकात तळमजला आणि दोन मजल्याची इमारत पुरेशी असे. आता प्रत्येक इमारत तळ अधिक कमीत कमी पाच मजल्यांची असते. बहुमजली इमारतीही उभ्या राहू लागल्या आहेत. लोकांचे 'बजेट' वाढले आहे. मधल्या काळात लोकांना 'टू रूम किचनचा फ्लॅट पुरेसा असे. आता मात्र मध्यमवर्गीय कुटुंबालादेखील कमीत कमी 'टू बेडरूम हॉल-किचन' अशी सदनिका हवी असते, सौंदर्य, वास्तुरचनेकडे पूर्वी फारसे लक्ष दिले जात नव्हते. आता याबद्दल लोक खूपच जागरूक झाले आहेत.' -व्यवसायात, लोकांच्या मानसिकतेत झालेले बदल अमृतकर अचूक शब्दांत टिपतात.

फक्त रहिवासीच नव्हे, व्यावसायिक इमारती, शाळा, मंदिरेही त्यांनी साकारली. गरजूना फीसाठी अडवले नाही. कामात दर्जा सांभाळला. आराखडा तयार झाल्यावर इमारत पूर्ण होईपर्यंत बारीकसारीक गोष्टीतही लक्ष घातले. त्यामुळेच त्यांच्या कामाला यशाची मोहर लागू शकली. कॉलेज रोडवरील त्यांचे प्रशस्त कार्यालय आणि गंगापूर रोडवरील घर त्यांच्यातील उत्कृष्ट वास्तुविशारदाची चुणूक दाखवून देणारे आहे. माणुसकीच्या भावनेतून अनेक सामाजिक संस्था, संघटनांच्या मदतीला धावणारे अमृतकर गरिबातल्या गरीब माणसाला सदनिका घेता यावी, यासाठी 'नॅनो होम' संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या प्रयत्नात आहेत. यातूनच त्यांच्यातील समाजभानाचा प्रत्यय येतो.



# धाडस आणि क्वालिटीच्या बळावर यश ! : जगदिश पाटील

## संदेशात्मक प्रवास

गोरख पगार

**श्री. जगदिश पाटील अल्फाटेक प्रोसेस इक्विपमेंट्स प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक आहेत. इंडस्ट्रीची गरज ओळखून पाऊल उचलणारे आणि प्रतिकूल परिस्थितीचे संधीत रूपांतर करणारे ते उद्योजक. शेतकरी कुटुंबातून आलेल्या श्री. जगदीश पाटील यांनी प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, महाराष्ट्र येथून यांत्रिक अभियांत्रिकीची पदवी पूर्ण केली. आणि त्यानंतर परिस्थितीची गरज म्हणून नोकरी शोधण्याचे काम त्यांनी सुरू केले. 1995 मध्ये, त्यांनी विश्व सिस्टीम्स प्रा. लि अंबड, नाशिक येथे प्रोजेक्ट इंजिनियर म्हणून कामास सुरुवात केली परंतु सातत्याने नवीन काहीतरी करण्याचा ध्यास आणि ज्ञानार्जनाची प्रवृत्ती असल्याने त्यात त्यांचे मन रमत नव्हते. मुळातच महत्त्वाकांक्षी असल्याने जीवनात काहीतरी करून दाखविण्याचे ध्येय त्यांना स्वस्त बसू देत नव्हते आणि म्हणूनच त्यांनी 1997 मध्ये स्वतःच्या उद्योगाची स्थापना केली आणि आज ते आंतरराष्ट्रीय ख्यातीचे उद्योजक आहेत.**

प्रथम त्यांनी साखर उद्योगांसाठी मशीन्स तयार करण्यास सुरुवात केली. आणि चांगला अनुभव प्राप्त केल्यानंतर, स्टेनलेस स्टीलची प्रक्रिया उपकरणे डिझाइन करून त्या उपकरणांचे उत्पादन करणे सुरू केले.

दरम्यानच्या काळात महाराष्ट्रात वायनरी उद्योग नव्याने आकार घेत होता, हे क्षेत्र महाराष्ट्रातील उद्योजकांसाठी पूर्णपणे नवीन असे होते, त्यासाठीचे तंत्रज्ञान फक्त इटली, फ्रॉन्स जर्मनी आणि अमेरिकेत उपलब्ध होते, परंतु श्री. जगदीश पाटील यांनी वाईनरी उद्योगासाठी लागणारे तंत्रज्ञान आणि मशिनरी यांचा सर्वांगीण अभ्यास करणे सुरू केले आणि त्यासाठी त्या क्षेत्रातील पारंगतांच्या भेटीगाठी घेणे सुरू झाले. त्यासाठी प्रसंगी परदेश दौरे त्यांनी केले आणि शेतकऱ्यांच्या स्वप्नांना आकार देण्याचे काम हाती घेतले. त्याचाच एक भाग म्हणून 2001 मध्ये श्री. पाटील यांनी जगप्रसिद्ध फ्रेंच वाईन मेकर जॉन मॅन्युएल-जॅकिनॉट यांची भेट घेतली आणि त्यांना प्रक्रिया उपकरणे बनवण्याच्या त्यांच्या



अनुभवाबद्दल आणि प्रयोगांबद्दल तपशीलवार माहिती दिली. त्यांच्या ज्ञानाने आणि व्यावसायिकतेने प्रभावित होऊन श्री. जॅकिनॉट यांनी त्यांना वाइनरी प्रकल्पासाठी यंत्रसामुग्री आणि फर्मेंटर टॅंक उत्पादन करण्याची त्वरित संधी दिली. त्यांचा नाशिक मधील हा पहिलाच प्रकल्प महत्त्वाचा होता, त्यात अनेक गुंतागुंत होत्या. हे काम त्यांच्यासाठी लिटमस टेस्टसारखे होते. पण उत्कटतेने आणि चिकाटीने अखेर फळ दिले. प्रकल्प वेळेत पूर्ण झाला आणि संपूर्ण प्रकल्प दर्जाच्या माप दंडावर सर्वोत्कृष्ट म्हणून मानला गेला. श्री जगदीश पाटील यांचे हे नेत्रदीपक यश ठरले. या यशाने महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील बहुराष्ट्रीय प्रकल्पांसह इतर वाईनरी प्रकल्पांचे अनेक दरवाजे त्यांना उघडले.

पूर्वी भारतात वाईनरी उद्योगासाठी कोणतेही तयार तंत्रज्ञान उपलब्ध नव्हते. पाटील यांनी एक पाऊल पुढे जाऊन इटालियन आणि फ्रेंच अभियंत्यांशी हातमिळवणी केली आणि अत्यंत आवश्यक तंत्रज्ञान भारतात आणले. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती ठेवण्यासाठी ते वारंवार त्याच्या टीमसोबत फ्रॉन्स आणि इटलीला जाऊ लागले. प्रक्रिया आणि सुधारणांवर, तसेच मूल्यवर्धनावर त्यांचा ठाम

विश्वास राहिला व आहे. त्यासाठीच आजही शॉप फ्लोअरवर आपल्या टीमसोबत खांद्याला खांदा लावून काम करायला ते मागे पुढे पाहत नाही.

## अद्वितीय उपक्रम

नाशिकमध्ये मायक्रो ब्रुअरी सुरू करणारे ते पहिले उद्योजक आहेत. त्याचा बिअर ब्रँड क्लाउड्स 15 राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध आहे. तसेच ते त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे अत्याधुनिक वाईनरीचा प्रकल्प उभारत आहेत.

## उद्योग संघटना

श्री. पाटील यांची AIMA, (अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन) च्या कार्यकारी समितीवर सदस्य म्हणून निवड झाली आहे. ते सध्या उद्योग आणि संस्था संवाद समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. शिक्षण संस्था आणि उद्योगाच्या मागण्या यातील दरी कमी करण्यासाठी ते धोरणात्मक पावले उचलत आहेत. ते महाराष्ट्र सरकारच्या प्रतिष्ठित IIC (संस्थात्मक नाविन्यपूर्ण परिषद) आणि हब इंडस्ट्री कमिटीचे सदस्य आहेत.

## सामाजिक काम

कामाचा प्रचंड व्याप आणि यशाची शिखरे खुणावत असतानाही जगदीश पाटील यांनी सामाजिक बांधिलकीचे भान कायम ठेवले आहे आपल्या कामाच्या प्रचंड व्यापातूनही ते सामाजिक कार्यासाठी वेळ काढतात आणि त्याचाच एक भाग म्हणून हॉस्पिटल मधील गरजू रुग्णांना मदत आणि ब्लड कॅन्सरने पीडित मुलीचा वैद्यकीय खर्चाचा भार त्यांनी स्वत:कडे घेतला आहे. दरवर्षी ते नाशिकजवळील खालप या त्यांच्या मूळ गावी 1 ते 10 वी पर्यंतच्या होतकरू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चाला मदत करतात.

## कुटुंब

या सर्व उपक्रमात त्यांना त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुनीता पाटील यांचा पाठिंबा आहे, त्या सुद्धा उद्योजिका आहेत. या जोडप्याला वसुंधरा आणि वेदांत ही दोन मुले आहेत.

## मागे वळून पाहताना

वाईनरीसाठी लागणारे संपूर्ण तंत्रज्ञान नाशिक येथेच उपलब्ध करून लघुत्तम तसेच मोठ्या क्षमतेची वायनरी उभारणाऱ्या उद्योजकांनाही त्यांच्या गरजेनुसार फरमेंटर (टाक्या) आणि इतर यंत्रसामुग्री वेळेत उपलब्ध करण्याचे मोठे काम जगदीश पाटील यांनी केले. प्रथम एका छोट्याश्या जागेत श्री जगदिश पाटील यांनी वायनरी साठी



लागणाऱ्या टँक आणि अनुषंगिक मशिनरी उत्पादन करण्याचे काम सुरू केले आणि अल्पावधीतच मोठ्या क्षमतेच्या वायनऱ्यांना लागणारी यंत्र सामुग्री उपलब्ध केली. ज्याची नोंद महाराष्ट्रात सर्वत्र घेतली गेली. वाईनरी उद्योग, दुग्ध उद्योग, साखर उद्योग आणि डिस्टिलरी उद्योग या उद्योगांसाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या टँक्स आणि यंत्रसामग्री उत्पादन आणि पुरवठा बाबत बोलताना श्री पाटील म्हणाले, यापुर्वी वाईनरी उभारण्यासाठी लागणारी यंत्र सामुग्री विदेशातूनच आयात करावी लागत असे, त्यात केवळ वेळेचा अपव्ययच होत नसे तर मोठ्या प्रमाणावर गुंतवणुकही करावी लागायची. आता नाशिकसारख्या ठिकाणी सर्व यंत्र सामुग्री उपलब्ध होत असल्याने मशिनरीत होणारी गुंतवणूक जवळपास पन्नास टक्के इतकी कमी झाली. स्थानिक बाजारपेठेतूनच यंत्रसामग्री खरेदी करण्याचा दुसरा महत्वाचा फायदा म्हणजे विक्रीनंतरची सेवा सहजपणे उपलब्ध होते. गुंतवणुकीतील फरक लक्षात यावा म्हणून आम्ही हे स्पष्ट केले. त्याच बरोबर दुसरा महत्वाचा मुद्दा आहे. तो भारतातल्या भारतात यंत्रसामुग्री उपलब्ध करण्याचा. भारतातही काही मोठे उद्योगसमुह वाईनरीसाठी लागणारी यंत्र सामुग्री उपलब्ध करीत आहेत. पण त्यांच्याही तुलनेत एखाद्या लघुउद्योगाकडून घेतलेली यंत्रसामुग्री तुलनेत कमी गुंतवणुकीची असते. हा फरक प्रक्रिया उद्योगात येणाऱ्या प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवा.

श्री जगदीश पाटील यांनी आपल्या उद्योगाच्या माध्यमातून अनेक मोठ्या वाईनरीजना यंत्र सामुग्री पुरविली आहे. त्याचबरोबर वाईन निर्मितीचे संपुर्ण तंत्रज्ञानही ! नाशिक मधील इतर उद्योजक ज्या सेवा देऊ इच्छितात त्याच सेवा आमच्याकडेही उपलब्ध असून दर्जेदार सेवेचा आमचा प्रयत्न राहिल असेही श्री जगदीश पाटील यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय दर्जाची वाईन निर्मिती होते हे यापुर्वीच सिद्ध झाले आहे, परंतु येथील काही जमेच्या बाजू लक्षात घेता तसेच वाईन निर्मितीतील उच्च तंत्रज्ञानाची सिद्धता लक्षात येता महाराष्ट्रातील वाईन जगात सर्वोत्कृष्ट ठरत आहे. महाराष्ट्रातील प्रमुख वाईनरीजना अल्फा टेकने यंत्रसामुग्री व फर्मेंटर्स चा पुरवठा केला असून वाईनरीजना यंत्रे पुरविणा-या उद्योगात त्यांनी क्रमांक १ चे स्थान निर्माण केले आहे. त्यांनी उपलब्ध केलेले तंत्रज्ञान आणि पुरविलेल्या यंत्रसामग्रीमुळे फ्रान्स, इटाली, ऑस्ट्रेलिया आणि कॅलीफोर्नियात दिसतात तशाच वाईनरीज् भारतात सुध्दा अगदी भारतीय बनावटीच्या यंत्रसामुग्रीने उभारता येतात, हे आता सिद्ध झाले आहे.

# नाशिककरांशी सामाजिक बांधिलकी आणि;
# वैद्यकीय सेवेची जोड !

गोरख पगार

**अस्थिरोगतज्ज्ञ म्हणून दहा हजारावर मोठ्या शस्त्रक्रिया आणी पंधरा हजारावर लोकांना व्यसनापासून मुक्ती हे अनुक्रमे डॉ. विनायक नेर्लिकर आणि डॉ. सौ. शोभा नेर्लिकरांच्या सेवेचे वैशिष्ट्य राहिले. याशिवाय अनेक गोष्टी उल्लेखनीय आहेत.**



वैद्यकीय शिक्षण आणि समाजसेवेच्या इतर प्रांतातही नेर्लिकर दाम्पत्य आणि कुटुंबियांनी स्वत:चा वेगळा ठसा उमटवला. विशेष म्हणजे त्यांनी ज्या क्षेत्रात काम केले तेथे संपूर्ण नैतिकता आणि पारदर्शकता राहिली. सेवा आणि त्यातून मिळालेले समाधान त्यांनी पैशापेक्षाही महत्वाचे मानले. दहा हजारावर मोठ्या शस्त्रक्रिया डॉ.. नेर्लिकर यांनी केल्या आणि पंधरा हजारावर लोकांना व्यसनापासून मुक्ती हे डॉ. सौ. शोभा नेर्लिकरांच्या सेवेचे वैशिष्ट्य ठरले. व्यसनमुक्त झालेला एक रुग्ण त्याच्यासह पत्नी आणि अपत्यांसह सर्वांना उध्वस्त होण्यापासन वाचवू शकला. या दृष्टीतन डॉ. सौ. शोभा नेर्लिकरांचे काम समाजसेवेच्या प्रकारातील सर्वोच्च आहे. केवळ नाशिक आणि उत्तर महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण भारतातील अनेक व्यसनाधिन लोकांनी डॉ. सौ. शोभा नेर्लिकर यांच्याकडून उपचार करुन घेतले. या पध्दतीत एका छोट्या शस्त्रक्रियेद्वारे इम्प्लॉण्ट औषधोपचार योजना केली जाते. आणि रुग्ण पुन्हा अल्कोहोलयुक्त मद्य घेत नाही. या बाबत बोलताना डॉ. सौ.नेर्लिकर यांनी सांगितले की आतापर्यंत झालेल्या हजारो शस्त्रक्रियांपैकी ऐंशी टक्क्यांवर रुग्ण पूर्णपणे अल्कोहोलमुक्त झाले. म्हणजे या सर्वांचे संसार उध्वस्त होण्यापासून वाचले आहेत. डॉ. सौ. नेर्लिकर यांनी काही शोधनिबंधही सादर केले असून: काठमांडू येथील परिषदेत त्यांना त्यांच्या विशेष कार्याबद्दल गौरविण्यात आले आहे.





आपले हॉस्पिटल आणि रुग्ण सेवा सांभाळतच डॉ. श्री. विनायक नेर्लिकर व डॉ. सौ. शोभा नेर्लिकर यांनी नाशिक येथील वैद्यकीय महाविद्यालयात अधिव्याख्याते म्हणूनही काम पाहिले. या वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणूनही डॉ. श्री. नेर्लिकर यांनी अत्यंत महत्वाची कामगिरी पार पाडली. आज नाशिक येथील वैद्यकीय महाविद्यालय शैक्षणिक दर्जाच्या बाबतीत एक प्रमख महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. त्याचे बरेचसे श्रेय या क्षेत्रातील जाणकार मंडळी नेर्लिकर दाम्पत्याला देतात. आज महाराष्ट्रात सर्वत्र अनेक वैद्यकीय महाविद्यालयांना नामवंत डॉक्टर्स व्याख्याते म्हणन लाभत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. आणि ती एक मोठीच सामाजिक समस्या आहे. पण नाशिकला ही उणीव मोठ्या प्रमाणावर भरुन निघाली त्याला संस्थेच्या कुशल नेतृत्वाबरोबरच डॉ. नेर्लिकरांचेही योगदान कारणीभूत ठरले. डॉ. सौ. शोभा नेर्लिकरांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास एक गोष्ट प्रथमच नमूद करावीसी वाटते ती ही की, त्या ख्यातनाम समाजवादी विचारवंत, पत्रकार दिवंगत माधवराव लिमये यांच्या कन्या होत. समाजसेवेचे बाळकडू त्यांना वडिलांकडूनच मिळाले. आपल्या वडिलांच्या मित्राचा मुलगा व्यसनाधिन झाला आहे; आणि त्यामुळे सर्व घर चिंतीत झाले आहे हे पाहून आणि वडिलांच्या सांगण्यानुसार डौ. सौ. शोभा नेर्लिकरांनी खास अभ्यासाद्वारे ही औषधोपचार योजना भारतात प्रथमच नाशिकला सरु केली. शहरातील प्रसिध्द रचना ट्रस्टच्या त्या सेक्रेटरी आहेत. त्यामुळे केवळ डॉक्टर म्हणूनच नव्हेत तर शहरातील एक लोकाभिमुख व्यक्तिमत्व म्हणुनही नेर्लिकर दाम्पत्याने मान्यता

मिळविली. गेले तब्बल ४० वर्षे नेर्लिकर दाम्पत्य नाशिकला आपली वैद्यकीय सेवा देत आहे. डॉ. नेर्लिकरांनी सरुवातीची काही वर्षे जिल्हा शल्य चिकित्सक म्हणुनही काम पाहिले. डॉ. सौ. नेर्लिकर यांनीही जिल्हा रुग्णालयात काम केले.

नाशिक येथील सुप्रसिद्ध रचना ट्रस्टमध्ये नेर्लिकर कुटुंबिय ट्रस्टी आहेत. त्यात डॉ. शोभा नेर्लिकर या सेक्रेटरी म्हणून कार्यभार सांभाळतात तर डॉ. विनायक नेर्लिकर व आर्चिस नेर्लिकर हे ट्रस्टी आहेत. वाचन संस्कृती वाढीस लागावी म्हणून त्यांनीभरीव काम केले. त्यासाठी नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयास त्यांनी २५लाखांची देणगी दिली. त्या देणगीतून लिमये हॉलची उभारणी झाली. केवळ सामाजिक बांधिलकीचा नव्हे तर पूर्वजांपासून मिळालेला वारसा त्यांनी सातत्याने जपला. आपल्यावर झालेले संस्कार आणि समाजसेवेचा वसाही त्यांनी सोडला नाही. वैद्यकीय सेवेत असे उदाहरण आभावानेच आढळते हे येथे नमूद करावेसे वाटते.






## शल्यचिकित्साने दारु सोडण्याचे भारतातील एकमेव व्यसनमुक्ती केंद्र
## अतिरिक्त मद्यपींची दारु सुटण्याचे प्रमाण ७० ते ९० % आहे

**DR. SHOBHA NERLIKAR**
M.S., F.R.C.S.(London), F.I.C.S.
Consulting General Surgeon Professor of sugery, Medical College

**DR.VINAYAK NERLIKAR**
M.S.ortho., M.Ch. Ortho. (Liverpool, U.K.) F.I.C.S Consulting orthopaedic Surgeon Joint Replacement & Spine Surgery

**DR. ARCHIS NERLIKAR**
CONSULTANT UROLOGIST
M.B.B.S., M.S.,F.C.P.S.(Gen.Surg.)
M.Ch.(Urology) (UK)

**DR. BHAVANA NERLIKAR**
B.D.S., M.U.H.S.

### विशेष सुविधा

• २४ तास सेवा • अनेस्थेशिया • त्वचारोग अस्थिरोग - ॲक्सिडेंट • अतिदक्षता विभाग • ट्रॉमा सर्जरी स्पाईन सर्जरी • सर्जिकल विभाग • युरॉलॉजी-मुत्रविकार • जनरल अ‍ॅण्ड लॅप्रास्कोपीक सर्जरी • दातांचे विकार व उपचार • ऑथोस्कोपीक अ‍ॅण्ड स्पार्टस मेडिसीन • ऑबस्ट्रेस्ट्रीक्स अ‍ॅण्ड गायनॅकोलॉजी • जॉईंट रिप्लेसमेंट सर्जरी • प्रसुती • संलग्न-न्युरोलॉजी सायकॅट्रीक

### उपलब्ध सुविधा

पॅथालॉजी • जनरल नर्सिंग होम • सोनोग्राफी • सुसज्ज आय.सी.यू. • ई.सी.जी.फिजीओथेरपी • ३ सुसज्ज ऑपरेशन थिएटर्स • डिजीटल ३०० MA एक्स-रे युनिट • सेंट्रल O2 लाईन्स् • सि-आर्म इमेज इंटेन्सीफायर • हॉरिझोन्टल लॅमीनर एयर फ्लो • ए.सी.डिलक्स स्पेशल सेमीस्पेशल रुम्स • ३० KV जनरेटर सप्लाय, जनरल वॉर्ड • २४ तास रुग्णवाहीका सेवा • २४ तास मेडिकल स्टोअर्स • कँटीन गृह व लाँड्री सुविधा

# NERLIKAR HOSPITAL & RESEARCH CENTER
## Consulting Orthopaedic Surgeon Joint Replacement & Spine Surgery
Nerlikar Hospital, Near Jehan Circle, Gangapur Road, Nashik - 422 013
☎ : (0253) 2342471, 2342474 Email : vanerlikar@gmail.com Web.: www.nerlikarhospital.com

Abelin Polymers

JAS-ANZ
ACCREDITED CERTIFICATION
Registration No. S 1910799 IN

Mumbai : 91-22-2837 8321 / 22
Mumbai : Fax : 91-22-2839 0508
Mobile : 9822064525
E-mail : abelin@vsnl.com

**Works :**
B-16, M.I.D.C., Ambad, Nashik - 422 010.
Tel. : 91-253-238 2225, 238 1525.
Fax : 91-253-238 0225.
E-mail : abelinpolymers@hotmail.com

**Residence :**
"Shantai" 181, Mahatma Nagar, Nashik - 7.
Tel. : 91-253-236 3027, 235 0504






D.J.BUILDERS
संपर्क - ८०५५ ६६ ०० ९
ऑ. ०२५३-२३४२८७५
dj.riva.meadows@gmail.com
www.djbuilders.com



SIVANANDA ELECTRONICS

MADE IN INDIA SINCE 1970

# SIVANANDA ELECTROINICS

**The Master Innovators Since 1970**




*Testing & Measuring Instruments*
*Entrance Control Metal Detectors*
*Access Control & Security Systems*



फायनल लेआऊट एन.ए.टायटल क्लिअर

# प्लॉटस् उपलब्ध

मनपा हद्दीमध्ये अमृतधाम जवळ
व पोद्दार इंटरनॅशनल स्कुलजवळ
उत्तरानगरमध्ये

(आता सुलभ हप्त्यानेही)
मनपा हद्दीबाहेर दुगाव, गिरणारे,
मानोरी, घोटी, कसारा

# फार्महाऊस
## प्लॉटस् उपलब्ध

नाशिकपासून फक्त १५ किमी अंतरावरत्र्यंबकरोड पासून
एकदम जवळ रम्य व नैसर्गिक वातावरणात ५ स्टार ॲमिनीटजसह
म्हणजेच प्रत्येक प्लॉटला चैन लिंक कंपाउण्ड, प्लॅनटेशन,
वॉल्कवेज, इंन्ट्रस वॉल आणि गेट, गॅजिबो, फिश पॉण्ड,
ड्रीप इरीगेशन,पार्किंग एरिया इ.

# शेतजमीन उपलब्ध

मानोरी, चिंचोळी,
गोंदे-सिन्नर, नाळेगांव-दिंडोरी,
ओझरखेड-नाशिक येथे

www.nirman.co.in
Nirman GROUP Since 1980
परंपरा विश्वासाची
निर्माण ग्रुप
निर्माण हाऊस, एल.पी.पोद्दार मार्ग, कॉलेज रोड, नाशिक ५
9325413873
9822112142




**550+** FLATS | **1100** SQ.FT | **33+** AMENITIES | **2BHK** PREMIUM APARTMENT & SHOPS


## STAR World
SHOPS & OFFICES
आर.डी. सर्कलजवळ, गोविंदनगर




SHOPS & OFFICES STARTING FROM **32** LAKHS

## श्री Kalika
MRN P51600023610

SHOPS | OFFICES
SHOWROOMS | HOSPITALS
मुंबई नाका



OFFICES STARTING FROM **55** LAKHS

## NATH SEETA YEOLEKAR COMPLEX
SHOPS & OFFICES
कॉलेज रोड




SHOPS & OFFICES STARTING FROM **45** LAKHS

SINCE 1989

**Corporate Office** : Near Janalaxmi Bank, Gadkari Chowk, Old Mumbai Agra Road, Nashik - 422 002.

**Nashik Road Office** : 101, 1st Floor, Anand Plaza, Nr. Datta Mandir Stop, Nashik-Pune Road, Nashik Road - 422101.

**Email : deepakbuilders@rediffmail.com**

www.deepakbuilderssanddevelopers.com

**बुकिंगसाठी संपर्क**

**0253-2992411**
**98233 39180**

FOLLOW US ON




# अगदि महामार्गावरही सुखद वाईन पर्यटन

वाईन उद्योग क्षेत्र इतर उद्योगांपेक्षा पूर्ण नवीन, या व्यवसायाची कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नाही. पण या उणीवा शिवाजी आहेर यांच्यासाठी अडसर ठरल्या नाहीत. किंवा या उणीवा आहेत. त्या अडचणी ठरू शकतात म्हणून जोखिम आहे असा विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही. स्वत:च कल्पकता, योजकता दर्शविली आणि अतिशय सुनियोजितपणे नाशिक परिसरात ओझरजवळ 'रेनेसॅन्स' या भव्य वाईन प्रकल्पाची उभारणी केली. रेनेसन्स हा वाईन प्रकल्प वाईन कॅपिटल नाशिकमध्ये वाईन प्रकल्प कसा असावा, तो कोठे असावा त्याचे इंटेरियर कसे असावे, वाईन्सची निर्मिती कशी करावी आणि निर्माण केलेल्या सुविधांचा उपयुक्त वापर कसा करून घ्यावा याचे अप्रतिम उदाहरण ठरले.

श्री. शिवाजी आहेर वाईन व्यतिरिक्त इतरही उद्योगक्षेत्रांत आहेत. पण वाईनरीलगतचा वाईनबार वैशिष्ट्यांच्या बाबतीत वाईनरी इतकाच महत्वपूर्ण ठरला. वाईनप्रेमी आणि खवय्यांच्या सर्व आवडी-निवडी पूर्ण करण्यात हा वाईनबार सक्षम आहे. या वाईनबारची संरचनाही अत्यंत कल्पक आणि कम्फर्ट आहे. हा वाईन प्रकल्प आणि वाईनबार पर्यटकांना नाशिककडे कायम आकर्षित करेल एवढे नक्की.

वाईन्सची निर्मिती दर्जेदार असेल, मार्केटींगचे चांगले नेटवर्क विकसित केले असेल तर वाईन उद्योग अनंत अडचणींना सामोरा जाऊनही यशस्वी होऊ शकतो. तशी उदाहरणंही आहेत.


शिवाजी आहेर

गरज आहे ती फक्त नेमक्या अडचणींचा शोध घेणं आणि त्यावरील उपाययोजनांची अंमलबजावणी करणं.

श्री शिवाजी आहेर यांनी वाईन उद्योजकांचे अतिशय यशस्वी असे नेतृत्व केले. ते ऑल इंडिया वाइन प्रोडूसर असोसिएशनचे अध्यक्ष होते तसेच वाईन बोर्डावरही संचालक होते. या दोन पदांवर कार्यरत असताना श्री शिवाजी आहेर यांनी वाईन उद्योगाचे विविध प्रश्न मार्गी लावले. शासन दरबारी विविध प्रश्नांसाठी यशस्वीपणे पाठपुरावा केला. वाईन उद्योगाबरोबरच उद्योगाची विविध क्षेत्रे, द्राक्ष शेती आणि समाजकारणात स्वत:चा वेगळा ठसा उमटविलेल्या शिवाजी आहेर यांनी राजकारण व समाजकारणात मोलाची कामगीरी बजावली असून, भविष्यात त्यांची भूमिका भूमिका प्रभावी आणि परिणामकारक ठरेल या दृष्टीने पावले उचलली आहेत. या संदर्भात बोलताना श्री. आहेर म्हणाले, वाईन उद्योगाच्या विविध प्रश्नांवर संशोधन सुरू आहे. ते विविधांगी आहे. जसे मोठया उद्योगांचे प्रश्न, लहान उद्योगांचे प्रश्न, द्राक्ष उत्पादकांचे प्रश्न, वाईन वितरणातील अडचणी, वाईन उद्योगासाठी होणारा कर्ज पुरवठा, विदेशातील वाईन उद्योग आणि भारतातील वाईन उद्योगातील फरक लक्षात घेऊन उपाययोजना या बाबींचा त्यांत समावेश असून वेळोवेळी अहवाल तयार करून त्यानुसार कार्यवाहीसाठी आम्ही संघटितपणे प्रयत्नशील आहोत. वाईन उत्पादक आणि शासन यांमधील 'दुवा' म्हणून महत्वपूर्ण भूमिका बजवायची आहे असे ही श्री. आहेर म्हणाले.

गोरख पगार




नाशिक शहराच्या हद्दीपासून १२ कि. मी. अंतरावर ओझरकडे जाताना मुंबई - आग्रा हायवेला लागून एकूण १५ हजार चौरस फुटाची ही वाईनरी वास्तुकलेचा अप्रतिम नमुना आहे. संचालकांच्या देखण्या कॅबीन्स, वाईनरीमध्ये येणाऱ्या प्रत्येक अभ्यागतास सुखद अनुभव येईल असा स्वागतकक्ष, आकाशाशी एकरुप होत वाईन टेस्ट करता येईल अशा लॉन्स, युरोपातील एखाद्या राष्ट्रप्रमुखाची असावी अशी वाईन टेस्टींग आणि कॉन्फरन्स रुम. त्यातील जागतिक पातळीवरील मौल्यवान वाईन ग्लासचा संग्रह आणि देखणे इंटेरियर नजरेचे पारणे फेडते. त्यातून वाईन नि वाईनरी हा फक्त चवीचा भाग नाही तर तो वाईनरीत अनुभवायचा असतो याचीही खात्री पटते. त्यानंतर अत्यंत देखणी मांडणी केलेला शेल्लार कक्ष, त्यातील सुरेख पध्दतीची व्हेसल्स मांडणी, व्हेसलही अत्यंत दर्जेदार स्वरुपाच्या. तसेच संपूर्ण उपकरणे आणि यंत्रणेची देखील देखणी मांडणी तसेच लक्झरीयस अतिथी कक्ष हे या वाईनरीचे आणखी एक वैशिष्ट्य. एकूण १० लाख लिटर्स क्षमतेची ही वाईनरी आहे. मुंबई-आग्रा महामार्गाला लागून पण सभोवतालच्या सुंदर विनियार्डमध्ये ही वायनरी स्थिरावली आहे. फ्रान्स, इटली नि जर्मनीत असतात तशी. वायनरीच्या वास्तुतूनही हे विनियार्ड पाहुण्यांचं स्वागत करतं आणि वाईनरी बाहेर आल्यानंतर आपल्याशी संवाद साधू लागतं. वायनरीच्या छतावरून तर ते आणखीच सुंदर दिसतं. पुढे भविष्यात या छतावरच काही महोत्सव आयोजित करण्याची संचालकांची योजना आहे. नाशिक शहराच्या इतिहासात या गोष्टींना विशेष महत्व प्राप्त होणार हे नक्की. पण नव्या इतिहासाने आकार घेतला तो रेनाईसॅन्स वायनरीचा वाईनबार आस्तित्वात आल्यामुळे. कारण महाराष्ट्रातील एक उत्कृष्ठ वाईनबार असे त्याचे स्वरुप आहे. ग्रेप वाईन तिच्या संभाव्य लाखो नव्या चाहत्यांपर्यंत पोहचवण्याचे काम हा वाईनबार त्याच्या स्थान महात्म्यामुळे आणि दर्जेदार वाईन्समुळे करत आहे. आणि ही बाब संपूर्ण वाईन उद्योगासाठी वरदान ठरणार आहे.



आम्हाला फक्त स्वत:ची वाईन नाही तर संपूर्ण वाईन उद्योग नावारुपाला आणायचा आहे असे या वायनरीचे अध्यक्ष श्री. शिवाजी आहेर यांनी अर्थ-उद्योगशी बोलताना स्पष्ट केले.

# वाईन उद्योग मुळ उद्दिष्टांपासून दूर ही खंत

## जगदिश होळकर

### अध्यक्ष, अ. भा. वाईन उत्पादक संघ



**महाराष्ट्रातील द्राक्ष प्रक्रिया उद्योग धोरण, द्राक्षाची शेती तोटयात जाऊ नये म्हणून आखण्यात आले. परंतु उद्दिष्ट साध्य होणं तर दूरच उलट द्राक्ष बागाईतदाराच्या समस्या आणखी वाढल्या आणि जो द्राक्ष बागाईतदार वाईन उद्योगात गेला तोही अडचणीत आला अशी परिस्थिती आहे. आणि हे सर्व हा उद्योग मूळ उद्दिष्टांपासून दूर गेल्यामुळे घडले असे स्पष्ट मत अ. भा. वाईन उत्पादक महासंघाचे अध्यक्ष आणि फ्लेमिंगो वाईनरीचे चेअरमन जगदिश होळकर यांनी व्यक्त केले आहे.**

आपला मुद्दा स्पष्ट करताना श्री जगदिश होळकर म्हणाले, भारतातही द्राक्षापासून वाईन निर्मिती व्हावी ही कल्पना विदेशातील वाईन उद्योग पाहून प्रबळ झाली. मा. शरद पवार, स्व. विलासराव देशमुख आदि नेत्यांना ते पटले आणि द्राक्ष प्रक्रिया उद्योग धोरण जाहीर झाले.

पण वाईन उद्योगाची उभारणी करताना विदेशांत हा उद्योग कसा आहे. याकडे दुर्लक्ष झाले. आणि त्याचमुळे हा उद्योग अडचणीत सापडला आहे. मुळ उदिष्ठ, धोरण आणि प्रत्यक्ष कृतीत समन्वय साधला तर हा उद्योग यशस्वी होऊ शकतो आणि तो शेतकऱ्यांची आर्थिक ताकद होऊ शकतो हेही श्री होळकर यांनी स्पष्ट केले.

या संदर्भात बोलताना श्री होळकर म्हणाले, विदेशातील वाईनरीज शेतकऱ्यांचा आणि दरडोई खपाचा विचार करता लहान आहेत. फक्त पती-पत्नी असे दोघेच जण एक वाईनरी सांभाळतात. आणि मार्केटींग सहकारी पध्दतीने किंवा फेडरेशनमार्फत होते. वाईन उत्पादक स्वत:चीच द्राक्षे वाईननिर्मितीसाठी वापरतो. वाईनरीसाठीचे कर्ज अल्प व्याजदराचे असते. मुळातच तपमान कमी असल्यामुळे इलेक्ट्रीसीटीवरही खर्च कमी होतो. वाईनची बाजारपेठ विकसित आहे. परिणामी तेथील वाईन उद्योग भरभराटीला आला. भारतात उलट स्थिती आहे. येथे हा उद्योग केवळ शेतकऱ्याचा म्हणजे शेतकरी पती-पत्नीचा नाही.

द्राक्षे अनेकांना विकत घ्यावी लागतात. कर्ज पुरवठा अधिक व्याजदराने होतो. मार्केटींग स्वत:ला करावे लागते आणि तेही खर्चिक. बाजारपेठ विकसित नाही. दरडोई खप अद्याप वाढला नाही. उत्पादन खर्च मात्र अधिक. तुलनेने परतावा कमी म्हणून प्रथम वाईन उत्पादक, नंतर द्राक्ष उत्पादक आणि त्यानंतर वित्तीय संस्था अडचणीत आल्या. अशा परिस्थितीत हा उद्योग वाचवायचा असेल तर काही उपाय योजावे लागतील, सर्वांत महत्वाचे म्हणजे हा उद्योग कॉटेज स्वरुपात असावा. तो फक्त शेतकरी जोडप्याने सांभाळावा. बाजारपेठ सहकारी किंवा एकत्रितपणे विकसित करावी. कर्ज अल्प व्याजदराचे असावे आणि वाईनकडे लिकरच्या दृष्टीतून न पाहता सामाजिक हिताचा उद्योग आणि पेय म्हणून बढती मिळावी म्हणजे द्राक्ष प्रक्रिया धोरणाचे मूळ उद्दिष्ट साध्य होऊ शकेल.

अ. भा. वाईन उत्पादक संघाचे अध्यक्ष म्हणून श्री. होळकर यांनी या उद्योगाचे प्रश्न सोडविण्यासाठी हिरिरिने प्रयत्न चालविले आहेत. मा.शरद पवार, मा. बाळासाहेब थोरात, मा. राधाकृष्ण विखे पाटील, मा. अजित दादा पवार, मा. नारायण राणे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, विद्यमान मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे वाईन उद्योगाचा प्रश्न त्यांनी हिरिरिने मांडला आहे. आणि सर्व स्तरांवर विचार होऊन लवकरच काही सुखद निर्णय घेतले जाण्याची आशा निर्माण झाली आहे.

जिल्हा कॅलिफोर्निया, तर नाशिक शहरामध्ये 'पॅरिस' होण्याची ताकद आहे असे श्री जगदीश होळकर यांनी म्हटले. कोणताही विदेशी पाहुणा भारतात आला तर त्यास नाशिक येथील वाईन प्रकल्पास भेट देण्याची इच्छा होते. हे प्रकल्प आता केवळ वाईन प्रकल्प नाही तर नाशिकचा निसर्ग आणि हवामानाचा आनंद लुटण्याचे पर्यटन केंद्र झाले आहेत. वाईनरी प्रकल्प हा एक उद्योग आहे पण त्याला जोडून इतर उद्योग वाईनबार, रिसोर्ट, वाइन म्युझियम उभे राहू शकतात आणि ते वाईन इतकेच महत्त्वाचे आहेत हे नाशिक येथील काही वाईन प्रकल्पांनी सिद्ध केले.

नाशिक जिल्ह्यातील वाईन उद्योगाचे वय खरेतर २० वर्षाचे आहे.






म्हणजेच अद्याप हा उद्योग बाल्यावस्थेत आहे. तुलनेने त्याच्या विकासाचा दरही अत्यल्प राहिला त्याचे कारण धोरणात्मक त्रुटी, विक्रीवरील निर्बंध आणि वाईन विकणे महाग बनले. वाईन उत्पादकांना या सर्व गोष्टींची कल्पना पूर्वी नव्हती हे आता लक्षात आले. दरम्यान पोरणात्मक त्रुटी दूर करण्यावर सर्व स्तरांत प्रयत्न सुरू आहेत आणि वाईन उद्योग भरभराटीला येण्याची सुचिन्हे निर्माण झाली आहेत. त्यामुळे नाशिकचा वाईन उद्योग आणि द्राक्षे उत्पादकांचे भविष्यही निश्चितच उज्ज्वल आहे. एवढेच नव्हेतर वाईन उद्योग नाशिकचा 'अर्थकणा' बनेल असेही चित्र आहे. त्यासाठी जगदीश होळकर यांनी विशेष प्रयत्न केले.

नाशिक जिल्ह्यातील ज्या पट्ट्यात वाईन प्रकल्प आहेत तेथील परिसर आणि हवामान अतिशय सुखद आहे. तसेच सर्वत्र अतिशय चांगले फार्म हाउस देखील आहेत. या सर्व ठिकाणी फ्रान्समध्ये आहे तसा 'अॅग्रो टुरिझम'अस्तित्वात येऊ शकतो असे जगदीश होळकर यांना वाटते. ज्यामुळे नाशिक जिल्हा खरोखरच भारतातील कॅलिफोर्निया आणि नाशिक शहर भारताचे पॅरिस' म्हणून ओळखले जाईल. असा आशावाद त्यांनी व्यक्त केला आहे.

**गोरख पगार**

MAHA RERA NO.
P51600001608



MADHOOR
# MAITRI
Mahatma Nagar, Nashik

Pioneers in the area of construction, Madhoor Group changed the face of city of Nashik. Today, they are the leading group in this domain having executed over 150 projects including prestigious projects such as hospitals, college buildings, housing colonies and other commercial buildings for government as well as non-government organizations. Madhoor Group ably guided by its directors, has many specialized units which function in harmony to develop landmark projects.

MADHOOR
BUILDWELL PVT LTD

**NASHIK OFFICE**
301, Janki Plaza, Near Kharbanda Park,
Dwarka Circle, Nashik - 422 011.
Tel.: +91 253 2501144 / 2506901
TeleFax : +91 253 2597894

**MUMBAI OFFICE**
342, Kailash Plaza, III Floor, Vallabh Baug Lane,
Ghatkopar (E), Mumbai - 400 077.
Tel. (022) 21028452 / 40110241

Email: sales@madhoorgroup.com Web : www.madhoorbuildwell.com

ISO-9001-2008 and HACCP Certified Company




# DESHMUKH VINEYARDS

Deshmukh Vineyard's
Roots To Table

**A.D. WINES**
Factory : Gat No. 662/1/2, SH No. 17,
Behind Saptashrungi Petrol Pump, A/t. Post
Tal. dindori, Dist. Nashik, Customer Care No. : (02557) 221641
E-mail : adwines@rediffmail.com / Website : www.deshmukhvineyards.com

A.D. WINES
(An ISO 9001:2000 Certified Co.)

# बँक ऑफ महाराष्ट्रकडे वित्तीय सहाय्याच्या विविध योजना

**विशेष वृत्तांत**

गोरख पगार

**विकासाचे भरीव काम बँक ऑफ महाराष्ट्रच्या माध्यमातून झाले. नाशिक जिल्ह्यात तर ते विशेष उल्लेखनीय आहे. जिल्ह्यात द्राक्षबागा विकसित झाल्या त्या बँक ऑफ महाराष्ट्रमुळे, नाशिक जिल्ह्यात कृषी उद्योग उभे राहिले ते बँक ऑफ महाराष्ट्रमुळे, बँक ऑफ महाराष्ट्र जिल्ह्याच्या विकासाचे नेतृत्त्व करीत आहे. सध्या श्री. सी. बी. सिंह झोनल मॅनेजर आहेत. कर्तव्यात कसूर नाही, कामाला प्रथम प्राधान्य, शिस्तप्रिय, विकासाची दृष्टी, कडक पण तेवढेच सहृदयी हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य आहे. आणि काम, गुणवत्तेला प्राधान्य देणारे!**



## झोनल मॅनेजर श्री. सी. बी. सिंह यांची खास मुलाखत

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या योजना आणि त्या योजनांना बँक ऑफ महाराष्ट्रने दिलेली भक्कम साथ यामुळे शेतकरी आणि छोटे मोठे व्यावसायिक नाशिक विभागात भक्कमपणे उभे राहिले आहेत. आणि त्या सर्वांना गतिमान करण्याचे काम महाराष्ट्र बँक वेगाने करीत आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र वित्तीय सहाय्याच्या आणि विकासाच्या विविध योजना राबवित असून त्याची माहिती झोनल मॅनेजर श्री. सी. बी. सिंह यांनी दिली. त्यात शासकीय योजनांसाठी, बचतगटांसाठी साहाय्याच्या योजना, फार्मर्सक्लब, फॉर्मर्स प्रोड्यूसर कंपन्या, कृषी विमा देणाऱ्या अधिकृत कंपन्या, उपयुक्त पोर्टल्स, महाबँकेची ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था आणि उपक्रम, स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम यांचा समावेश आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

### सिंचन योजना

१) गुणवत्तापूर्वक बिजोत्पादन व बीज पुरवठा (मातीच्या आरोग्यावर आधारित)

२) वाटरशेड, शीतसाखळी आणि पोस्ट हार्वेस्टींग मॅनेजमेंटमध्ये गुंतवणूक

३) अन्न प्रक्रिया उद्योगांमार्फत पीकाचे व्हॅल्यू ॲडिशन आणि त्याला बढती देणे.

४) राष्ट्रीय कृषी बाजारपेठा विकसित करणे, त्यासाठी सुविधा निर्मिती.

५) जोखीम आधारित अल्प गुंतवणुकीचा पीक विमा

६) कुक्कुटपालन, मधमाशीपालन आणि मत्स्यशेती यांचा विकास साधने या क्षेत्रांचा समावेश होतो.

वरील उपक्रमांवर आधारित कार्यक्रम निश्चिती आणि कार्यवाहीवर भर देण्याच्या सुचना विभागीय कार्यालयामार्फत बँक ऑफ महाराष्ट्रने आपल्या शाखांना दिल्या आहेत असेही श्री. सिंह यांनी यावेळी सांगीतले.

श्री. सिंह पुढे म्हणाले, नाशिक जिल्ह्याच्या आर्थिक व औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेत बँक ऑफ महाराष्ट्रने आघाडी घेतली असून, नवीन कर्ज वाटपात भर देण्याबरोबरच शेती कर्जे व व्यावसायिक कर्जाच्या वसुलीस

ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळविला आहे.

श्री. सिंह यांनी पतपुरवठा आणि ग्राहकांशी समन्वय साधण्यावर भर दिला. विविध पातळ्यांवर ग्राहकांशी समन्वय साधून, त्यांच्या अडी-अडचणी समजून घेत, वित्त पुरवठा करत आर्थिक व औद्योगिक विकासाच्या कार्यास त्यांनी गती दिली.

शेती कर्जावर बँकेने विशेष भर दिला असून रब्बी हंगामासाठी त्वरेने कर्ज पुरवठा केला आहे. महाराष्ट्र बँक कृषीसाठी, घरासाठी, शिक्षणासाठी, वाहनासाठी तसेच विविध प्रकारच्या व्यवसायांसाठी कर्जपुरवठा करीत असून, उद्योजकता विकास आणि त्यासाठी प्रबोधनावर भर देत आहे, तसेच त्यासाठी विविध योजना राबवित आहे. बँक ऑफ महाराष्ट्रच्या विविध योजना, उपक्रम आणि लीड बँक म्हणून बँकेमार्फत तयार होत असलेला जिल्ह्याचा पतपुरवठा आराखडा याची सर्वांगीण माहिती श्री. सिंह यांनी दिली ज्यामुळे आर्थिक व औद्योगिक विकासाचे अनेक पर्याय त्यामुळे खुले झाले आहेत याची जाणीव झाली. एवढेच नाही तर बँकींग हा केवळ व्यवसाय नाही तर समाजाच्या, पर्यायाने राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे महत्वपूर्ण अंग आहे. आर्थिक व औद्योगिक विकास केवळ बँकांमुळे शक्य होतो हे बँक ऑफ महाराष्ट्रच्या विविध प्रकारच्या कार्यातून व योजनांमधून सिद्ध झाले आहे.




महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी संलग्न नवलभाऊप्रतिष्ठान संचलित

# कृषि महाविद्यालय

जळोद रोड, रेल्वे क्रॉसिंगजवळ, अमळनेर – ४२५ ४०१, जि. जळगाव ☎ : ०२५८७ – २०२५०१, मो. ९४२१५३६८६७

कृषि महाविद्यालयाची प्रमुख वैशिष्ट्ये –

- उच्चशिक्षीत सेवाभावी अनुभवी शिक्षकवृंद
- निसर्गरम्य परिसरात कृषि महाविद्यालयासाठी प्रशस्त व सुसज्ज इमारत
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र हवेशीर प्रशस्त वसतिगृहे
- विद्यार्थ्यांना शेतांवरील प्रात्याक्षिकांसाठी १०० एकर जमीन उपलब्ध

शक्षीत प्रवेशासाठी पात्रता – कमीत कमी ५०% गुणांसह १२ वी विज्ञान (फिजीक्स, केमेस्ट्री व बायोलॉजी, इंग्रजी विषयांसह) परीक्षा उत्तीर्ण (टिप : मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ४५% मार्कस् अपेक्षित)

प्रवेश पद्धत – महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहूरी – ४१३ ७२२.
जि. अहमदनगर (महा.) यांच्या सुयनेनुसार अर्ज पाठवावेत.





प्राचार्य
श्री. डॉ. एकनाथ नथ्थू पाटील
नवलभाऊ कृषि महाविद्यालय,
अमळनेर, जि. जळगाव

अध्यक्ष
मा. नानासाो. ॲड. विजय नवल पाटील
नवलभाऊप्रतिष्ठान
नवलनगर, ता. जि. धुळे

प्राचार्य
श्री. मा. बाळासाो. अनिकेत विजय पाटील
नवलभाऊप्रतिष्ठान
नवलनगर, ता. जि. धुळे

# लघुउद्योग क्षेत्रात मोठे उत्पादन कनानी कुटुंबियांनी सिद्ध केले

सामाजिक सोडविण्यासाठी हिरिरिने भाग घेणारे, उद्योजकांचे प्रश्नही धसास लाऊ इच्छिणारे, आणि उद्योगासाठीच जन्म घेतलेले व्यक्तीमत्व म्हणजे योगेश कणानी. सामाजिक क्षेत्र आणि औद्योगिक क्षेत्र दोन्ही घटकांना ते हवे असतात. या दोन्ही घटकांची निराशा श्री कणानी यांनी कधी केली नाही. पण त्याच बरोबर स्वत:च्या उद्योगाकडेही कधी दुर्लक्ष होऊ दिले नाही. हायस्पीड टंगस्टनचे उत्पादन लघुउद्योग क्षेत्रात करून खरेतर त्यांनी कमाल केली. तसेच देश आणि विदेश पातळीवर आपल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळविली. त्यामुळे भारताच्या लघुउद्योग क्षेत्रात किती दम आहे याची जाणीव सर्व संबंधितांना झाली. विशेषत: लघुउद्योगांकडे उपेक्षेने पाहणा-या मोठ्या उद्योगांना, हे क्षेत्र दुर्लक्ष करण्याजोगे नाही अशी खात्री पटली. आयमाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांची कामगीरी अविस्मरणीय ठरली.

टाटा - बिर्ला सारख्या मोठया औद्योगिक घराण्यांना जे जमू शकले नाही, ते नाशिकच्या उद्योजकांनी लघुउद्योग क्षेत्रात केले. उद्योगक्षेत्रातील श्री. कनानी यांचे कर्तृत्व महाराष्ट्रातील तमाम उद्योगप्रेमीना अभिमान वाटावा असे आहे. या चौघांनी आपल्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा वापर उद्योजकीय वाटचालीसाठी यशस्वीपणे करून घेतला आहे. मेसर्स टंकोसी इलेक्ट्रीकल कॉन्ट्रक्टर, योगेश्वर इंजिनीयरींग प्रायव्हेट लिमीटेड या प्रकल्पांचे प्रवर्तक असलेल्या कनानी यांनी केवळ प्रचंड इच्छाशक्ती, ज्ञान आणि अनुभव तसेच कठोर परिश्रमांच्या बळावर उद्योगातील आपले स्थान अढळ केले.

श्री. कनानी इंजिनीअर आहेत. ते आणि त्यांच्या काही भागीदारांनी प्रारंभी इंडियन टुल कंपनीत नोकरी केली. तेथे पुरेसा



अनुभव घेतल्यानंतर स्वत:च उद्योगात का येउ नये ? या विचारांनी त्यांना घेरले. कारण तांत्रिक ज्ञान आणि पुरेसा अनुभव पाठीसी होता. सर्व पहिल्या पिढीतील उद्योजक, उद्योजकीय पार्श्वभूमी नाही. शिवाय जागेचा प्रश्न त्यांच्या समोर उभा होते. परंतु इच्छा असली की मार्ग सापडतो. तसेच या उद्योजकाच्या बाबतीत झाले. प्रामाणिक प्रयत्न सुरू झाल्यानंतर त्यांच्या मार्गातील एक-एक अडचण दूर होत गेली. १९७८ चा तो काळ होता. श्री कनानी स्वत:चा उद्योग उभारणीसाठी धडपड करीत होते. त्यांनी त्यांची इंडियन टूलमधील नोकरी सोडली होती. दरमहाचा पगार बंद झाल्यामुळे थोडी असुरक्षितताही होती. परंतु माघार घ्यायची नव्हती. नोकरीच्या काळात बचत केलेला पैसा आणि ग्रॅज्युटीच्या रकमेतून साधारण दोन महिने घर चालेल एवढा पैसा बाजूला काढून ठेवला होता. नोकरी सोडून उद्योग करायचे ठरविल्यानंतर प्रथम त्यांनी जागेचा प्रश्न सोडविण्याचे ठरवले. आणि जिल्हा उद्योग केंद्र गाठले. आणि रेडिमेड शेड मिळविली. याच शेडमध्ये १९७८ मध्ये टंकोसी इलेक्ट्रीकल कॉन्ट्रक्टर या उद्योगाची स्थापना केली. येथे अत्यंत छोटया जागेत टंगस्टन कॉर्बोईडचे उत्पादन होते. जगात असे एक युनिट नाही. टंगस्टन कॉर्बाईडचे उत्पादन करणारे तीन मोठे युनिट जगात आहेत. त्यात सॅण्डविक (स्वीन्ड), मिडीया (जर्मनी), यांचा समावेश आहे. त्यांतील स्कूप हे सर्वात मोठे आणि त्याच्याशी नाशिकचे श्री. कनानी हे लघुउद्योजक स्पर्धा करीत आहेत.

भारतातही टंगस्टनचे उत्पादन होते परंतु मोठया प्रकल्पात, त्यात इंडिया हार्डमेटल, श्रीराम होंडा, डी.सी.एम. यांचा समावेश आहे. त्यापेक्षा गुणवत्तेत सरस असे उत्पादन येथे होते. सर्वात महत्वाचे म्हणजे टाटा किंवा बिर्लासारखे उद्योग समुहही या उत्पादनात नाहीत. या दोन्ही उद्योग घराण्यांनी उद्योगाची सर्वक्षेत्र व्यापली आहेत. अपवाद फक्त टंगस्टनचा. टंगस्टन कॉर्बोईडच्या उत्पादनासाठी यंत्रणा भारतात उपलब्ध नाही. ती आयात करणे मोठे खर्चिक आहे. या समस्येवर उपाय म्हणून टंगस्टन कॉर्बाईडच्या उत्पादनासाठी लागणारी यंत्रणा कनानी यांनी ते इंजिनिअर असल्याने स्वत: विकसीत केली. उद्योगात एवढे यश मिळाले, असतानाही स्वस्थ बसले नाहीत. त्यांचे संशोधन सतत सुरूच होते. त्याचाच परिणाम म्हणून फिलेमेंट कटर मशिन बनविण्यात लघुउद्योग क्षेत्रात टंकोसीने मिळविलेले यश खरेच कौतुकास्पद आहे. याशिवाय ब्लेड उद्योगात टंगस्टन हा महत्वाचा घटक आहे. आज आपल्या देशात ब्लेड उद्योगात टंगस्टन वापरले जाते. कनानी यांच्या उद्योजकीय कामाचा गौरव पुढे शासकीय व इतर स्तरांवरही झाला. श्री कनानी यांनी लघु उद्योग क्षेत्रातील अनेक महत्त्वपूर्ण पारितोषिके पटकावली आहेत. आता त्यांना त्यांच्या उद्योगात दोन्ही मुलांची महत्त्वपूर्ण साथ मिळाली आहे.

गोरख पगार

# गरज आणि सेवेतील समर्पण यश निश्चित करते ! : सुरजितसिंग आनंद

✍ गोरख पगार



आनंद कुटुंबिय आणि संपूर्ण आनंद घराणे ऑटो व्यवसायाशी बांधिलकी मानणारे आहे. त्यांची श्रध्दा राहिली ती फक्त कर्मावर (कार्य). आनंद घराण्याचे हे वैशिष्ट सांगणारी कथा, स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरु होते. त्यावेळी श्री आनंद यांचे वडील कर्तारसिंग हे बीटीश सरकारच्या सेवेत साधे पोस्टमास्तर होते. आणि या सेवेच्या निमित्ताने आपल्या आयुष्याची अनेक वर्ष त्यांना, आज पाकिस्तानात असलेल्या रावळपीडीत काढावी लागली. भारतीय स्वातंत्र्याचा काळ जवळ आला असताना म्हणजे १९४५ मध्ये ते या सेवेच्या निमित्तानेच मुंबईला आले.

मानवी जीवन म्हटले की, काहीतरी करावेच लागते. मग ती नोकरी असो वा व्यवसाय. कार्यक्षेत्र मग कोणतेही असो, त्यात सरळमार्ग असावा, शिस्त आणि प्रामाणिकपणा तर आवश्यकच आहे. हेच साधे सरळ सुत्र अंगी बाळगून आनंद घराण्याची वाटचाल पुढे सुरु राहिली.

श्री कर्तारसिंग यांचे मुंबईतील हे स्थलांतर त्यांच्या कुटुंबियांना वेगळे वळण देणारे ठरले. चाकोरीबध्द जीवनाबरोबरच व्यावसायिक जीवनही त्यांना जवळून पाहता आले.मुंबईत असताना मुले अजून लहान होती. आणि परिस्थिती बेताचीच असल्याने आपल्या मुलांनी लवकर कमावते व्हावे असे त्यांना वाटे. त्यामुळे मोठा मुलगा जाणता होताच भारतीय लष्करी सेवेत दाखल झाला आणि पुढे मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाल्यानंतर लगेच सुरजितसिंग आनंद हेही मुंबईतील ऑपेरा हाऊस येथे ऑटो व्यावसायिकांकडे नोकरी



करू लागले. १९६१ चे ते वर्ष असावे, त्यानंतर साधारण ५ वर्ष सुरजीतसिंग यांनी या व्यवसायात काढली. या सेवेत असतानाच श्री सुरजितसिंग यांच्यात स्वत:च्या उद्योग व्यवसायाविषयी मानसिकता तयार झाली आणि ऑटो स्पेअर पार्ट विक्रीचा व्यवसाय आपणही करू शकतो अशी खुणगाठ त्यांनी आपल्या मनाशी बांधली. परंतु व्यवसाय नेमका कुठे करावा हा प्रश्न होता. त्यासाठी अत्यंत दुरदृष्टीने त्यांनी नाशिकची निवड केली. १९६६ मध्ये आनंद कुटुंबिय नाशिकला स्थलांतरीत झाले. येथील शिंगाडा तलाव भागात त्यांनी प्रथम 'जीत' मोटर स्टोअर्सची स्थापना केली. तेथून स्पेअर्स पार्टची विक्री होई. या व्यवसायात जम बसविण्यासाठी आनंद कुटुंबियांना भरपूर कष्ट घ्यावे लागले. पुढे १९६८ मध्ये सुरजितसिंग यांचा भाऊही जीत मोटर्स मध्ये सहभागी झाला त्यामुळे आनंद कुटुंबियांच्या उद्योगाची गाडी रुळावरून वेगाने धाऊ लागली होती. आणि उद्योग व्यवसाय विस्ताराच्या नव-नव्या कल्पना त्याना सुचत होत्या. क्षेत्र अर्थातच ऑटोमोबाईल उद्योगाचेच राहणार होते. स्पेअरपार्ट विक्री बरोबरच स्पेअर पार्टस्ची निर्मिती का करू नये ? असे त्यांना वाटू लागले, आणि निर्णय पक्का झाल्यावर १९७९ मध्ये त्यांनी अंबड औद्योगिक वसाहतीत २००० चौरस मीटर जागा घेतली आणि टुमदार इमारतीच्या बांधकामानंतर १९८२ मध्ये या कारखान्यांत लिफ्ट स्प्रिंगचे उत्पादन सुरु झाले. ही स्प्रिंग अत्यंत दर्जेदार म्हणून ऑटोमोबाईल उद्योगक्षेत्रात ओळखली गेली. ऑटो व्यवसायात संपूर्ण महाराष्ट्रभर तिने मान्यता मिळविली.

श्री. आनंद यांचे वय आज ७० वर्षांचे आहे. तरीही उमेद कायम आहे. फक्त मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेतलेल्या श्री. आनंद यांचे उद्योग व्यवसायातील यश आणि अद्यापही महत्वाकांक्षा कौतुकास्पद आहे. एक साध्या पोस्टमास्तरचा मुलगा, कष्टाच्या बळावर कारखाना उभा करु शकतो नंतर तीन बाजूस उघडणारी ट्रॉली उत्पादन हा शुन्यातून विश्व निर्माण करण्याच्या प्रकारातील आदर्श उदाहरण ठरते.



श्री. आनंद याचा विवाह रघुवीर कौर यांच्याशी झाला. त्याही आनंद एंटरप्राईजेसचे काम पाहतात. रघुवीर कौर यांनी कौटुंबिक आघाडीही यशस्वीरित्या सांभाळली. जसपालसिंग हे त्यांच्या मुलाचे नाव, बी. कॉम. झाल्यानंतर तो वडीलांच्या व्यवसायात सहभागी झाला. उद्योजकतेचे सर्व गुण जसपालसिंग यांत आहेत. आनंद ट्रालीची डिझाईन स्वत: जसपालसिंग यांचीच होती. पुढे त्यांनी पिंपळगाव बसवंत येथे गव्हावर प्रक्रिया उद्योग उभारला. मुलाखतीच्या वेळी जसपालसिंगही तेथे उपस्थित होता त्याच्याशी बोलताना तोही अत्यंत महत्वाकांक्षी आहे याची जाणीव झाली. कृषी क्षेत्रात विविध उपयुक्त उत्पादन बनविणे हे माझे उद्दिष्ट असल्याचे जसपालसिंगने यावेळी बोलताना सांगितले.

वडीलांनाही 'मुलाच्या कर्तृत्वाबद्दल विश्वास आहे. समाजकार्याची श्री. आनंद यांना आवड आहे. ते रोटेरियन असून अध्यक्ष, उपाध्यक्षपद त्यांनी भुषविले आहे. तसेच आयमाचे जाईन्ट सेक्रेटरी, सेक्रेटरी आणि खजीनदारपद तसेच अध्यक्षपदही त्यांनी भुषविले आहे. गुरु गोविंदसिंग पब्लिक स्कुलचे ते ट्रस्टी आहेत. उद्योगात प्रामाणिकपणा आणि भरपूर मेहनतीचा संदेश त्यांनी दिला आहे.




# नेतृत्व आणि उद्योजकता साथ-साथ

# धनंजय बेळे

अध्यक्ष, निमा, नाशिक





श्री. धनंजय बेळे यांनी पॉलीमरमधील पदविका घेतली. त्यानंतर १९८८ मध्ये स्वत:च्या एस. एस. एंटरप्राईजेसचा उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली. त्याचा विस्तार नाशिक सिन्नर सह एकूण ७ शाखांमध्ये झाला. ते त्यांची उत्पादने केवळ राज्यच नाही तर विदेशातही निर्यात करतात. श्री. बेळे उद्योजकांचे तरुण तडफदार नेते म्हणून ओळखले जातात. सर्वात तरुण म्हणून आयमाचे अध्यक्षपद त्यांनी भुषवले. सध्या ते निमाचे अध्यक्ष आहेत. चांगले संघटन कौशल्य त्यांच्या अंगी हे. तसेच धडाडीही.

नाशकात आयमा व निमाच्या पुढाकाराने हिरानंदानी ग्रुप, जिंदाल सॉ, ज्योस्टिक, ब्राईट सिनो प्रा. लि., ॲडव्हान्स एंजाइम आदी कंपन्यांनी 2000हून अधिक कोटींची गुंतवणूक करण्याचा मानस व्यक्त केला आहे. त्यामुळे त्याला पूरक म्हणून अप्रत्यक्षरित्या ही



गुंतवणूक 10 हजार कोटींच्या घरात जाईल. औद्योगिक क्षेत्रासाठी 7000 हेक्टर क्षेत्र राखीव ठेवण्यात आलेआहे.

चुंचाळे येथील 1300 एकर जागा औद्योगिक क्षेत्रासाठी मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहे. ती जागा मिळाल्यास नाशिकचा चेहरामोहराच बदलून जाईल आणि जिल्ह्यातील औद्योगिकरणाला अधिक गती मिळेल यात शंका नाही. नाशिक ते घोटी दरम्यान नवीन औद्योगिक वसाहतीची जाग शोधण्याचे काम सुरू असल्याचे एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी सुतोवाच केले आहे. ही जागा निश्चिती लवकर झाल्यास तेथे आणखी उद्योग येतील आणि रोजगारनिर्मितीबरोबरच मोठ्याप्रमाणात आयात निर्यातीलाही चालना मिळेल आणि राज्याबरोबरच देशाचाही आर्थिक विकास होईल. नाशिकला महापालिकेच्या माध्यमातून शेकडो एकर जागेत आयटी हब तसेच लॉजिस्टिक पार्क उभारण्याचा मानस माजी महापौर सतीश कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे. तसे झाल्यास मुंबई, बंगरुळूप्रमाणे नाशकातही मोठ्याप्रमाणावर रोजगार उपलब्ध होतील आणि नाशिकचे नाव सातासमुद्रापार जाईल यात शंका नाही.

गोरख पगार

आपल्या आरोग्याचा
हितचिंतक... आयुष्यभर !

**Shree Saibaba**
**Heart Institute & Research Center**

# मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कार्डिओलॉजी | कार्डिओ थोरॅसिक सर्जरी | युरोलॉजी व नेफ्रोलॉजी | जॉईंट रिप्लेसमेंट व ऑर्थोस्कोपिक सर्जरी | इंटरव्हेन्शनल रेडियोलॉजी |
| स्पाईन सर्जरी | फुफ्फुसांचे आजार | मेडिकल व सर्जिकल गॅस्ट्रोइंट्रॉलॉजी | न्यूरॉलॉजी | गायनॅकोलॉजी |

**राज्य सरकारद्वारे मान्यताप्राप्त हॉस्पिटल**

- महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY)
- ECHS, ESIC, MPKAY, MSRTC
- CGHS Dispensary (सीजीएचएस डिसपेन्सरी)
- प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (PMJAY)


**विविध करार**

● 'न्यू इंडिया अॅश्युरन्स कंपनी ● ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी ● नॅशनल इन्शुरन्स कंपनी ● युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी ● स्टार हेल्थ इन्शुरन्स ● ICICI लोम्बार्ड हेल्थ इन्शुरन्स ● रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी ● SBI जनरल इन्शुरन्स ● आदित्य बिर्ला हेल्थ इन्शुरन्स ● फ्युचर जनरली हेल्थ इन्शुरन्स ● बजाज अलियान्झ हेल्थ इन्शुरन्स ● NIVA BUPA हैल्थ इन्शुरन्स

कालिदास कलामंदिराजवळ, शालिमार, नाशिक
www.shreesaibabaheartinstitute.com

☎ (0253) 2507001
मो. 9158887554

संपूर्ण कार्डियाक हेल्थ चेकअप प्लॅन रु. ३०००/-




● जाहिरातीसाठी सुयोग्य जागा ● प्रशस्त पार्किंग ● दोन्ही बाजुंनी व्ह्यू असलेल्या बाल्कनीज

अधिक माहितीसाठी कॉल करा
7030 681 681 / 7030 800 666

साईट अॅड्रेस: पार्कसाईड बिझनेस एव्हेन्यू, गुरु गोविंद सिंग स्कूल व कॉलेज शेजारी, इंदिरा नगर अॅनेक्स, नाशिक - ४२२०१०

www.parksyde.com
RERA REGISTRATION NO. P51600010594
For more details: https://maharera.mahaonline.gov.in



# उद्योजकांच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्नं!

## निखिल पांचाल, अध्यक्ष, आयमा, नाशिक

सर्वश्री निखिल पांचाल आणि अरविंद पांचाल हे नाव नाशिकच्या उद्योग समूहाला नवीन नाही. मूळचे गुजरात आणि त्यानंतर मुंबईकर असलेले श्री अरविंद पांचाल हे 1979 मध्ये नाशिकला आले. सुरुवातीपासूनच ते टेक्स्टाईल उद्योगात होते नाशिकला येण्यापूर्वी जवळपास 100 वर्ष त्यांनी टेक्स्टाईल मध्ये काम केले आपल्या उद्योगाच्या विस्तारासाठी मुंबईत त्यांच्यासमोर जागेचा प्रश्न निर्माण झाला परिणामी ते नाशिकला आले आणि नाशिकला जागेचा शोध घेत आपल्याला आपल्या मुळ व्यवसायात नवे काही करता येईल का याचा शोध घेणे श्री. अरविंद पांचाल यांनी सुरू केले आणि त्यांच्या प्रयत्नांना यश आले 1984 मध्ये त्यांना नाशिक येथील अंबड औद्योगिक वसाहतीत उद्योगासाठी भूखंड मिळाला.

आपल्या कारखान्यात प्रारंभी प्लॅस्टिक आणि जूटच्या धाग्याची ते निर्मिती करत, त्यात अत्याधुनिक यंत्रसामुग्रीयुक्त तसेच मॅन्युअली पद्धतीचा अवलंब केला जात असे, परंतु पुढे या व्यवसायात सेटबॅक आला म्हणून त्यांनी मशीन गिअरचे उत्पादन सुरू केले. गिअरच्या बाबतीतही त्यांचा मार्शल हाच ब्रँड कायम राहिला.

श्री. निखिल पांचाल यांनीही यंत्र अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले असून सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगचाही पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे. फर्निचर एक्सपोर्ट आणि सॉफ्टवेअरमध्ये श्री निखिल यांना करिअर करायचे होते परंतु इसवी सन 2000 मधील वाय टू के इशूमुळे त्यांनी सॉफ्टवेअर इंडस्ट्री मधून माघार घेतली आणि पुन्हा पूर्णपणे यंत्र अभियांत्रिकीशी निगडित गिअर उत्पादनात त्यांनी त्यांचे लक्ष केंद्रित केले. स्वत: उद्योगात आल्यानंतर श्री निखिल पंचाल यांनी आपल्या परंपरागत उद्योगाला अत्याधुनिक करण्यावर लक्ष केंद्रित केले आणि साधारणत: पंधरा वर्षांपूर्वी त्यांनी आपल्या प्रकल्पात सीएनसी मशीन आणले ही नाशिकच्या औद्योगिक क्षेत्रातील मोठी घटना होती.

आपली उत्पादने ते सध्या एकूण पाच देशांमध्ये निर्यात करीत आहेत उद्योगाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला असला तरी पंचाल कुटुंबियांनी आपले सामाजिक कार्य सोडून दिले नाही सामाजिक बांधिलकी कायम ठेवली आणि म्हणूनच उद्योजकांचेही नेतृत्व करण्यासाठी श्री निखिल पांचाल हे पुढे आले. सध्या ते आयमाचे अध्यक्ष आहेत आणि आयमाचे अध्यक्ष म्हणून अतिशय भरीव कामगिरी पार पडत आहेत आयमाचे अध्यक्ष म्हणून उद्योजकांच्या




प्रशिक्षण आणि तंत्रज्ञान विकासावर ते भर देत आहे त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी चार महिने मुदतीचा एक्सपोर्ट ओरिएंटेड प्रमाणपत्र अभ्यासक्रम विकसित केला या अभ्यासक्रमातून उत्तीर्ण झालेले उद्योजक नाशिकमधून मोठ्या प्रमाणावर त्यांच्या उत्पादनांची निर्यात करू लागतील असा आशावाद श्री निखिल पांचाल यांना आहे. याशिवाय उद्योजकांचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले आहे. उद्योजकांचे प्रश्न सोडविण्यात विशेष म्हणजे आयमाच्या माध्यमातून उद्योजकांचे नेतृत्त्व करणारी सर्व तरुण मंडळी आहे. त्यात सर्व श्री वरुण तलवार, ललीत बुब, जगदिश पाटील, आणि स्वत: निखिल पांचाल यांचा समावेश आहे, ही उद्योजकांची नवीन पिढी आपला उद्योग समर्थपणे सांभाळत, आणि त्याचा विस्तारही करत उद्योजकांच्या समस्या सोडविण्यासाठी हिरिरिने प्रयत्नशील आहे. औद्योगिक वसाहतीचा विस्तार व्हावा म्हणूनही प्रयत्नशील आहे हे येथे नमूद करावेसे वाटते. त्यात वाढीव दराचे कर आकारणी हा कळीचा मुद्दा आहे आणि त्या प्रयत्नात त्यांना चांगले यश मिळत आहे.

गोरख पगार

ASHOKA

Ashoka Buildcon Limited

**www. ashokabuildcon.com**





**रेसवेरा वाईन्स् ची टीम वरीष्ठ अधिकारी डॉ. निरज अग्रवाल, कोमल सोमानी, निखिल खोडे, अजॉय शॉ, प्रविण गामणे, अजिंक्य पावसकर, पुष्पक पेखळे, सारंग वैद्य आदि.**



निरज अग्रवाल

# रेसवेरा

# जांभळापासून वाईन निर्मिती रानावनातील हातांना काम !



निखिल खोडे

वाईन उद्योगाच्या दृष्टीतून नाशिकमध्ये एक महत्त्वपूर्ण घटना घडली आणि ती म्हणजे जांभळापासून वाईनची निर्मिती. जांभळापासून वाईन अस्तित्वात आली आणि ती लोकांपर्यंत पोहचली त्यामुळे आधीच महत्त्वपूर्ण असणाऱ्या जांभूळ फळाचे महत्त्व आणखी वाढले. जांभळाच्या शेतीला आणि जांभळाच्या संगोपनाला महत्त्व मिळाले. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आदिवासी भागात रोजगार उपलब्ध झाला. आणि त्याचे श्रेय जाते ते "रेसवेरा" ला. या वाईनरीचे संस्थापक यांना! एक सामाजिक बांधिलकी म्हणून त्यांनी हा उपक्रम हाती घेतला आणि इतिहासाचे सुवर्णपान लिहिले गेले. कारण नाशिकला आकार घेतलेली ही जगातील पहिली घटना आहे. जांभळापासून वाईन बनविणारी ही जगातील पहिली वाईनरी आहे. आंतरराष्ट्रीय किर्तीचे डॉ. निरज अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कल्पक नेतृत्वाखाली या वाईन्सची निर्मिती होत आहे. श्री. डॉ. निरज अग्रवाल यांनी नाशिक येथीलच मोठ्या वाईन उद्योगात काम पाहिले. या मोठ्या वाईन उद्योगाच्या यशात त्यांचाही महत्त्वपूर्ण सहभाग आहे.

जांभूळ वाईन्सचे आरोग्यविषयक महत्त्व जाणून घेतल्यानंतर श्री, निखिल खोडे आणि सीईओ डॉ. निरज अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली तब्बल अडीच लाख लिटर्स वाईन्सची निर्मिती झाली.

'रेसवेरा' चे सीईओ डॉ. निरज अग्रवाल व प्रवर्तक निखिल खोडे म्हणाले, "जांभूळ फळ आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. परंतु द्राक्ष फळासारखी शेती जांभळाची होत नाही. अद्याप जांभुळाची शेती असंघटित स्वरूपात आहे. जांभूळ फळ आदिवासी भागात दिसते आणि मुख्यत: आदिवासी भागातील शेतकरी थोड्याफार प्रमाणात जांभुळाची विक्री करतात. फळ नाशवंत असल्याने पीक बरेचसे वाया जाते. पण औषधी गुणधर्म खूप आहेत. नेमके हेच हेरून आणि पिकाच्या संवर्धनसाठी तसेच आदिवासी भागातील शेतकरी, महिलांना रोजगार मिळावा म्हणून आणि परिस्थितीची निकड म्हणून आम्ही जांभळापासून वाईन निर्मितीचा निर्णय घेतला. प्रथम आम्ही प्रायोगिक पद्धतीने वाईन बनविली. तिचे गुणधर्म आणि उपयुक्तता लक्षात घेऊन तसेच वाढती मागणी पाहता व्यापारी पद्धतीने आणि मोठ्या प्रमाणावर जांभळापासून वाईन निर्मितीचा निर्णय घेतला. मोठ्या प्रमाणावर जांभूळ मिळविणे आमच्यासाठी आव्हान होते. त्यासाठी आम्ही बचत गटांना संघटीत केले. त्यांचेमार्फत जांभळे उपलब्ध केली. जांभूळ लागवडीला प्रोत्साहन दिले आणि त्या माध्यमातून जवळपास १००० लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. जांभुळाची वाईन आरोग्यासाठी इतर वाईन्सच्या तुलनेत अधिक उपयुक्त आहे. ती पूर्णपणे भारतीय बनावटीची आहे. आणि जांभूळ पीक शतप्रतिशत ऑरगॅनिक आहे. वनजमिनींची उपयुक्तता वाढली आहे. आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. असेही डॉ. निरज अग्रवाल व निखिल खोडे यांनी सांगितले.

✍ गोरख पगार

VIRAJ ESTATES
BEYOND TRUST

THE EXCHANGE

## AB NASHIK ROAD KA KHAZAANA HOGA AAPKE BUSINESS KA THIKAANA

Ground Floor
Shops Starting @ ₹ 35 Lac

First Floor
Shops Starting @ ₹ 11 Lac











+91 8551 900 900

The Exchange, Near Bytco Hospital, Opp. Muktidham Temple,
Deolali Road, Nashik Road, Nashik - 422214

www.virajestates.com
maharera Number : P51600031795

Disclaimer : The contents of this advertisement are purely conceptual and have no legal binding on the developer. The developer reserves the right to amend the plans, specifications and offers without prior notice.

# शेतीनिष्ठ उद्योग आणि उपक्रमशीलता

गोरख पगार

जिल्ह्यातील प्रत्येक वाईनरीचे वेगळे वैशिष्ट्य आहे. परंतु त्यातही सुखद बाब अशी की शेतकरी आणि मराठी माणूस कारखानदार झालेला दिसला, जे स्वप्नं अनेकांनी कित्येक वर्ष डोळ्यात सामावलं होतं ते प्रत्यक्षात आलं; वाईन उद्योगामुळे हे घडलं आणि मराठी पाऊल आणखी एका क्षेत्रात पुढे पडलं... पुढे हा एक कारवा होण्याची शक्यता आहे. आणि पुन्हा एकदा मराठ्यांचे झेंडे अटकेपार फडकण्याची शक्यता आहे. शेती हा मराठी माणसाचा प्राण आहे. परंतु ती जर व्हॅल्यू ॲडेड किंवा मूल्यवर्धित केली नाही तर मराठी माणूस किंवा शेतकरी जेथे दिसतो तेथेच थांबलेला दिसेल. अपरिमित कष्ट करूनही वैभव त्याच्या वाट्याला येऊच शकणार नाही. परंतु वाईन उद्योगाने आणखी एका क्रांतीला सुरुवात करून दिली आहे. सुरुवातीला काही शेतकऱ्यांनी एकत्र येऊन या उद्योगाचं धाडस केलं. परंतु सहकारी पद्धतीत असा प्रयोग यशस्वी होऊ शकत नाही हे अनुभवलं आणि खासगी क्षेत्रातही यश मिळवणे कठीणच असा अनुभव आला. या परिस्थितीत स्थापत्य अभियंता सुरेश देशमुख यांनी केलेले प्रयोग आणि ए.डी. वाईन्सची स्थापना या उद्योगातील एक विलक्षण घटना ठरली आहे. अत्यंत सुरेख, सोईच्या ठिकाणची, निसर्गरम्य परिसरातील, आणि वाईनच्या द्राक्षांच्या बाबतीत स्वयंपूर्ण अशी ही वाईनरी आहे. नाशिक दिंडोरी रस्त्यावर दिंडोरी गावाच्या अलिकडे ५ कि.मी. अंतरावर दिंडोरीकडे जाताना रस्त्याच्या उजव्या बाजूला इतिहासप्रसिद्ध रणतळे येथे मुख्य रस्त्यापासून जवळच



सुरेश देशमुख

असलेली ही वाईनरी निसर्ग प्रेमींचे लक्ष वेधून घेतल्याशिवाय राहत नाही. सापुतारा किंवा इतर ठिकाणच्या सहलीस आपण जात असाल तर ए.डी. वाईन्सला भेट देणे सोपे आहे. वाईन उद्योगाच्या बाबतीत, नाशिकमधील एक टुमदार प्रकल्प म्हणून



ए.डी. वाईन्सचे वर्णन करावे लागेल. सर्वच बाबतीत पद्धतशीर. वर्षाला ५ लाख लिटर वाईन निर्मितीची या वाईनरीची क्षमता आहे. एकूण पाच प्रकारच्या वाईन्स वाईनरीने बाजारपेठेत आणल्या. त्यात शेनीन, शिराज, कॅबरने, झिन फंडेल आणि सॉव्हिनॉन या वाईन्सचा समावेश आहे.

श्री. देशमुख हे शेतकरी कुटुंबातील. वडिलोपार्जित शेतीचे क्षेत्रही तसे कमीच. अवघे ४ एकर, पण स्वबळावर त्यांनी ते क्षेत्र ४० एकर पर्यंत वाढवले. त्यात काही क्षेत्रात आंबा तर ३२ एकराहून अधिक क्षेत्रात विनियार्ड केले आहे. दिंडोरी परिसरात उत्तम येत असलेल्या कॅबरने, शिराज, शेनीन आणि झिनफंडेल या व्हरायटींची लागवड त्यांनी केली. आणि स्वत:च्या बळावर वाईनरीची उभारणी केली. याकामी उमाकांत धोंडगे व श्री. चारोस्कर यांचीही - मदत व मोलाचे मार्गदर्शन झाल्याचे श्री. देशमुख यांनी सांगितले. देशमुख कुटुंबिय शेतकरी असले तरी उच्च शिक्षित आहे. भाऊ विलास देशमुख डॉक्टर असून पत्नी सौ. छाया देशमुख शिक्षिका आहेत. त्यांचे चिरंजीव अमित देशमुख यांनी नुकतीच स्थापत्य अभियांत्रिकीची पदवी घेतली आहे. उद्योग व्यवसायाबरोबरच सामाजिक कार्यातही सुरेशदेशमुख यांना रुची आहे. दिंडोरी शहर शिवसेना प्रमुख म्हणूनही ते काम पाहत असून, विविध सामाजिक उपक्रमांतही त्यांचा हिरिरिने सहभाग असतो. याशिवाय उद्योगाची कोणतीही परंपरा नसताना सुरेश देशमुख यांच्यासारखे तरुण उद्योग व्यवसायात येण्याचे धाडस करुन त्यात यशस्वी होण्यासाठी धडपड करतात ही बाब महाराष्ट्रासाठी आणि तरुण पिढीसाठी प्रेरणा देणारी ठरली आहे.


RAVI AMRUTKAR
B.E. (Civil) M.I.E., F.I.V.
CONSULTING ENGINEERS
BUILDING PLANNERS
DESIGNERS & VALUERS
OFFICE :
Yeolekar Mala Road,
Near Shraddha Petrol Pump,
College Road, Nashik.
☎ Off.: 2571589
E-mail : r.amrutkar.asso@gmail.com


With Best Compliments...
अधिक माहिती आणि बुकिंगसाठी संपर्क :
गुरुकृपा
बिल्डर्स
कार्यालय :
श्री गुरूकृपा संकुल, मुंबई-आग्रा हाय-वे,
कॉलेजजवळ, पिंपळगाव (ब.), ता. निफाड
जि. नाशिक फोन : २५५०-२५०६७८
E-mail : gurukrupabuilder@gmail.com
Web : www.srigurukrupabuilders.com
अधिक माहितीसाठी संपर्क :
नयनेश संघवी
9975560006



# डॉ. रुमि धन पटेल




एन डी पटेल रोड, नाशिक येथील अहुरा मॅटर्निटी आणि सर्जिकल हॉस्पिटल हे नाशिक मधील एक नामांकित हॉस्पिटल आहे. अतिशय सुस्भावी आणि कर्तव्यनिष्ठ डॉक्टर म्हणून श्री रुमि धन पटेल आणि त्यांच्या सौभाग्यवती नीना पटेल यांच्याकडे पाहिले जाते.

श्री. रुमि धन पटेल यांना त्यांचे वडील श्री. धन पटेल यांच्या सामाजिक कार्याचा वैभवशाली वारसा लाभलेला आहे. हे कुटुंब केवळ आरोग्यसेवाच नाही तर समाजकार्यातही अग्रेसर राहिले आहे. समाजाच्या विविध क्षेत्रात धन पटेल यांनी त्यांच्या कार्याचा ठसा उमटवला. विशेषत: सहकार आणि बँकिंग क्षेत्रात त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडली. त्यांच्या संस्कारामुळेच डॉ. रूमीधन पटेल हे ही उत्कृष्ट अशी निष्णात स्वरूपाची आणि सामाजिक बांधिलकी असलेली वैद्यकीय सेवा सर्व समाजाला पुरवित आहेत.

अहुरा मॅटर्निटी आणि सर्जिकल हॉस्पिटल एन डी पटेल रोड, नाशिक येथे आहे. वंध्यत्व निवारण सेवा या हॉस्पिटलमार्फत दिली जाते नुसते, वंध्यत्व निवारणच नाही तर गरोदर स्त्रियांची काळजी, सुखरूप बाळंतपण आणि बालकाचे संगोपन आदि सर्वच सेवा प्रारंभापासून तर अखेरपर्यंत आहुरा मॅटरनिटी आणि नर्सिंग होम मध्ये दिल्या जातात. अशा प्रकारची सेवा देणारे हे नाशिक मधील अत्यंत महत्त्वपूर्ण असे आणि शहरात मध्यवर्ती ठिकाणी असलेले सर्व सोयींनीयुक्त असे हॉस्पिटल आहे. आरोग्यसेवा विकसित करण्यात रुग्णालयांची मोठी भूमिका असते कारण, वाढत्या लोकसंख्येसह, आरोग्य सेवांच्या मागण्याही वाढत असतात या दृष्टीतून अहुरा मॅटरनिटी आणि नर्सिंग होमची सेवा महत्त्वपूर्ण ठरली आहे. उत्तर महाराष्ट्रात हे हॉस्पिटल उल्लेखनीय सेवांमुळे आणि डॉक्टर पटेल यांच्या कौशल्यामुळे सर्वत्र ओळखले जाते आणि नावारूपाला आलेले आहे.

अहुरा मॅटरनिटी आणि नर्सिंग होममध्ये अनेक प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. त्यासाठी अत्याधुनिक अशी यंत्रसामुग्री या हॉस्पिटलमध्ये उपलब्ध करण्यात आलेली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अत्यंत विश्वासार्हता असलेले हे हॉस्पिटल आहे. सुखद प्रसूती, सुखद प्रसूतीसाठी उपचार आणि प्रसूती नंतरचे उपचार हा महिलांचे बाळंतपण आणि बाळंतपणानंतरच्या समस्या हा अतिशय महत्त्वाचा आणि कळीचा मुद्दा आहे. आहुरा मॅटरनिटी आणि नर्सिंग होममध्ये या सर्व बाबींवर निराकरण करण्यात आहुरा मॅटरनिटी नर्सिंग होमने यश संपादन केले आहे.

नाशिकमधील अहुरा मॅटर्निटी अँड सर्जिकल हॉस्पिटलमध्ये सहाय्यक आणि मैत्रीपूर्ण वागणूक देणारे कर्मचारी आहेत. आणि त्यांना रुग्णांना कशी मदत करावी याचे नवीनतम वैद्यकीय ज्ञान आहे. क्लिनिक सर्व आवश्यक सुरक्षा, प्रोटोकॉलचे पालन करते, ज्यात कोविड-19 खबरदारीच्या उपायांचा समावेश आहे. डॉक्टर आणि टीम जागतिक दर्जाची काळजी आणि मार्गदर्शन देतात, नेहमी त्यांच्या रुग्णांना प्राधान्य देतात. प्रसूती समस्यांवर उपचार, गर्भधारणेतील आजारांवर उपचार इत्यादी सेवा देखील येथे दिल्या जातात, त्यामुळे पेशंटच्या सर्व गरजा एकाच ठिकाणी पूर्ण केल्या जातात.

गोरख पगार

# प्रतिकुलतेच्या भीषण वास्तवातून उमलते उद्योजकतेचे पुष्प !




कैलास देवरे

नाशिक शहरामध्ये स्वप्नवत वाटावा असा बंगला, ३५ ते ४० लोकांना प्रत्यक्ष रोजगार, अतिशय कल्पक वित्तीय व्यवस्थापन, दरवर्षी उद्योगाचा व्याप वाढतोय आणि भविष्यात उद्योगाचं मोठं साम्राज्य उभं दिसणार! अनेकांच्या स्वप्नांना असाच आकार असावा असं हे वर्णन आहे, उमराणे (ता. देवळा) येथील युवा उद्योजक कैलास देवरे यांचं ! अवघ्या पस्तिशीतच कैलास देवरे यांनी केवळ अविश्वसनीय आणि अनेकांसाठी अनुकरणीय स्वरुपाचं यश मिळवलं. उद्योजक कसा घडतो ? का घडतो ? उद्योगात यशस्वी होण्यासाठी कोणती पात्रता असावी लागते ? या प्रश्नांची उत्तरं कैलास देवरे यांच्या व्यक्तिमत्त्वात सापडतात. ठरवून उद्योजक होता येत नाही. उद्योजकतेत शिक्षणाची भूमिका फार महत्त्वाची असत नाही. उद्योगात यशस्वी होण्यासाठी, कौटुंबिक पार्श्वभूमी उद्योगाची असावी लागते असंही नाही. पण असावी लागतात ती स्वप्नं त्यासाठी आवश्यक ते धाडस, जोखिम स्विकारण्याची तयारी, उद्योगास पोषक वातावरण आणि माणसं सांभाळण्याचा गुण. या गोष्टी कैलास देवरे यांना यशाकडे घेऊन गेल्या आणि प्राप्त प्रतिकूल परिस्थिती त्यांना वरदान ठरली. अडचणींचे संधीत रुपांतर करणारा हा उद्योजक!

उमराणेत एका गरीब शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. मोठा परिवार आणि शेती अत्यल्प म्हणून वडील रामदास देवरे यांना दुसऱ्यांच्या शेतातही काम करावं लागत असे. पुढे उदरनिर्वाहासाठी त्यांना गुजरातमध्ये जावे लागले. तेथेच काही काळ ते स्थायिक झाले. एकदा गावाकडून बसने गुजरातला जाताना गाडीला मोठा अपघात झाला. देवरे कुटुंबियांच्या जीवावर बेतले. गंभीर जखमा झाल्या. अपघातानंतर दवाखान्यात कसे जायचे? हा प्रश्न निर्माण झाला. पण एस.टी. बसच्या कर्मचाऱ्यांनी थोड्या प्रतिक्षेनंतर या जखमींना रुग्णालयात नेऊन त्यांचेवर उपचार सुरू केले. अपघातानंतर अर्थातच महामंडळ आर्थिक मदतही करणार होते आणि काही दिवसांनी ती झाली. या मदतीच्या माध्यमातून देवरे कुटुंबियांनी उमराणे गावात थोडी शेती घेतली आणि गावातच देवरे कुटुंबिय आपला चरितार्थ भागवू लागले. कैलास देवरे यावेळी लहान होते. उमराणे गावातच त्यांनी एस.एस.सी. व एच. एस. सी. पर्यंतचे शिक्षण घेतले. बारावीनंतर अवघ्या एकदोन गुणांच्या फरकाने त्यांचा मेडिकलचा (एम.बी.बी.एस.) प्रवेश हुकला. बी.ए.एम.एस. साठी प्रवेश मिळाला पण त्यासाठीचा शैक्षणिक खर्च परवडणारा नव्हता. अखेरीस लवकर कमवते व्हावे या उद्देशाने कैलास देवरे यांनी डी. एड. ला जाणे पसंत केले. डी. एड. झाल्यानंतरही लवकर नोकरी मिळणे दुरापास्त झाले. अखेरीस कैलास देवरे यांनी स्वदेशीचे काम सुरू केले. पण त्या व्यवसायातही खोटी प्रतिष्ठा मिरवावी लागते असे त्यांच्या निदर्शनास आले. तेथे व्यवसायाचा भाग म्हणून घेतलेली इंडिका कार अपघातग्रस्त झाली. दुरुस्तीसाठी गॅरेजमध्ये नेली पण बरेच दिवस गॅरेज मालक व देवरे यांच्या अडचणींमुळे कार तशीच पडून राहिली. अखेर देवरे यांनीच ते गॅरेज भाडे तत्त्वावर चालवायला घेतले. हा व्यवसायाचा प्रारंभ होता. आज श्री. देवरे स्वत:चा मोठा ऑटोमोबाईल व्यवसाय चालवित आहेत. नाशिक शहरासह संपूर्ण जिल्ह्यात ऑटोमोबाईल सेवा उद्योगाची साखळी निर्माण करावयाचा संकल्प त्यांनी केला आहे.

गोरख पगार



# गुणवत्ता आणि कल्पनांचे वास्तव...
# अविनाश शिरुडे...

गोरख पगार



अविनाश शिरुडे यांनी वैशिष्ट्यपुर्ण बांधकाम आणि इतरांच्या तुलनेत काही गोष्टी प्रथमच नाशिकमध्ये आणल्या. कारण प्रचंड सृजनशिलता (क्रिएटिव्हिटी) हे अविनाश शिरुडे यांच्या व्यक्तीमत्वाचे वैशिष्ट्य. १९८५ मध्ये विशेष प्राविण्यासह बी.एस्सी. उत्तीर्ण झाल्यानंतर पुण्यात मेव्हणे किशोर पाटे यांच्याकडे त्यांनी बांधकाम व्यवसायाचे धडे गिरवले. त्यानंतर पुण्याचेच बिल्डर श्री. जावडेकर यांच्याकडे केवळ अनुभवासाठी त्यांनी बिनपगारी नोकरी केली. कारण नोकरी करायचीच नाही, हा त्यांचा लहानपणापासूनचा निर्धार. स्वत:च्या बांधकाम व्यवसायात त्यांनी १९८७ मध्ये प्रवेश केला. परंतु खरी सुरुवात झाली ती १९९० पासून. त्यानंतर १० वर्षात कॉलेजरोड आणि गंगापूररोड सारख्या अत्यंत पॉश लोकेशनमध्ये त्यांनी अनेक प्रकल्प पूर्ण केले. जिना हा कमीतकमी तीन फूट ठेवावा हा मनपाचा नियम असताना श्री. शिरुडे यांनी त्यांच्या बांधकामात तो चार फुटी ठेवला. आणि सहा इंच वीट ही तर शिरुडे यांची नाशिककरांना देणगीच म्हणावी लागेल. या वीटचे बांधकाम नाशिक शहरात प्रथम शिरुडे यांनीच केले आणि नंतर सर्वत्र तिचा वापर सुरू झाला. त्यामुळे खर्च कमी होऊन कारपेट एरिया वाढला.



## पार्कीगची दुरदृष्टी

२० वर्षापूर्वी पार्कीगचा प्रश्न फार मोठ्या प्रमाणावर नाशिकला भेडसावत नव्हता. परंतु तेव्हाही अगदी निवासी प्रकल्पांनाही श्री. शिरुडे यांनी अर्थात रोहन एन्टरप्राईजेसने पार्कींगची सुविधा ठेवली.

## यश कशामुळे?

चांगले संस्कार आणि डोळ्यांसमोर काही आदर्श ठेवले, व्यवसायाशी पुर्ण निष्ठा, त्यासाठी समर्पित भाव, कठोर परिश्रमांची तयारी आणि कुटुंबियांचा सर्वांचा एकदिलाने सहभाग हे रोहन एन्टरप्राईजेस यांच्या यशाचे प्रमुख कारण ठरले. श्री. अविनाश शिरुडे हे अत्यंत बुद्धिमान आणि हजरजबाबी व्यक्तिमत्व. बांधकाम व्यवसाय गुणवत्तापूर्ण सुविधांच्या बळावर चालतो असे ते मानतात. आणि त्यांनी सतत स्वत: अभ्यास करीत अत्यंत चांगले प्रयोग केले. बालपणापासूनच अत्यंत चांगले संस्कार हे श्री. अविनाश शिरुडे यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्यं. ते मूळचे नगरदेवळा (जि. जळगाव) येथील. नगरदेवळा हे एक चांगले बाजारपेठेचे गाव. तेथे वडिल श्री. रामचंद्र दशरथ शिरुडे यांचा शेतीचा व्यवसाय. वडिल उच्च विद्याविभूषित. अत्यंत अभ्यासू व्यक्तिमत्व, एस. एम. जोशी, भाई वैद्य आदी पारदर्शक व्यक्तिमत्वांचा सहवास त्यांना लाभला. गावात अनेक सामाजिक उपक्रम त्यांनी राबविले. विशेषत: ग्रंथालये. नगरदेवळा येथील त्यांच्या वाचनालयात अत्यंत दुर्मिळ पुस्तके उपलब्ध आहेत. कोणतेही चांगले पुस्तक बाजारात आले की, ते वाचनालयासाठी मागवायचे हा त्यांचा परिपाठ. या व्यासंगी वृत्तीमुळे मुलांवर ते अत्यंत चांगले संस्कार करू शकले.

सतत चांगले काम करून समाधान मिळविणे ही त्यांची वृत्ती. चांगले काम झाले नाही तर समाधान आणि ते समाधान (जॉब सॅटिसफॅक्शन) मिळाल्याशिवाय स्वास्थ्य नाही. या तत्वामुळे त्यांचे यश नक्की होत गेले.

प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून, अविनाश शिरुडे यांची कारकीर्द नाशिक शहर, समग्र बांधकाम व्यावसायिक, सदनिका विकत घेणारा ग्राहक आणि काही बाबतीत प्रशासकीय पातळ्यांवरही महत्वाची आणि अविस्मरणीय ठरली. त्यांच्या त्या कार्याची अनेक मधूर फळे वर उल्लेख केलेल्या सर्वांनाच चाखावयास मिळणार आहेत. त्याचा ओझरता उल्लेख करावयाचे ठरविल्यास खालील बाबी स्पष्टपणे नजरेत भरतात.

### नाशिक शहरासाठी योगदान

श्री. अविनाश शिरुडे यांच्या रोहन बिल्डर्सने निर्माण केलेला

प्रत्येक वास्तूप्रकल्प नाविण्यपूर्ण आहे. प्रत्येक प्रकल्पात त्यांनी नवीन केले. आणि काहीतरी नाविण्यपूर्ण दिले. या इमारतींनी शहराच्या सौंदर्यात भर घातलीच पण इतर व्यावसायिकांनाही त्याची दखल घ्यावी लागली. बांधकामे करतांना सुंदर वास्तुची निर्मिती, नाविन्यता, ग्राहकाला सर्वोच्च समाधान, त्याच्या पैशाला मोल आणि त्यात तसेच बांधकाम व्यावसायिकांत विश्वासार्हता प्रस्थापित होईल यास त्यांनी सर्वाधिक प्राधान्य दिले. असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून, ग्राहक व व्यावसायिकांतील विश्वासार्हता वाढीस लागावी, त्यातील दरी कमी व्हावी म्हणून त्यांनी मोठ्या प्रमाणावर ग्राहकाला शिक्षित करण्याचा उपक्रम राबविला. त्यासाठी आकाशवाणी, दूरदर्शन, छपाई माध्यम व शेल्टर सारख्या प्रदर्शनाचा प्रभाविरित्या वापर केला. त्याचबरोबर विविध चर्चासत्रे व प्रशिक्षण कार्यक्रम राबवून बांधकाम व्यावसायिकांनाही शिक्षित केले. त्यामुळे बांधकाम व्यावसायिकात मोठ्या प्रमाणावर बदल झाला. मुंबई, पुणे खालोखाल नाशिक शहराचे महत्व आहे, त्या दृष्टीनेच ते विकसित व्हावे आणि पुण्याइतके महत्व नाशिक शहराचेही वाढावे म्हणून ते हिरिरिने प्रयत्नशिल आहेत. त्याचसाठी बारा माळ्याच्या इमारतींना परवानगी मिळावी म्हणून त्यांनी प्रयत्न केले. आणि त्यास शासकीय मंजुरी मिळविली. आता बहुमजली इमारतींचे शहर म्हणून नाशिकची ओळख होईल. श्री. शिरुडे यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत शहराला मिळालेली ही देणगी ठरली.



शरणपूर गावठाणातील प्रॉपर्टी हस्तांतरणाचा प्रश्नही या संदर्भात महत्त्वाचा आहे. येथील मिळकत धारकांना ती हस्तांतरीत करता येत नव्हती. त्यासाठी श्री. शिरुडे यांनी प्रशासकीय पातळीवर हिरिरीने पाठपुरावा केला आणि अखेरीस त्यांना त्यात यश आले. तळेगाव दाभाडे पॅटर्न प्रॉपर्टी धारकांचा प्रश्नही त्यांनी यशस्वीपणे हाताळला आणि संबंधितांना न्याय मिळवून दिला. सर्वात महत्वाचे म्हणजे शहर सर्व बाजूंनी सारखेच विकसित होईल, विकासाचे विकेंद्रीकरण होईल यासाठी श्री. अविनाश शिरुडे प्रयत्नशील आहेत. आता त्यांना त्यांच्या व्यवसायात पत्नी सौ. सुनिता शिरुडे आणि दोघं उच्च विद्या विभूषित मुले चि. अमेय व चि. रुचिक मोलाचा सहभाग देत आहेत. भविष्यात अनेक चांगले प्रकल्प रोहन एन्टरप्रायजेसमार्फत राबविले जातील यात शंका नाही.




# नाशिकमधील यशस्वी टाऊनशीपचे निर्माते ! : मनोज टिबडीवाल







**नाशिक शहरात अलिकडच्या काळात टाऊनशिप्सच्या माध्यमातून दिसलेला बदल, शहराला पुणे आणि नंतर बंगलोर सारखाच विकसित करण्यास कारणीभूत होणार आहे. गरज आहे ती शहराचे पोटेन्शियल ख्यातनाम उद्योगपतींपर्यंत पोहचविण्याची. जेणेकरून फक्त इको- फ्रेंडली इंडस्ट्री येथे येऊ शकेल आणि शहराचा विकास नैसर्गिक पद्धतीने होऊ लागेल.**

मासिक अर्थ उद्योगने यापूर्वीच्या विशेषांकांमध्ये अनेक मान्यवरांच्या कार्यावर वेळोवेळी प्रकाशझोत टाकला आणि त्याचे कारण पूर्वीची पीबीएएन व आताची क्रेडाई ही संस्था, या संस्थेला या मान्यवरांचे लाभलेले ऐतिहासिक नेतृत्त्व. या सर्व काळात आणि नाशिक शहर, उद्याची मेट्रोसिटी म्हणून उष:काल पाहत असताना, बांधकाम क्षेत्रातील आणखी एका तेजाचा उदय झालेला पाहत आहे, तो मनोज टिबडीवाला यांच्या रुपाने! मनोज टिबडीवाला यांच्या पार्कसाईड या गृहनिर्माण प्रकल्पामुळे नाशिकमधील टाऊनशीप्स ग्राहकांचे मुख्य आकर्षण असणार आहेत.

पार्कसाईड या टाऊनशीपसाठी निवडण्यात आलेले लोकेशन, त्याचे भौगोलिक स्थान, सभोवतालचा निसर्गरम्य परिसर आणि पार्कसाईड प्रकल्पात उपलब्ध होणाऱ्या इतर सुविधा शहरातील एक नवी समृद्ध आणि सुसंस्कारित संस्कृती निर्माण करणाऱ्या ठरल्या आहेत. मनोज टिबडीवाला यांनी आपल्या या विविध प्रकल्पात नंदनवनातील घरकुलाचे स्वप्न पाहणाऱ्या ग्राहकास अगदी भरभरून दिले आहे. जे यापूर्वी नाशिकमधील अगदी थोड्या टाऊनशिप्समध्ये आणि फक्त पुणे, मुंबई व बंगलोरच्या टाऊनशीपमध्ये दिसले आहे.



सहज कुणीही प्रेमात पडावे अशीच त्यांच्या टाऊनशीप असतात. मनोज टिबडीवाला हे खरेतर बांधकाम व्यवसायातील जुने नाव. अगदी लहान असतानाच मनोज यांनी वडीलांच्या मार्गदर्शनाखाली बांधकाम व्यवसायात पदार्पण केले. साधारण पंधरा वर्षाच्या काळात श्री. टिबडीवाला यांनी मोजके पण उत्तम आणि आदर्शव्रत प्रकल्प उभारले. या प्रकल्पांतील घरकुलांचे ग्राहक त्यांनी दिलेल्या मूल्याचा विचार करता सर्वाधिक सुदैवी ठरले. श्री. मनोज, समाजकार्यासाठी सुप्रसिद्ध दिवंगत जयकुमार टिबडीवाला यांचे सुपूत्र. सामाजिक कार्याच्या बाबतीत जयकुमार टिबडीवाला यांचे नाव अतिशय मोठे होते. आपल्या आयुष्यात त्यांनी सतत सामाजिक स्वास्थ्य आणि शांतीचा विचार केला होता. महाराष्ट्र पातळीवरील एक आदर्श आणि मोठे घराणे म्हणून टिबडीवाला यांच्याकडे पाहिले जाते. त्यामुळे त्यांचा प्रकल्प जाहीर होणे म्हणजे अनेकांसाठी गृहपर्वणीच ठरते. तसेच पार्कसाईड या प्रकल्पांच्या बाबतीत झाले. सध्या नाशिक शहरात प्रगतीपथावर असलेले पार्कसाईडचे प्रकल्प उत्तम आहेत. सर्वच सुरळीत आणि पारदर्शक व्यवहार म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जाते. प्रकल्पाच्या यशस्वितेसाठी वित्तीयसेवेतील तज्ज्ञ मर्झियन पटेल यांच्यासारखे सहकारी श्री. टिबडीवाला यांनी निवडले आहेत. या प्रकल्पाबाबत अर्थ - उद्योगशी बोलताना श्री. मर्झियन पटेल म्हणाले, पार्कसाईड या प्रकल्पांत अनेक गोष्टी नाविन्यपूर्ण आणि प्रथम स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे माझ्या माहितीनुसार अनेक टाऊनशिप्सच्या तुलनेत ग्राहकांकडून अधिक पसंती मिळत असलेले आमचे प्रकल्प आहेत. प्रकल्प मुळातच निसर्ग सौंदर्याने नटलेल्या स्थळी असल्याने नाशिकच्या नैसर्गिक समृद्धीचा पुरेपूर लाभ आमच्या ग्राहकांना घेता येणार आहे. ज्यांना ते व्हिजन किंवा दृष्टी आहे त्यांनी आमच्या पार्कसाईड प्रकल्पास आपली पसंती दर्शविली आहे.

गोरख पगार

GOGATE
Live Better, Perform Better!

# GOGATE SALES PVT. LTD.

- UPS
- INVERTERS
- STABILISERS



Madhu Sanchay, Dr. Gogate Bldg., Tilak Path, Nashik - 422001.
Ph.: Office : 2508377, 2509377 Factory : 2354777, 2354877

CELEBRATING SANGHVI QUALITY PRODUCTS UBICHEM 27th YEAR IN FARMERS SERVICE ANNIVERSARY 1988 • 2014

- मॅग्नेशिअम सल्फेट
- फेरस सल्फेट
- झिंक सल्फेट
- कॉपर सल्फेट
- मँगेनीज सल्फेट
- बोरॅक्स
- कॅल्शिअम क्लोराईड
- युबी सुपर मिक्स् (ड्रिपसाठी)
- सिक्स् बी.ए.
- सिक्स् बी.ए. सॉल्व्हंट
- युरासील
- युरासील सॉल्व्हंट
- गंधक (सल्फर)
- युबी ॲन्टी सनस्ट्रेस
- युबी बोर्डो मिक्श्चर
- ह्युमिक किंग ५०%
- पी.डी.एच्.

संघवी
क्वालिटी प्रॉडक्टस् प्रायव्हेट लिमिटेड
An ISO 9001 : 2000 company

SINCE - 1988
UBICHEM®
Sanghvi Quality Products

शुद्ध आणि सर्वोत्कृष्ट सुक्ष्म अन्नद्रव्ये व विद्राव्य खतांचे उत्पादक
इंडस्ट्रियल इस्टेट नं. २, बार्शी, जि.सोलापूर ☎ : ९५२१८४-२२३३२४ / २२९२७३
पांडव संकुल, टेलिफोन एक्स्चेंज शेजारी, पिंपळगाव (ब.), जि. नाशिक
फोन : ९५२५५०-२५००२७/२५०११०

SINCE - 1988 ★ IN FARMERS SERVICE ★



''युबीकेमची उत्पादने, सर्वोत्कृष्ट उत्पादने, पिकविल मातीतून सोने''

# वैद्यकीय क्षेत्रातील शिखर सर!

**दंत वैद्यकशास्त्रात विकसित झालेले सर्व आधुनिक तंत्रज्ञान नाशिक शहरांत ऋतडेन्टमध्ये डॉ. संजय भावसार व डॉ. सौ. शैलजा भावसार या अतिशय कर्तबगार डॉक्टर दाम्पत्याने उपलब्ध केले आहे. दंत विकारांनी त्रस्त असलेल्या लोकांनी सुटकेचा निश्वास टाकावा असे.**

**गोरख पगार**



प्रत्येक माणसाचे तारूण्य हे बहधा कष्टात जात असते. उतारवयात काही सुखं प्राप्त होतात. परंतु दात मात्र हिरावून नेलेले असतात ही मानवी जीवनाची एक मोठी शोकांतिका आहे. बऱ्याचदा आरोग्याची गुरूकिल्ली म्हणजे काय हे सांगितले जाते, माणूस निरोगी कसा राहील हेही सांगितले जाते. व्यायाम रोगाला पळवतो असेही म्हणतात, पण हे कटुसत्य आहे, की माणसाला निरोगी दातच नसले तर माणसाच्या शरीराचे चांगले पोषण शक्य आहे काय ? ह्या प्रश्नाचं उत्तर अर्थातच नाही असं आहे. दात हा मानवी शरीराचा सर्वात महत्वाचा घटक आहे. तारूण्यात स्त्री आणि पुरुषांच्या सौंदर्यात भर घालतात ते मोत्यासारखे दातच ! केवळ सुमधूर हसण्यानेच अनेक चित्रपट तारकांनी लाखोंच्या हृदयावर राज्य केलं ! असे हे दात माणसाला फक्त किडीमळे गमवावे लागतात. त्यांतून अगदि लहानांचीही सुटका होत नाही. हे सर्व कटुसत्य असले तरी भाग्याची गोष्टही आहे; आणि ती म्हणजे दातांच्या, रोगावर किडीवर उपलब्ध असलेली हमखास अशी उपचारपद्धती. त्या बाबत झालेले संशोधन तर मानवी जीवनाला अक्षरश: वरदान ठरले आहे. डॉ. संजय भावसार बोलत होते.

किडलेला दात काढून टाकण्या ऐजवी) पर्णपणे वाचवता येतो. दात कुणी काढून टाकला असेल तर नवा दात बसवता येतो. दातांचे व्यंग कोणत्याहीका प्रकारचे असेना पूर्णपणे घालवता येते. तुम्ही स्माईल डिझाईन करू शकता. दातांमधल्या फटी भरू शकता. मध्येच तुटलेला दात पुन्हा पूर्ण करता येतो. आणि इतर व्याधींपासूनही सटका करता येते. आरोग्य क्षेत्रात इतर कोणत्याही बाबतीत झाले नसेल त्यापेक्षा अधिक आणि अतिशय प्रभावी व यशस्वी तंत्रज्ञान दंत शास्त्रात उपलब्ध झाले आहे. गरज आहे ती एवढीच की, नागरिकांनी नवतंत्रज्ञानाची ओळख करून घ्यावी आणि त्यापद्धतीच्या उपचार पद्धतीचा उपयोग करून घ्यावा...



डॉ. आदित्य भावसार / डॉ. कृतिका भावसार

दंत वैद्यकशास्त्रात विकसित झालेले हे सर्व आधुनिक तंत्रज्ञान नाशिक शहरांत ऋतडेन्टमध्ये डॉ. संजय भावसार व डॉ. सौ. शैलजा भावसार या अतिशय कर्तबगार डॉक्टर दाम्पत्याने उपलब्ध केले आहे. दंत विकारांनी त्रस्त असलेल्या लोकांनी सुटकेचा निश्वास टाकावा असे.

दातांचे विकार आणि उपचारांच्या आधुनिक पद्धतीबाबत बोलतांना डॉ. भावसार व सौ. भावसार यांनी सांगितले की, कीड हा दातांचा मुख्य आजार असतो. ती दोन ठिकाणांपासून लागते, एक दाताच्या पृष्ठ भागापासून आणि दुसरी हिरड्यांच्या आत. हिरड्यांच्या आतन कीडीचा प्रादुर्भाव झाला, की हिरड्या ठिसूळ होऊन, रक्त येणे, आणि त्यामुळे त्या कमजोर होऊन दातांचे मूळ कमजोर होणे. कीड पार मांसल भागापर्यंत पोहचणे, आदि गंभीर प्रकार संभवतात. आहार विहाराच्या पद्धती आणि दातांची चांगली स्वच्छता याचा विचार करता शहरांत दात किडीचे प्रकार अधिकतर खेड्यांत हिरड्यांचे आजार अधिक आढळतात.

आता सर्वात महत्वाचा प्रश्न हा की अकाली किडलेले दात कसे वाचवायचे हा? आणि नव्याने दंतरोपण कसे करायचे हा. किडलेल्या दातांवर वेदना विरहीत लेसर शस्त्रक्रिया करता येते. दातांची नसही किडीमुळे निकामी झाली असेल तर त्यात पीन टाकन दात पूर्णपणे वाचवता येतो. तो काढून टाकावा लागत नाही. जे दंतरोग तज्ञ दात



डॉ. ऋतुजा / डॉ. निखिलेश बोरकर




काढून टाका असे सांगतात ते पर्णपणे चकीचे आहे.

दातांचे रोपण ही दंत वैद्य शास्त्रात विज्ञानामुळे झालेली क्रांती आहे. काढून टाकलेला दात किंवा इतर कारणांमुळे पडलेला दात ह्या तंत्राद्वारे नव्याने बसवता येतो. त्यासाठी दाताचे मूळ फक्त असायला हवे. ह्या ठिकाणी वेदनांशिवाय ड्रील केले जाऊन त्यात स्क्रु टाकला जातो आणि त्यावर टायटेनिम धातुचा पुर्णपणे नैसर्गिक दिसतो अशा पद्धतीचा दात बसवला जातो. अर्धे तुटलेले दातही पूर्णपणे लांबवता येतात. नाशिकमध्ये अशा प्रकारचे तंत्रज्ञान डॉ. संजय भावसार व सौ. शैलजा भावसार यांनी उपलब्ध केले. केवळ नाशिकच नव्हेतर संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात फक्त नाशिकलाच ही सुविधा आहे. ह्या दंतरोपण केंद्राला आंतरराष्ट्रीय मान्यता आहे. डॉ. क्राफर्ड आणि डॉ. स्टिव्ह गो ऑन ह्या विदेशी डॉक्टरांच्या सुचनांनुसार ह्या केंद्राची स्थापना झाली. तत्पूर्वी डॉ. भावसार यांनी या संदर्भातील खास प्रशिक्षण १९८९ मध्ये इटलीत जावून घेतले. भारतात इतर वैद्यांसाठीही प्रशिक्षण कार्यक्रम ते घेत असून दिल्लीसारख्या मोठ्या शहरांतून हे काम सुरू आहे. हे दंतरोपण हे मानव जातीला मिळालेले. खरंतर एक वरदान आहे. ह्या तंत्राद्वारे ५० ते ८० वर्ष वयाच्या वृद्धांना देखील संपूर्ण दात बसवता येतात. दातांचे मुळ फक्त असायला हवे, ह्या सर्व प्रक्रियांसाठी आवश्यक असलेले ओपीजी एक्सरे मशीन फक्त डॉ. भावसार यांच्याकडेच आहे. ह्या तंत्रात अत्यंत छोटा कॅमेरा, लेसर तंत्र यांचा उपयोग करून संगणकावर प्रतिमा घेतली जाते. आणि दातांच्या किडीचे संपर्ण ज्ञान होते. त्यांचे चिरंजीव डॉ. आदित्य व स्नुषा कृतिका भावसार उच्चशिक्षित डेन्टीस्ट आहेत. तसेच कन्या डॉ. रुतुजा व जावई डॉ. निखिलेश बोरकर अतिशय उच्च विद्याविभूषित डॉक्टर दाम्पत्य आहे.

दातांतील फटींचे निर्मूलन करणे, पुढे झालेले दात सरळ करणे आदि सेवा देतात. त्यासाठी कॉस्मेटिक तंत्राचा वापर केला जातो. या सदर्भातील विशेष प्रशिक्षण डॉ. सौ. शैलजा भावसार यांनी घेतले असून त्या व डॉ. संजय भावसार न्यूयॉर्क विद्यापीठातून कॉस्मेटिक डेन्टीशियन या संदर्भातील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करुन आलेले आहेत.

*With Best Compliments!*

Ramesh Kanani
Director

**YOGESHWAR ENGINEERING PVT. LTD.**

**MFG. OF TUNGSTEN CARBIDE TIPS & SLIP GAUGES**

**WORKS**

W-150(A), M.I.D.C. Area, Ambad,
Nasik - 422 010. MAHARASHTRA, (INDIA)
**E-mail** : info@carbideindia.com
**Visit us at** : www.carbideindia.com
Phone : 0253-2382830, 2384232, 2384601
Fax : 0253-2381445, 2382832 Resi.: 0253-2360092



# लोकांच्या पसंतीवर परिश्रम म्हणजे यश : मनोज कोतकर


नाशिक मधील नंदन स्वीटची ओळख आता संपूर्ण महाराष्ट्राला झाली आहे. व्यवसाय नाशिक पुरताच मर्यादित राहिलेला नाही तर तो संपूर्ण महाराष्ट्रात आपले व्यावसायिक जाळे विस्तारत आहे. चाळीसगाव सारख्या छोट्या शहरातून ह्या कथेस प्रारंभ झाला. कोतकर कुटुंबियांची ही कथा, उठा, चालते व्हा, चालत राहा, कठोर परिश्रमावर विश्वास ठेवा यश नक्की होते. मेहनत करणाऱ्याला सर्वच मदत करतात हे सिद्ध करणारा प्रवास आहे



नंदन स्वीटचे संचालक आहेत श्री मनोज कोतकर. श्री मनोज कोतकर हे चाळीसगाव सारख्या ग्रामीण भागातून नाशिकला आले, चाळीसगावला त्यांचे आजोबा काका आणि वडिलांचा दुधाचा व्यवसाय होता. आणि नंतर दुधावर प्रक्रिया करून दुग्ध उत्पादने बनवण्यास त्यांनी सुरुवात केली. आणि पेढ्याच्या उत्पादनात अख्या खानदेशात तसेच नाशिक शहर आणि जिल्ह्यात त्यांनी अमाप लोकप्रियता मिळवली. आणि आपल्या पेढ्याला पसंती मिळवली. श्री कोतकरांचे घराणे म्हणजे अतिशय कर्तबगार. सर्वच कोतकर कुटुंबिय व्यवसायाच्या विविध क्षेत्रात अतिशय यशस्वी झाले आहेत. मनोज कोतकर यांची कथा सुद्धा अशीच आहे. मनोज कोतकर हे नाशिकला आले. त्यासाठी त्यांचे वडील आणि आजोबांनी त्यांना प्रोत्साहन दिले. अतिशय अल्प भांडवलामध्ये तू तुझ्या पद्धतीने तुझ्या पायावर उभे राहा असं त्यांना सांगितलं आणि त्यांनी प्रथम नाशिकला एका भाड्याच्या जागेत पेढ्यांचा व्यवसाय सुरू केला. त्याच्यामध्ये गुणवत्ता ठेवल्यामुळे त्यांनी त्यांचा व्यवसाय कॉलेजरोडला वाढवला. तत्कालीन आरोग्यमंत्री डॉ डी एस आहेर यांच्या हस्ते त्यांनी कॉलेज रोडच्या नंदन स्वीट्स या दुकानाचे उद्घाटन केले आणि म्हणता म्हणता नंदन स्वीटचा व्याप अतिशय मोठ्या प्रमाणात वाढला.



गोरख पगार


Very Special & New in Nashik!
Dr. Rumy D. Patel
M.D., D.G.O. (Mumbai)
Gynaecologist and Obstetrician
Nina R. Patel
Hospital Management &
Diet Specialist in Pregnancy
AHURA MATERNITY HOSPITAL
Ahura Maternity & Surgical Hospital
Patel Plaza, 2nd Floor, Opposite BSNL Office,
N.D. Patel Road, Nashik. Tel. 2507730 / 2500534
Consulting Timings
11am to 2pm & 5pm to 8pm
Saturday Evening & Sunday Closed
AHURA MATERNITY & SURGICAL HOSPITAL


With Best Compliments From
TUNCOSI
C-39, MIDC, Ambad, Nashik-10
Ph. 0253-2382799
lubnsk@gmail.com
www.lubindia.com


Kailas Deore
M. : 9860556262
• Accident Job Work (Denting-Painting)
• All Types of Mechanical Work
• With Insurance Job
PERFECT
CAR SERVICES
Near 132KV-1, S/S, SR. NO. 83/2/2,
Datir Mala, Ambad, Nashik - 422010,
New Ambad MIDC


Come & Share the Moments of Life
Suraa
Wine n dine
Open Air Restaurant
Snookers
Lounge
AC Family Restaurant
RENAISSANCE
Come 'N' Joy
Just 15 Min. From Nasik @
Renaissance Winery Pvt. Ltd., Gat No. 2317,
Mumbai Agra Road, Ozar (Mig.), Nashik.
Ph. (02550) 272933, 271833
E-mail : suraa@renaissancewinery.net

# आधुनिक शेती आणि प्रक्रिया उद्योगातील उष:कालाचा प्रारंभ



आदरणीय नाना म्हणजे स्व. बाबुराव सोनार हे एबेलिन पॉलिमर्सच्या संस्थापकांपैकी एक, त्यांना शेतीमध्ये नेहमीच रस होता आणि त्यांना ते क्षेत्र पुढे नेण्याची इच्छा होती. ती दूरदृष्टी त्यांच्या पत्नी शोभना सोनार यांनाही होती.

त्यांचा मुलगा, संदीप सोनार, एबेलिनची पुढची पिढी, यांनाही आपल्या पालकांच्या इच्छेचा आदर करून स्वत:ची शेती करण्यात रस होता. मात्र श्री संदीप सोनार यांची पत्नी सौ. स्वाती सोनार यांनी शेतीची जबाबदारी स्वत: घेतल्यावर चाक फिरू लागले.



संदीप सोनार

स्वत:चे आणि कुटुंबाचे हित जोपासण्यासाठी आणि शेतीमध्ये खऱ्याखुऱ्या स्वारस्याने विविध शेतकरी आणि कृषी व्यावसायिकांशी संवाद साधण्यास सुरुवात केली. नैसर्गिक शेतीच्या विविध पद्धती शिकण्यात ती मग्न झाली. तिचे मिशन तिचे कुटुंब आणि मित्रांना नैसर्गिकरित्या पिकवलेले उत्पादन प्रदान करणे हे होते. नाशिकमधील तिच्या स्वत:च्या शेतातून तिने प्रवास सुरू केला जो भविष्यातील मोठा उपक्रम असेल श्री. व्यंकटेश्वरन दोराईसामी, श्री. सुमित शर्मा, श्री. कृष्णमूर्ती आणि श्री. राजीव काळसकर हे या उपक्रमाचे प्रमुख आधारस्तंभ आहेत.

या कुटुंबाला celebrating Farmers' EDGE INTERNATIONAL (CFEI) असे नाव देण्यात आले.

CFEI हे एक व्यासपीठ आहे, जे जगभरातील "FARMERPRENEURS" चे सक्षमीकरण करते आणि त्यांना विकासाच्या आणि त्यांच्या क्षमता आणि क्षमतांचा पुरेपूर वापर करण्याच्या पुरेशा संधी उपलब्ध करते. सुलभ आणि परवडणारे विघटनकारी तंत्रज्ञान सक्षम करून, कृषी उत्पादनाच्या सुयोग्य वापरासाठी आणि नैसर्गिक उत्पादन लाइन विकसित करून आणि शेतकऱ्यांना त्यांच्या कृषी उत्पादनांचे व्यावसायिक मॉडेल लागू करून त्यांचे व्यावसायिकीकरण करण्यास मदत करून शेतकरी उद्योजकांची क्षमता वाढवणे. स्टार्ट-अप्सना जोडणे आणि शेतकऱ्यांचे समूह तयार करण्याचे त्यांचे ध्येय आहे.

**1. तंत्रज्ञान सक्षम करणे**

**2. नाविन्यपूर्ण उत्पादने विकसित करणे**

**3. व्यवसाय मॉडेल तयार करणे**

**4. स्टार्ट-अप कनेक्ट करणे**

**5. शेतकऱ्यांचे समूह तयार करणे**

CFEI चे उद्दिष्ट शेतकऱ्यांना एकत्र आणणे आणि त्यांना शेतकरी उद्योजक म्हणून पात्र असलेला सन्मान आणि पुरस्कार देणे हे आहे. ऊसाचे पीक केंद्रस्थानी आहे आणि जे शेतकरी CFEI चा भाग आहेत त्यांनी गन्ना चुस्की, गन्ना चाय, गन्ना इमली चटणी आणि इतर अनेक नाविन्यपूर्ण ऊस उत्पादनांची निर्मिती सुरू केली आहे.

स्टार्ट-अप्स शेतकऱ्यांसह उत्पादने तयार करतात आणि त्यांना तांत्रिक ज्ञानाने सुसज्ज करतात. ही एक वीन-वीन परिस्थिती आहे.

आतापर्यंत, CFEI ने 1,500 हून अधिक शेतकऱ्यांच्या जीवनाला स्पर्श केला आहे. शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवण्याच्या प्लॅटफॉर्मच्या उद्दिष्टामुळे अनेक शेतकरी समूह तयार झाले आहेत, ज्यांनी स्वत:च्या उत्पादनावर प्रक्रिया करणे, ऊस उत्पादनांचे उत्पादन करणे आणि त्यांचे स्वत:चे व्यापारीकरण करणे सुरू केले आहे.

✍ गोरख पगार



श्रीनिवास लोया- चेअरमन

# सहकारी बँकींग क्षेत्रातील सर्वोत्तम

Business Bank
The Business Co-Op. Bank Ltd.
दि बिझनेस को-ऑप. बँक लि.

द बिझनेस बँक लि. आपल्या ग्राहकांना सुरक्षित आणि सोयीस्कर बँकिंग सुविधा देण्याच्या उद्देशाने तसेच विकसित तंत्रज्ञानातील नवकल्पनांमध्ये आघाडीवर आहे. आणि त्या अनुभवाच्या बळावर आम्ही दिवसेंदिवस प्रगतीच्या उंचीवर पाऊल टाकत. "बँक विथ द डिफरन्स" हे आमचे ब्रीदवाक्य आहे आणि आम्ही त्या कसोटीवर पूर्णपणे पात्र ठरत आहोत. आमचे सर्व संचालक आणि आमचे कर्मचारी वर्ग या सर्वांचे या कामात मोलाची साथ असते हे इथे विशेष नमूद करावेसे वाटते. बँकेची स्थापना 20 फेब्रुवारी 1997 रोजी "राजन कॉम्प्लेक्स आर्केड, दत्त मंदिर सर्कल, नाशिक रोड, नाशिक" येथे झाली. नवीन संकल्पना आणि नवीन कल्पनांसह आम्ही बँकिंगच्या व्यवसायात आलो. बँकिंग क्षेत्राला घेऊन "ओपन हाऊस बँकिंग" ची संकल्पना आम्ही सर्वप्रथम मांडली आणि "ओपन हाऊस बँकिंग" प्रथम सुरू केले. बँकेचे मुख्य कार्यालय राजन कॉम्प्लेक्स आर्केड, दत्त मंदिर सर्कल, नाशिक रोड, येथे आहे. तसेच शाखा. इतर शाखा महात्मा नगर, मेहेर सिग्नल गोळे कॉलनी, तसेच देवळाली कॅम्प येथे आहेत. शेअरधारकांना भेटवस्तू शेअर्स वितरित करणारी आम्ही सहकारी क्षेत्रातील पहिली बँक आहोत तसेच सहकारी बँकांमध्ये एटीएम मशीन आणणारेही आम्ही पहिली बँक आहोत हे सांगायला मला विशेष आनंद होतो. तसेच नाशिकमध्ये मोबाइल बँकिंग - IMPS आणि UPI सुरू करणारे आम्ही नाशिकमधील पहिले UCB आहोत. अध्यक्ष श्रीनिवास लोया अर्थ-उद्योगशी बोलत होते. ते म्हणाले,

बँक सदैव बदलत्या काळानुसार नवनवीन तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे अवलंब करीत आपल्या ग्राहकांसाठी अद्यावत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेसर असते. त्याचाच भाग म्हणून ग्राहकांनी कोअर बँकिंग प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करण्याचे बँकेचे धोरण आहे. यादृष्टिने बँकेने नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (N.P.C.I.) यांचे सभासदत्व स्विकारून रूपे डेबिट कार्ड ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिले आहे. बिझनेस बँकेच्या चारही शाखांचे एटीएम हे N.P.C.I. च्या नेटवर्कशी जोडलेले असून इतर बँकांच्या ग्राहकांसाठीसुध्दा ते उपलब्ध आहे. बिझनेस बँकेच्या ग्राहकांसाठी भारतातील २,२५,००० एटीएम व ९,५०,००० POS TERMINAL व्यवहारांसाठी उपलब्ध झाले आहेत. ग्राहक रूपे, एटीएम, डेबिट कार्डचा उपयोग करून ऑन लाईन बिल, शॉपिंग, इंधन, ईन्शुरन्स, गव्हर्नमेंट आणि शैक्षणिक फी भरणा आदि कामे करू शकतात. त्याचप्रमाणे बँकेने ऑनलाईन पेमेंट सुविधा देण्यासाठी मोबाईल बँकिंग, आयएमपीएस, बीबीपीएस सुरु केले आहे. बँकेने ग्राहकांसाठी गृहकर्ज, दुकान/गाळा खरेदी कर्ज, सोने तारण कर्ज, टर्म लोन, वाहन कर्ज इत्यादी कर्ज उपलब्ध करुन दिले आहेत. तसेच बँकेने नव्याने सुरु केलेल्या कर्ज योजना हॅलो डॉक्टर,एलआयसी पॉलिसी तारण कर्ज, मायक्रो कर्ज योजनांना ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. एलआयसी पॉलिसी तारण कर्ज व वाहन कर्ज त्वरीत उपलब्ध करुन दिले जात आहे.



**अशोक भाबड**
सीईओ

बँकेचे अध्यक्ष श्री. अशोक तापडिया यांनी अर्थ-उद्योगशी बोलताना संगितले की, बँकेने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार आर्थिक निकष पूर्ण केलेले आहेत. कोविड-१९ या महामारीच्या काळातसुद्धा सोशल डिस्टन्सींगचे पालन करुन बँकेने ग्राहकांना उत्तम प्रकारची सेवा दिली आहे.

बँकेचे उपाध्यक्ष ॲड. अंजली राठोड, जनसंपर्क संचालक श्री. व वसंतराव नगरकर, बसंत गुरनानी, माजी अध्यक्ष अशोक तापडीया, विजय संकलेचा, विजय चोरडिया, डॉ. पुनमचंद ठोळे, मोहन लाहोटी, पुरुषोत्तम फुलसुंदर, नेमीचंद कोचर, सचिन (मनिष) घोडके, डॉ. उमेश नगरकर, सुरेश टर्ले, गोपी अलठक्कर, दयानंद सदाफुले, संचालिका सौ. आशा जाजू, सौ. राजश्री कपोते, तज्ज्ञ संचालक राजन लोंढे, कमलेश छाजेड तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक भाबड व कर्मचारी या सर्वांचा उत्स्फूर्त सहभाग बँकेच्या यशास कारणीभूत ठरला असेही अध्यक्ष श्रीनिवास लोया यांनी म्हटले. त्यांनी या सर्वांबाबत कृतज्ञता व्यक्त केली आहे.

गोरख पगार

# उद्योगातील 'रिअल' भरारी : ईगल वाईन्स



नाशिक जिल्ह्यातील निसर्ग सृष्टी वैभव यांचा पुरेपूर आनंद आणि दर्जेदार वाईन टेस्ट करावयाच्या असतील तर ईगल वायनरीजला भेट द्यायला हवी. ही वाइनरी बेज, तालुका सटाणा येथे आहे . सटाणा आणि मालेगांव शहरापासून जवळ आहे. वाईनरी ज्या परिसरात आहे तो परिसर सह्याद्रिच्या रांगांनी वन रम्य परिसर व्यापलेला आहे.

स्वच्छ सूर्यप्रकाश, द्राक्षांच्या विस्तीर्ण बागा आणि प्रदूषणविरहित वाहणारी गिरणानदी निसर्गाचा सौंदर्याचा मनमुराद आनंद देते. सप्तशृंगगड येथून जवळ आहे. मेकॅनिकल इंजिनियर असलेल्या सुभाष पाटील यांनी आपल्या शेतात निसर्ग सौदर्याचे आणि द्राक्ष बागांचे महत्व लक्षात घेऊन या वाईनरीची स्थापना केली. त्यापूर्वी श्री. सुभाष पाटील नाशिक येथील परफेक्ट सर्कल व्हिक्टर लि. मध्ये कार्यरत होते.

ईगल वाईनरीज प्रा.लि. ची क्षमता २ लाख लिटर असून, वाईनरीची वास्तू अतिशय कल्पक आहे. पर्यटकाला सर्व सुविधांसह व्यवस्थापनावर नाशिकच्या निसर्गाचा प्रतिनिधिक आनंद येथे घेता येऊ शकतो. कारण सुभाष पाटील यांनी नाशिक जिल्ह्यातील सर्व वाईनरीजना भेटी देऊन त्यांच्यातील चांगले काय ते नेमके हेरून त्याचा अंतर्भाव या वाईनरीच्या उभारणीत





केला. आणि प्रकल्पास सरस स्वरुपातील नैसर्गिक सौंदर्याची जोड मिळाली. त्यामुळे निर्भेळ वाईन पर्यटनाचा आनंद येथे हमखास घेता येऊ शकतो.

श्री. सुभाष पाटील यांना दुर्गेश पाटील या मेकॅनिकल इंजिनियर मुलाची मदत होत असली तरी खऱ्या अर्थानि एका शेतकरी, पण उच्चशिक्षित अशा दाम्पत्याची ही वाईनरी आहे. इगल वाईन्स ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी असून पती-पत्नी दोघेच संचालक आहेत. इटली किवा फ्रॉन्समधील वाइनरीजचे असते तशा पद्धतीच्या व्यवस्थापनावर पाटील दाम्पत्य भर देत आहे. वाईनरीवर वाईन टेस्टिंगची सुविधा उपलब्ध असून पर्यटकांची वर्दळ आहे. वाईनरीजवळ लवकरच वाईनबारचीही उभारणी श्री. पाटील करणार असून लवकरच या वाईन्स मार्केटमध्येही उपलब्ध होणार आहेत.

वाईन उद्योग भारतीय लोकांसाठी महत्वाचा का आहे? याबाबत बोलताना श्री. पाटील म्हणाले, हार्डड्रिंक्सच्या तुलनेत वाईन आरोग्यासाठी उपयुक्त आहे. शिवाय वाईन उद्योगामुळे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. हार्ड ड्रिंक्समुळे आरोग्याची हानी होते परंतु मर्यादित वाईन सेवन हृदय, त्वचा, कर्करोग, आदी विकारांवर काही प्रमाणात प्रतिबंधक आहे. वाईन उद्योगामुळे ग्रामीण भागात औद्योगिकरण शक्य. निर्यात होऊ लागल्यास विदेशी चलन मिळू शकते, भारतीय वाईन्स लोकप्रीय झाल्यास आयाती मार्फत विदेशात जाणारे चलन वाचेल. वाईन उद्योगात संपूर्ण देश तसेच शेतकऱ्यांना समृध्द करण्याची ताकद आहे असेही श्री. पाटील म्हणाले.

गोरख पगार




सुश्रुत हॉस्पिटल
डॉ. प्राची वसंतराव पवार
ॲक्सिडेंट, न्युरो, सर्जिकल,
जनरल व आय केअर सेंटर
सर्व कॅशलेस सुविधा उपलब्ध
नवीन पंडित कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक
संपर्क - 0253-2576481, 2577717, 2576999


Avail Best Service @
HOTEL
Rucha
AND LODGING
Firm :
Hotel Rucha
Rucha Lodging
Rucha Builder's & Developer's
Rucha Tours & Traveler's
Vasant Ghodake Vyapar Bhavarn,
Ghodake Nagar, Pimpalgaon Basvant,
Tal. Niphad, Dist. Nashik. Maharashtra
Mob. 9822551666


प्लॉटस्
नाशिक महानगरपालिका हद्दीत फायनल ले-आऊटमधील
धात्रक फाटा येथे
100 ते 300 वारपर्यंत
एन.ए. प्लॉटस् उपलब्ध.
त्र्यंबकेश्वर रोड येथे
फार्म हाऊस
प्लॉटस् उपलब्ध
निर्माण ग्रुप
7887882287


Panchal Engineers
India Pvt. Ltd.
Gearing the Industry...
New Age Engineering
Fabricated Machined Parts
Compressor Cylinders
Gears & Gearboxes
Pneumatic Cylinders
Sub Assemblies
Casting Machined Parts
Ph. : 0253-2383867, 2382464
Email : panchalgears.nsk@gmail.com | www.panchalgears.com
D-64/66/61-1 MIDC, Ambad, Nashik - 422 010. MH, India

# कृषी उत्पादकांचे आशास्थान
# नयनेश संघवी आणि त्यांचे उपक्रम



पिंपळगाव बसवंतचे नाव समोर येताच तेथील अनेक व्यावसायिक आणि सधन शेतकरी नजरेसमोर येतात. व्यावसायिकदृष्ट्या चांगले भौगोलिक स्थान आणि नैसर्गिक अनुकूलता लाभल्यामुळे, पिंपळगाव बसवंतने विविध क्षेत्रात विकासाची मोहर उमटवली. येथील लोक अभ्यासूवृत्तीचे आणि कल्पनांना प्रत्यक्ष कृतीत आणून 'वास्तव' साकारणारे असल्याने निफाड तालुका सुजलाम-सुफलाम होण्यास मदत झाली. अशा लोकांतीलच एक प्रमुख आणि विविध क्षेत्रांशी समर्पित नाव म्हणजे नयनेश संघवी! श्री. नयनेश संघवी यांनी प्रथम त्यांच्या वडीलांच्या मदतीने शेतीसाठी लागणारे विविध ॲग्रो केमिकल्स, सुक्ष्म मुलद्रव्य खते आणि द्राक्ष बागांसाठी उपयुक्त रसायने, खतांचा पुरवठा व उत्पादने या व्यवसायात आपला नावलौकिक केला. या व्यवसायात पिंपळगावसारख्या भागात प्रचंड स्पर्धा असल्यामुळे यशस्वी होणे शक्य नव्हते. तसेच नयनेश संघवी यांची - तशी कौटुंबिक पार्श्वभूमीही नव्हती. कारण ते मुळचे सोलापूर - जिल्ह्यातील. कारखानाही बार्शी येथे आणि पिंपळगावातीलच अनेक स्थानिक लोक त्या व्यवसायात होते. तसेच ते संबंधित सामाजिक बंधनांशी बांधील होते. परंतु श्री. संघवी यांनी परिसरातील शेती आणि द्राक्ष बागायतदारांना नेमके काय हवे याचा सुक्ष्म अभ्यास करुन त्यांना 'रिझल्ट ओरिएंटेड', परवडणारे आणि मानवणारे आणि सहकार्याच्या भावनेतून सर्व काही उपलब्ध केले. शिवाय कृषि उपयोगी मार्गदर्शन ते ज्या-ज्या मार्गाने शक्य आहे त्या-त्या मार्गाने उपलब्ध करून त्यांनी प्रत्यक्ष कृषी विकासास हातभार लावला. परिणामी नयनेश संघवी यांचे परिसरातील शेतकऱ्यांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले. सामाजिक जीवनात वावरताना ज्या-ज्यावेळी नयनेश संघवी यांचा संदर्भ येतो त्या-त्यावेळी त्यांच्याशी ज्यांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आला ते लोक त्यांच्यावर आणि त्यांच्या व्यावसायिक नितीमूल्यांवर, त्यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या सेवांवर तसेच उत्पादनांवर स्तुती सुमने उधळताना दिसतात आम्ही हे नेहमीच अनुभवत असतो आणि अनुभवले आहे. हे सर्व पाहिल्यानंतर श्री. श्री. रवी शंकर यांचा हा शिष्य त्याच तोला-मोलाचे जीवन जगत आहे याचीही प्रचिती येते. आज श्री. नयनेश संघवी त्यांच्या व्यावसायिक कार्यात प्रचंड व्यस्त असताना, तसेच मोठा जनसंपर्क सांभाळत असतानाही श्री. श्री. रवी शंकर यांच्या कार्यात हिरिरिने भाग घेत असतात. नाशिक येथे श्री. श्री. रवीशंकर यांचे जेवढे कार्यक्रम झाले त्यांच्या व्यवस्थापनात आणि नियोजनात श्री. नयनेश संघवी यांचा मोठा वाटा होता. याच एका कार्यक्रमप्रसंगी द्राक्षांचे भव्य प्रदर्शन भरवून पिंपळगावकरांची दर्जेदार द्राक्षे अल्पदरात नाशिकशहरवासियांना त्यांनी उपलब्ध करून दिली होती. आजही तशा प्रकारच्या सत्संगाची नाशिककर वाट पाहत आहेत. कार्य प्रचंड यशस्वी केल्यानंतर श्री. नयनेश संघवी पिंपळगावकरांना आणखी काहीतरी चांगले द्यावे तसेच त्यांनाही विकासाच्या नवीन संधी उपलब्ध कराव्यात म्हणून बांधकाम व्यवसायात आले आणि त्यांच्या गुरुकृपा बिल्डर्स या संस्थेमार्फत भव्य गुरुकृपा संकूल पिंपळगाव बसवंत येथे उभे राहिले.



पिंपळगाव शहरातील सर्वात मोक्याच्या ठिकाणचे हे व्यावसायिक आणि निवासी संकुल आहे. अतिशय देखणे आणि भव्य असे महामार्गालगतचे हे संकुल, महाराष्ट्रातील निमशहरी गावे मोठ्या विकासाची केंद्रे आहेत याची साक्ष देणारे ठरले. हे संकुल उभारताना श्री. नयनेश संघवी यांचे मुख्य भांडवल होते, ते त्यांच्या प्रती असणारा लोकांचा विश्वास. आणि तो या संकुलाने खऱ्या अर्थाने सार्थ ठरविला. भविष्यात याच संकुल प्रकल्पातून प्रेरणा घेऊन अनेक छोटी-मोठी व्यावसायिक संकुले पिंपळगावात उभी राहतील आणि नाशिक जिल्ह्यातील नाशिक-सिन्नर सारखेच पिंपळगाव बसवंत हेही व्यावसायिक हब म्हणून विकसीत झालेले दिसेल. अशा स्वरुपाच्या विकासास नयनेश संघवी यांनी सुरुवात करून दिली हे येथे नमूद करायला हवे. श्री. श्री. रवी शंकर गुरुजींचे आशीर्वाद आणि कुटुंबियांची भक्कम साथ, तसेच अनेकांच्या विश्वासाचे बळ अंगी असल्याने यशस्वी वाटचाल सुरू आहे असे ते सांगतात. भविष्यात अनेक संधी ते व्यावसायिकांसाठी उपलब्ध करुन देणार आहेत. त्या अर्थातच सामाजिक बांधिलकी या नात्याने! त्यांनी त्यांच्या उत्पादनांद्वारे द्राक्ष उत्पादकांच्या समस्यांवर यशस्वीरित्या मात केली. तसेच बांधकाम व्यवसायाच्या माध्यमातूनही व्यावसायिकांना त्यांनी सर्वोत्तम असे उपलब्ध केले.

गोरख पगार

## नाशिकच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्राची ओळख

# इएसडीएस आणि पियुष सोमानी



सोमानी परिवार मूळ संगमनेरचा. प्रकाशचंद्र सोमानी पीयुष यांचे वडील, ते बडोदा बँकेत अधिकारी होते. पियुष यांचे प्राथमिक शिक्षण नाशिकमध्ये झाले. पुढे बारावीत ७५ टक्के मार्क मिळाले. तेवढ्या गुणांवर कुठल्याही शासकीय, नावाजलेल्या महाविद्यालयात प्रवेश मिळणे अवघड होते, तशा स्थितीत त्याना संगमनेरच्या अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयात 'पेमेंट सीटवर प्रवेश मिळाला. पैसे देऊन प्रवेश हा त्यांच्या आयुष्यातील पहिला धक्का. वडील बँकेत अधिकारी असले तरी संसार चालवून आणि सर्व मुलांना शिकवून इंजिनिअरिंगची फी भरणे त्यांच्यासाठी अवघडच होते. ही जाणीव पीयुषला तेव्हाच झाली. त्यानंतर त्यांचा दृष्टीकोन बदलला. पण 'कॉलेजचे वारे' लागलेलेच होते. पहिल्या वर्षी अनिर्बंध आयुष्यामुळे ते कॉलेजात लोकप्रिय ठरले, गॅदरिंग गाजवले, लीडरशिप केली आणि परीक्षेत मात्र चक्क ५ विषय राहिले. रिचेकिंगमध्ये त्यातील ३ निघाले मात्र वर्ष वाया गेले ते वर्ष होते १९९८.

पीयुष सांगतात, "तो आयुष्यातील अतिशय दुःखाचा काळ होता. माझ्या वडिलांच्या कमाईतील ५० टक्के वाटा माझ्या शिक्षणावर खर्च होत होता. ते कष्ट करीत होते आणि मी त्यांना हे फळ दिले होते. तेव्हाचा माझ्यावरील मानसिक ताण खूप मोठा होता. तुम्ही सर्वात जास्त दुःखी असता तेव्हा जग तुमच्याकडे कसे पाहते, हे महत्त्वाचे असते. माझ्याकडे जग सहानुभूतीने पाहात होते. वडील नाराज होते. ते बोलून दाखवीत नसत पण वागण्यातून ती नाराजी स्पष्ट दिसत असे. रिचेकिंगमध्ये तीन पेपर निघाले तेव्हा त्यांना थोडे समाधान वाटले पण वर्ष तर वाया जाणारच होते. या वर्षाचा चांगला उपयोग करून घ्यायचे त्यांनी ठरवले"

त्या वर्षात पीयुषने सी लॅंग्वेज शिकायचे ठरविले. कॉम्प्यूटर तेव्हा नव्यानेच आलेले होते आणि पीयुषला ते अजिबात आवडत नसत. कॉम्प्यूटरबद्दल त्यांना अजिबात रुची नव्हती. पण मुलाने वर्ष वाया न घालवता काहीतरी शिकले पाहिजे, असे वडिलांना वाटत होते. त्यांनी 'सी'चे शिक्षण देणाऱ्या क्लासची फी भरली आणि मुलाला तसे सांगितले. भरलेल्या फी ला जागत पीयुषने तेथे जाण्यास सुरुवात केली आणि काही दिवसांत त्यांना कॉम्प्यूटरची गोडी निर्माण झाली. तेथून पीयुषचे आयुष्यच बदलले.

इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षात नियमीत शिक्षण घेत असतानाच त्याची कॉम्प्यूटरवरची मेहनत चालू होती आणि नियमीत अभ्यासक्रमही. शिवाय इतर उपक्रमांतील सहभागही कायमच होता. त्याचे विभागप्रमुख डॉ. जयंत चोपडे यांनी त्याच्यावर प्रेमही केले आणि सक्तीही. त्याचा परिणाम असा झाला की पीयुषची. सगळ्याच विषयांत चांगली तयारी झाली. सन २००२ मध्ये पीयुष इंजिनिअर झाले.

इंजिनअरिंगनतर काही काळ नोकरी करून अनुभव घ्यायचा आणी त्यानंतर स्वतःचा बिझनेस सुरू करायचा, हा त्याचा मनोदय. तेथे एक दोन नोकऱ्या केल्या. दुसऱ्या नोकरीत २५०० रुपये पगार होता. मुंबईत असलेले त्याचे मामा म्हणाले, नोकरीचे काही खरे नाही. तू बिझनेस कर. चांगले पैसे मिळतील. ते पीयुषला पटले आणि चार महिन्यांतच ते नोकरी सोडून नाशिकला परत आले. पुढे त्यांनी नाशिकला होस्टिंग सपोर्टमध्ये काम करत असलेली कंपनी जॉईन केली. ही कंपनी प्रामुख्याने हेस्टिंग सपोर्टमध्ये काम करीत असे. पीयुष यांनी त्या कामात चांगलीच गती मिळविली. एका प्रोजेक्टपासून सुरू झालेला त्यांचा आलेख १० महिन्यांत एका वेळी १० प्रोजेक्ट हाताळण्यापर्यंत पोहोचला. ते स्वतः रोज १०-१२ तास काम करीत. टीम लीडर आणि मित्र म्हणून त्यांचे सगळ्यांशी उत्तम संबंध होते. १० महिन्यांदरम्यान त्यांची महत्वाकांक्षा जागी झाली, आपली क्षमता त्यांना लक्षात आली. परिणामी त्यांनी तेथून बाहेर पडण्याचे ठरविले. त्यांना स्वतःची कंपनी सुरू करायची होती. ते सांगतात, "माझ्या मनाचा निर्धार होत नव्हता. त्यामुळे थोडी साशंकता होती. तेव्हा मी चेनस्मोकर होतो. खूप सिगारेट ओढत असे. ती सोडायचे मी ठरवले आणि मला यश मिळाले. मी सिगारेट सोडू शकतो तर आता काहीही करू शकतो, याची जाणीव झाली आणि मी नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. आपल्यासोबत आणखी काही जण भागीदार असतील तर नक्कीच चांगले भवितव्य घडवता येईल या हेतूने मी माझ्या तिथल्या मित्रांनाही हाक दिली आणि आम्ही सात जण बाहेर पडलो. नवी कंपनी स्थापन केली 'ओअॅसिस सपोर्ट",

त्या काळात तरी अशा प्रकारच्या उद्योगांना परदेशातीलच क्लायंट मिळत असत. अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलियातील काही क्लायंट त्यांना मिळाले. पण काही काळातच काही मित्रांनी आपापले मार्ग शोधण्यास प्रारंभ केला. कुणी अमेरिकेत जाऊ इच्छित होते तर कुणी स्वतंत्रपणे काम करण्यास इच्छूक होते. साधारण वर्षभरातच हा प्रयोग थांबला आणि पीयुष यांनी एकट्यानेच पुढे जायचे ठरविले. एकत्रित प्रयोगातील काही जण त्यांच्या सोबत आले. त्यावरून जुनी मंडळी आणि पीयुष यांच्यात काही ताणतणावही झाले पण पुढे ते मिटले. २००५ मध्ये पीयुष यांनी स्वतंत्र कंपनी स्थापन केली 'ई टेक सपोर्ट अँड डाटा सर्व्हिसेस'.

नवी कंपनी सुरू केली तेव्हा त्यांच्याकडे ८ जणांचा स्टाफ होता आणि ब्रिटनमधील २ व अमेरिकेतील एका कंपनीचे काम होते. हे त्या कंपनीसाठी काम करीत होते आणि त्या बळावर त्या कंपन्या आपल्या सेवा देत होत्या. पीयुष यांनी या कंपन्यांनाच ऑफर दिली आणि त्या कंपन्या आपल्या ताब्यात घेतल्या. याशिवाय काही कंपन्यांची 'आऊटसोर्सिंग'ची कामेही स्वीकारली. वर्षभरातच, मार्च २००६ मध्ये त्यांनी एक



धोरणात्मक निर्णय घेतला आणि 'आऊटसोर्सिंग'ची सर्व कामे बंद करून फक्त अमेरिका आणि ब्रिटनमधील तीन कंपन्यांवरच लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले. हा निर्णय त्यांच्या अंगलट आला आणि एप्रिल २००६ मध्ये त्यांचे बँक अकाउंट अक्षरशः शून्यावर आले. ते म्हणतात, 'हा खूप वाईट काळ होता. या स्थितीतून बाहेर पडायचे तर काहीतरी नवे शोधावे लागणार होते. नवे क्लायंट, नव्या सेवा मिळवाव्या लागणार होत्या. योगायोगाने त्याच काळात पीयुष यांनी सर्च इंजिन ऑप्टिमायझेशन या विषयात आपली पीएचडी पूर्ण केली होती. हे काय असते? गुगलला सर्च दिल्यानंतर असंख्य पर्याय समोर येत असतात. आपल्या स्पर्धकावर आघाडी मिळवायची तर गुगल सर्चमध्ये आपले नाव सर्वात समोर आले पाहिजे. किमान पहिल्या पेजवर तरी आलेच पाहिजे. दुसऱ्या पेजपासून पुढे नाव आल्याचा फायदा जवळजवळ नसतोच. यावर काम करण्याचे त्यांनी ठरविले. हा साधारण २००६ च्या अखेरचा काळ. त्यांनी आपल्या टीमला ही संकल्पना समजावून सांगितली आणि कंपनीने त्यावर काम सुरू केले. दररोजचे शिक्षणाचे शेड्यूल तयार केलेले होते. पियूष सर्वांना समजावून सांगतानाच स्वतःही शिकत होते. साधारण ६ महिने हे प्रशिक्षण चालले आणि त्यानंतर ते मार्केटमध्ये उतरले. सन २००७ च्या प्रारंभी या विषयातील त्यांची उलाढाल सुरू झाली. २००७ नंतर हा विषय इतका विस्तारत गेला की दर ३ महिन्यांनी या विषयातला त्यांचा टर्नओव्हर दुप्पट होत गेला! हे यश मिळाल्यानंतर साधारण २००८ च्या प्रारंभी त्यांच्या मनात विचार आला स्वतंत्र 'डेटा सेंटर'चा. कुठल्याही वेबसाईट, सर्व्हरवर 'होस्ट' करायच्या असतात. जगभरात कुठेही इंटरनेटवर एखादी वेबसाईट उघडी असते तेव्हा ती मुळात एका सर्व्हरवर लोड केलेली असते. तोवर पीयुष प्रामुख्याने परदेशातील सर्व्हरचाच वापर करीत असत. पण जी सेवा आपल्याला द्यावयाची आहे त्याचे पूर्ण नियंत्रण आपल्या हाती हवे, हे लक्षात आल्यानंतर त्या दृष्टीने त्यांनी पावले उचलण्याचे ठरविले. डेटा सेंटरसाठी सर्वात महत्त्वाची असते ती स्वतःची जागा. २००८ मध्ये त्यांनी सातपूर औद्योगिक वसाहतीत १ एकरचा प्लॉट खरेदी केला. वर्षभरात तेथे बांधकाम केले आणि २०१० मध्ये ते नव्या जागेत शिफ्ट झाले. हे बांधकाम करताना त्यांनी दूरवरचा विचार केलेला होता. आपल्याकडे काम करणारे आपले सहकारी दिवसरात्र काम करणार आहेत, याची जाणीव ठेवून त्यांनी ही संपूर्ण इमारत विचारपूर्वक बांधली. डेटा सेंटरसाठी सुरक्षित जागा राखून ठेवतानाच आपल्या सहकाऱ्यांच्या 'रिफ्रेशमेंट'साठी त्यांनी उपाहारगृह तयार केले, खेळण्यासाठीच्या सुविधा दिल्या आणि प्रांगणात चक्क मोठा जलतरणत तलाव बांधला. इमारतीमधील वातावरण प्रसन्न राहण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात वृक्षराजी वाढविण्यात आली.

हे सारे करतानाच विस्ताराच्या नव्या योजना समोर येत होत्या. पण परदेशातील ग्राहकांना सेवा देताना प्रारंभी उल्लेख केलेल्या अडचणी समोर येऊ लागल्या. त्यातून त्यांनी स्वतःची क्लाऊड प्लॅटफॉर्मची संकल्पना विकसित केली. खूप मोठ्या प्रमाणात वेबसाईटचे सर्फिंग चालू असताना त्या प्रमाणात त्या साईटची क्षमता वाढवायची आणि तशी मागणी नसताना ती अन्यत्र वळवायची, असा हा आराखडा. त्याचा उपयोग असा झाला की विश्वासार्ह 'क्लाऊड'साठी त्यांचे नाव सर्वत्र पोहोचले. ते इतक्या प्रभावी पद्धतीने की पंतप्रधान कार्यालयाने आपल्या महत्त्वाकांक्षी योजनांसाठी 'सिडबी'च्या माध्यमातून त्यांच्या नावाला पसंती दिली. 'मुद्रा' आणि 'स्टार्ट अप इंडिया' च्या वेबसाईटसाठी त्यांनी सेवा दिल्या आहेत. एकट्या 'मुद्रा'च्या माध्यमातून लक्षावधी भारतीयांनी आपल्या व्यवसायासाठी नोंदणी केलेली आहे, या वरून या वेबसाईटवरील ताण लक्षात यावा! ते वेबहोस्टिंग आजही ब्रिटनमधील सर्व्हरवरूनच करतात, पण क्लाऊड होस्टिंगसाठी मात्र भारतातील सर्व्हर वापरतात. भारतातील छोट्या छोट्या होस्टिंग कंपन्या आमच्या रिसेलर आहेत. त्या आमच्याकडून स्पेस घेतात आणी कस्टमर्सना विकतात. पिझ्झा हट्, केएफसी, महिंद्रा हॉलिडेज, व्ही चॅट, एसर, झी मिडिया, एम्बसी ग्रुप, देशभरातील सुमारे २३० जिल्हासहकारी बँका हे सारे आमच्याच सर्व्हरवर होस्ट आहेत.हे काम कसे चालते? उदाहरण म्हणून स्टँड अप इंडिया किंवा स्टार्ट अप इंडियाची कार्यपद्धती पाहू. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आखलेल्या या योजनेत दोन कोटी रुपयांपेक्षा कमी रकमेची कर्ज एका सूत्रबद्ध प्रक्रियेतून पुढे जातील, त्यामध्ये क्रेडिट रेटिंग, डॉक्युमेंटेशन, मंजुरी वगैरे सगळ्याच गोष्टी ऑनलाईन आणि स्वयंचलित होतील. बँकेच्या शाखाधिकाऱ्यावरील ताण त्यातून कमी होणार आहे. हे महत्वाकांक्षी सॉफ्टवेअर ईएसडीएस ने विकसित केले आहे...!

हा व्यवसाय सुरू करताना त्यांच्या वडिलांनी त्यांना २५ हजार रुपये दिलेले होते. त्या २५ हजाराचा वापर करून त्यांनी आजवरची ही कोट्यवधींची उलाढाल करणारी कंपनी उभी केली आहे. पत्नी कोमल सोमानी या कॉम्प्यूटर इंजिनिअर आहेत. त्यांनी ग्राफॉलॉजीवर म्हणजे हस्ताक्षरावरून स्वभाव ओळखणारे सॉफ्टवेअर तयार केलेले होते. त्या मूळच्या अमरावतीच्या. आता त्या पीयुष यांच्या कंपनीच्या एच आर मॅनेजर म्हणून काम पाहतात. सध्या त्यांची कंपनी भारतातील पहिल्या चार कंपन्यांत एक असलेली क्लाऊड मॅनेजमेंट कंपनी आहे. नजिकच्या भविष्यात नंबर १ वर जाण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. अमेझॉन, अजॉर, नेटमॅजिक या इतर कंपन्या. पण 'भारतीय' नाहीत! पूर्णतः भारतीय कंपनी पहिल्या क्रमांकावर नेताना जागतिक बाजारपेठेतही काही गोष्टी सांभाळाव्या लागतात. त्यांना नाशिकचे 'लोकेशन' कळत नाही, म्हणून पीयुष यांना मुंबईत कार्यालय उघडावे लागले..! पण एक दिवस नाशिकचे नाव मोठे होईल आणि ते जगभर ओळखल जाईल, असा विश्वास पीयुष यांना वाटतो.

# योगाच्या माध्यमातून विश्व कल्याण

# विश्वास मंडलिक



**१९६० साली वैद्यराज के. बाळासाहेब लावगनकर यांनी योग विद्या धाम या संस्थेची स्थापना केली. त्यानंतर योगाचार्य विश्वास मंडलीक यांच्या अथक प्रयत्नातून १५९ विविध शहरातील आणि प्रांतातील शाखांमधून योगशास्त्राचा प्रचार झाला आहे.**



संस्था, योगशास्त्राचे पायाभूत व शास्त्रशुध्द प्रशिक्षण देण्याचे कार्य करते. साधकांना योगाभ्यासाची गोडी लागावी त्यांनी सहजतेने प्रगती साधावी असे अभ्यासक्रम संस्थेने तयार केलेले आहेत. योग संन्यासांकरिता नसून सर्वसामान्य जनतेकरिता आहे हा समज समाजात दृढ केला.

## योग विद्या धाम महाराष्ट्र

नाशिक शहरामध्ये योगाचे काम बरेच वाढले तसेच इतरही शहरातले नागरिक योग शिक्षक होऊ लागले व त्या त्या शहरामध्ये योग विद्या धामच्या शाखा सुरू झाल्या त्यामुळे ६ जून १९८५ रोजी, डॉ. पु. वि. करंबेळकर (कैवल्यधाम लोणावळा) यांच्या अध्यक्षतेखाली योग विद्या धाम महाराष्ट्र या केंद्रिय संस्थेची स्थापना करण्यात आली.

## योगशिक्षक वर्ग

योगाचार्य विश्वास मंडलीक यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेला एक- एक शिक्षक कार्यकर्ता ही एक चालती बोलती संस्थाच आहे. कार्यकर्त्यांशी आणि शिक्षकांशी सातत्याने संपर्क साधून त्यांना प्रेरणा देतांना आज निरपेक्षपणे कार्य करणाऱ्या १०,००० शिक्षकांची फळी उभारली गेली आहे.

## श्रेणीबध्द अभ्यासक्रम

योग विद्या धामची योग शिक्षणाची एक स्वतंत्र शैली निर्माण करतांना योगाचार्यांनी श्रेणीबध्द अभ्यासक्रम तयार केले. साधकाच्या व्यक्तीगत प्रगतीसाठी योगप्रवेश, योग परिचय, योग प्रबोध, योग प्रवीण आणि योग पंडित या पाच वर्गांची रचना केली, तर समाजकार्यात व योगप्रचार कार्यात रूचि बाळगणाऱ्या साधकांकरिता योगशिक्षक, योग अध्यापक आणि योग प्राध्यापक अशा तीन अभ्यासक्रमाची रचना केली, असे श्रेणीबध्द 'आठ प्रकारचे म्हणजेच अष्टवर्ग देणारी ही संपूर्ण भारतात एकमेव अशी संस्था आहे.

## इतर अभ्यासक्रम

योग शिक्षण आणि शिक्षक, शिक्षक-प्रशिक्षण या वर्गा व्यतिरिक्त गरजेनुसार उपचारात्मक वर्ग किंवा शिबिरे घेतली जातात. उदा. उच्चरक्तदाब निवारण, मधुमेह निवारण, हृदय रोग निवारण, स्थूलता निवारण, पाठदुखी निवारण, व्यसनमुक्ती शिविर, प्रसूतीपूर्व योगाभ्यास शिविर, टॉन्सिलायटीस निवारण वर्ग. आसनांच्या वर्गाच्या जोडीला प्राणायाम वर्ग, ध्यानवर्ग, योगनिद्रा वर्ग प्रणवजप वर्ग, उंचीसंवर्धन वर्ग, इत्यादी वर्ग घेतले जातात. यापैकी पुढील विशेष अभ्यासक्रम अत्यंत परिणामकारक व लोकप्रिय झाले आहेत.

## योग विद्या गुरुकुल

वरील निरनिराळे अभ्यासक्रम राबविण्याकरिता वर्ष प्रतिपदा १४ एप्रिल १९८३ रोजी 'योग विद्यापीठ' ही संस्था स्थापना झाली. हे विद्यापीठ 'योग विद्या गुरुकुल' या नावाने इ.स.२००० मध्ये धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयात नोंदण्यात आले. प्रत्येक शाखेतील 'परीक्षा प्रमुख' व प्रत्येक विभागातील 'परिक्षा संचालक' हे विद्यापीठातील 'परीक्षा नियंत्रक' ह्यांच्या मार्गदर्शना खाली कार्य करतात. विद्यापीठाचे 'कुलुगुरू' म्हणून योगाचार्य डॉ. विश्वास मंडलीक कार्य पाहतात.

## योग व निसर्गोपचार केंद्र

योगाभ्यासाचा चांगला 'साईड इफेक्ट' म्हणजे विकार मुक्ती म्हणून योगाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर उपचार पध्दतीसारखा होत आहे. बरेच असाध्य विकार, योग आणि निसर्गोपचाराच्या सहाय्याने बरे होऊ शकतात. याकरिता संस्थेतर्फे योग व निसर्गोपचार केंद्रे चालविली जातात. नाशिकमध्ये

योगभवन येथे अनिवासी स्वरूपात व नाशिक रोड व जेलरोड येथे निवासी स्वरूपात ही केंद्रे चालवली जातात. या आश्रमांत दरमहा विदेशी साधकांकरिता एक योगशिक्षक वर्ग (इंग्रजीतून) चालवला जातो. साधारणत: ३० ते ४० साधक प्रत्येक वर्गात असतात. हा वर्ग पूर्ण केलेल्या साधकांकरिता प्रगत योगवर्ग व योगोपचार प्रशिक्षण वर्गही चालवला जातो. या वर्गाचे काही विदेशी विद्यार्थी स्वयंसेवक म्हणूनही आश्रमात सेवा देत असतात. इंग्रजी वर्गाचे कार्य हे गुरुजींचे चिरंजीव श्री. गंधार मंडलीक आणि गुरुजींची सून सौ. भक्तीरत्ना मंडलीक हे बघत असतात. तसेच त्यांनी निर्माण केलेली www.yogapoint.com या वेबसाईटमुळे हे काम जोमाने चालू आहे.

## केंद्रशासन मान्यता

संपूर्ण भारतभर योगाचा प्रचार व्हावा,




या उद्देशाने भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयाचे आयुषचे अंतर्गत एक योजना केली. प्रत्येक राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक "जिल्हा योग कल्याण केंद्र" आहे. पहिल्या टप्प्यामध्ये संपूर्ण देशात १०० योग केंद्र सुरु केलेली असून नाशिक जिल्ह्यासाठी योग विद्या गुरुकुल या संस्थेला मान्यता मिळालेली आहे. या मान्यतेच्या माध्यमातून नागरिकांसाठी योगविषयक अनेक उपक्रम राबविले जातात.

## संशोधन विभाग

संस्थेला पुणे विद्यापीठाने योग संशोधन संस्था म्हणून मान्यता दिलेली आहे. यामुळे येथील संशोधन कार्य अधिक गतिमान झालेले आहे.

## विश्व योग दर्शन

आश्रमात योग संशोधनाकरिता मानसशास्त्रीय चाचण्या घेण्याकरता निरनिराळ्या प्रकारची यंत्रे आणलेली असून एक संशोधन प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. विश्वास मंडलीक यांचे पंधरा संशोधन प्रकल्प निरनिराळ्या आंतरराष्ट्रीय योग संमेलनात सादर केले गेले आहेत. याशिवाय अन्य तज्ञांचेही बरेच प्रकल्प सादर केले होते.

गोरख पगार



GRAINOTCH Industries Ltd

# ग्रेनॉच ग्रेनोफिड

पशुखाद्य

## प्रमुख वैशिष्ट्ये व फायदे

- गर्भावस्थेच्या सर्व टप्प्यात प्रोटीन्स, व्हिटॅमिन्स, मिनरल्स व एनर्जी पुरविते
- प्राण्यांच्या दुधाचे उत्पादन प्रमाणात भरघोस वाढ
- दुधाच्या गुणवत्तेत भरघोस वाढ
- सामान्य पशुपक्षीखाद्यापेक्षा ३ ते ४ पट अधिक पौष्टिक
- पक्षांच्या अंड्यांचे उत्पादन प्रमाण व वजन यात लक्षणीय वाढ
- पक्षीअंड्यातील बलक रंगात सुधारणा
- दर्जेदार पशुपक्षीमांसखाद्य निर्मितीस पोषक
- पाण्यात विद्राव्य, प्रोटीन्स, व्हिटॅमिन्स, मिनरल्स, ओमेगा ३ ने परिपूर्ण
- आम्लपित्त, लॅमिन्टीस (पायाचे रोग) व लिव्हरमधील आतरिक्त चरबीचे प्रमाण घटविते
- पाचक फायबरचे व फॉस्फरसचे अधिक प्रमाण
- प्राणी, पक्षी व जलचरांची नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती वाढवते

# वाईट कोलेस्टेरॉलला नाकारा

मक्याचे तेल एलडील कोलेस्टेरॉल (हानिकारक) सुमारे ११% नी कमी करत असल्याचे दिसून आले, तर ऑलिव्ह ऑईल ते केवळ ३.५ % कमी करते... ''या अभ्यासावरून असे दिसते की मक्याचे तेल हे हृदयास आरोग्यदायी ठरू शकते, कारण हे पॉलीअनसॅच्युरेटेड फॅटी ॲसिड्स (पीयुएफए) आणि मोनोअनसॅच्युरेटेड फॅटी ॲसिड्स (एमयुएफए) यांनी संपन्न आहे.


**एलडीएल (हानिकारक) कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करते.**

**लाभ**

- सर्व तेलांमध्ये सर्वाधिक ॲटिऑक्सिडंट्स
- मक्याचे तेल परतण्यासाठी आणि तळण्यासाठी आदर्श
- वाईट कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी एएचएची (अमेरिकन हार्ट असोसिएशन) शिफारस
- यामध्ये आहेत उच्च एमयुएफए आणि पीयुएफए
- यामध्ये आहेत विटॅमिन ए, डी आणि ई.

Cornlite®
REFINED CORN OIL



GRAINOTCH Industries Ltd
www.grainotch.com

Plant : Gat No. 238, 239, Bhendale, (Aurangabad-Nagar Highway), Tal. Gangapur, Dist Aurangabad.
Tel. : +91-2433-271199, 228622, 228633, 228644.




- महात्मा गांधी यांच्या जीवनकार्यावर आधारित जगातील एकमेव ऑडियो गाईडेड संग्रहालय
- महात्मा गांधींवरील भव्य शैक्षणिक व संशोधनात्मक ग्रंथालय व अभिलेखागार
- गांधीजींच्या कृतिशील विचारांवर आधारित समाजकार्य विषयात डिप्लोमा पाठ्यक्रम
- विद्यार्थी व बंदिजनांसाठी 'गांधी विचार-संस्कार' परीक्षांचे आयोजन
- महिला सशक्तीकरण व ग्रामविकास अभियान
- व्याख्यानमाला, चर्चासत्र व शिबिरांचे आयोजन




## गांधी रिसर्च फाऊंडेशन

गांधी तीर्थ, जैन हिल्स, जळगाव-४२५००१ (महाराष्ट्र) भारत
दूरध्वनी: +९१ २५७-२२६००३३, २२६४८०१, ९४०४९५५३००, ९४०४९५५२२०
इ-मेल: info@gandhifoundation.net; वेबसाइट: www.gandhifoundation.net

*जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. आणि भवरलाल ॲन्ड कांताबाई जैन फाऊंडेशन यांचा संयुक्त उपक्रम*


**गांधी तीर्थ संग्रहालय: सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ पर्यंत** (सोमवार बंद)
















**Harsh**®

**Constructions Pvt. Ltd.**

**CORPORATE OFFICE**

Murkute Lane No.: 02, New Pandit Colony, Gangapur Road, Nashik 422002, Maharashtra, India,
Tel. No.: + 91 253 2317143
Email : info@hcpl.co.in | Web : www.hcpl.co.i

# IBC DWARKA

THE JEWEL OF NASHIK'S SKYLINE

आयकॉनिक बिझनेस सेंटर द्वारका



TAKE YOUR BUSINESS TO GREATER HEIGHTS, WITH THE TALLEST COMMERCIAL BUILDING OF NORTH MAHARASHTRA

A glance at the interiors, amenities and services galore within IBC



CONFERENCE ROOMS



SEMINAR HALL



GYM




CRECHE



OBSERVATION DECK



CAFETERIA



LOUNGE



LIBRARY

- SERRATED DGU GLASS FACADE
- WELL-LIT SPACES
- BEST-IN-CLASS FACILITY MANAGEMENT
- MODULAR WORK SPACES
- FULLY VASTU COMPLIANT
- TEMPERATURE CONTROL
- 100% SOUND INSULATION
- LOWER ENERGY BILLS
- FURNISHED WITH WORLD CLASS FURNITURE
- TRIPLE-HEIGHT ENTRANCE
- FOUR LEVEL ATRIUM
- CONCIERGE SERVICE
- FIVE IMPORTED HIGH-SPEED ELEVATORS
- HIGH-QUALITY TOILETS
- TWO FULLY APPOINTED LOBBIES
- FIVE-TIER SECURITY
- DOUBLE HEIGHT LIFT LOBBIES
- GREEN SPACES

BAGAD PROPERTIES

## Transforming Nashik for 35 years and counting

We've transcended the boundaries of real-estate to create opportunities through spaces that fuel ambitions and dreams. Homegrown in Nashik and aiming to take it to an international level, our aspirations are as sky-high as the properties we envision.

**8007-345-345 | www.ibcdwarka.com**

MAHA RERA No. P51600031959
maharera.mahaonline.gov.in

**Disclaimer:** This advertisement is an artistic impression of the proposed project & not a legal offering. Bagad Properties reserve all the absolute rights to change, amend, cancel any plans, layouts, amenities or specifications, etc. at any time.